Progressive Education Society's

Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )

Shivajinagar, Pune-411005. Maharashtra


# MODLIB E-Bulletin of Library and Information Centre


VOLUME 7, ISSUE 9 SEPTEMBER 2022




शिक्षक संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ



Digital Inauguration of Academic Programs



Sakaal Idols Education Excellence Award 2022



Teachers Day Awards






Dr. Prerna Ubale, Hindi Sevi Samman


**Published by :** Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.

**Editor :** Dr. Shantashree Sengupta, Librarian.

**Editorial Assistant :** Mrs. Sarika Sable

**E-mail:** librarian@moderncollegepune.edu.in

MCASC Library Website and WebOPAC

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: September 2022

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

## *Table of Contents*


| Sr.No. | Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | शिक्षक संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ | 05 - 11 |
| 2 | Digital Inauguration of New Academic Courses and Facilities in various Colleges under the aegis of Progressive Education Society, Pune-5 | 12 - 19 |
| 3 | Sakaal Idols Education Excellence Award 2022 | 20 |
| 4 | Events conducted in the Library during September 2022 | |
| | • *Raje Umaji Naik Jayanti* | 21 - 22 |
| | • *Keshav Sitaram alias Prabodhankar Thackeray Jayanti* | 23 - 24 |
| | • *Pandit Deendayal Upadhyay Jayanti* | 25 |
| 5 | News related to Departmental Library of Department of Hindi | 26 - 27 |
| 6 | News related to Departmental Library of Department of Economics | 28 |
| 7 | Events conducted by Departments during September 2022 | |
| | • *Department of Hindi* | 30 - 31 |
| 8 | Faculty Members invited as Resource Persons in September 2022 | |
| | • *Dr. Prerna Ubale, Head, Department of Hindi* | 33 - 34 |
| | • *Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi* | 35 |
| 9 | Webinars/ Seminars attended by Faculty Members in September 2022 | |
| | • *Dr. Shantashree Sengupta, Librarian* | 37 |
| 10 | Modern Achievements | |
| | • *Shri. Bapu Kale, Laboratory Attendant, Department of Chemistry* | 39 |
| | • *Dr. Prabhakar Varade, Assistant Professor, Department of Electronic Science* | 40 |
| | • *Prof. Subhash Karekar, Supervisor, Junior College* | 41 |
| | • *Dr. Rajkumar Barmukh, Associate Professor, Department of Botany* | 42 |
| | • *Mrs. Sujata Ughade, Laboratory Assistant, Department of Physics* | 43 |

## *Table of Contents*


| Sr.No. | Title | Page No. |
|---|---|---|
| | • *Swejal Mankar, Student, M.A.Marathi* | 44 |
| | • *Shri. Ganesh Sathe, Registrar* | 45 |
| | • *Dr. Prerna Ubale, Head, Department of Hindi* | 46 - 47 |
| | • *Art Circle* | 48 - 51 |
| | • *Ravindra Shinde, Student, TYBA* | 52 |
| | • *Dr. Priyanka Joshi, Assistant Professor, Department of History* | 53 - 55 |
| 11 | Newly added books in the Library during September 2022 | 56 - 59 |
| 12 | Newspaper Clippings | |
| | • *News related to P.E.Society, Pune-5* | 61 |
| | • *News related to MCASC, Pune-5* | 62 - 66 |
| | • *Education* | 67 - 109 |
| | • *Career Opportunities* | 110 - 113 |
| | • *Miscellaneous* | 114 |
| 13 | Upcoming events | 115 |

# शिक्षक संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ




Progressive Education Society, Pune-5 organised Prize Distribution ceremony for the meritorious students of various School and College Examinations under the aegis of Progressive Education Society on 16th September 2022. The rank holders were felicitated at the hands of Hon'ble Shri. Deepak Kesarkar, Minister, School Education Department, Government of Maharashtra in presence of Hon'ble Shri. Siddharth Shirole, Member, Vidhan Sabha, Hon'ble Prof. Dr. G.R.Ekbote, Chairman, P.E.Society; Prof. Dr. Mrs. Jyotsna Ekbote, Joint Secretary, P.E.Society; Prof. Shamkant Deshmukh, Secretary, P.E.Society; Prof. Suresh Todkar, Joint Secretary, P.E.Society. All members of P.E.Society were also present. The programme was attended by teaching and non-teaching staff of various institutions of P.E.Society.

# शिक्षक संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ














# शिक्षक संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ















# *शिक्षक संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ*

सकाळ

## शिक्षणमंत्री केसरकर : प्राथमिक शाळांच्या वेळा बदलणार

# गृहपाठ बंद करण्याचा विचार



दीपक केसरकर

पुणे, ता. १६ : 'मुलांवरील अभ्यासाचे ओझे कमी करण्यासाठी आगामी शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा गृहपाठ (होमवर्क) बंद करण्याच्या विचार सुरू असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी दिली. "हे माझे व्यक्तिगत मत आहे. याबाबत शिक्षक संघटना, संस्थाचालक यांच्याशी चर्चा केल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल," असेही ते म्हणाले.

तसेच, शहरांमध्ये दोन ते तीन शिफ्टमध्ये शाळा सुरू असतात. लहान मुलांच्या मानसिकतेचा विचार करता, सकाळच्या टप्प्यातील प्राथमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार सुरू आहे. मात्र याबाबतचा अंतिम निर्णय संस्थाचालक, शिक्षक आणि तज्ज्ञांनी चर्चा करून घेण्यात येईल, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी दिली.

### सभेतील जल्लोष आणि मतदान यात फरक

**'सभेतील जल्लोष आणि मतदान यात फरक असतो, हा फरक शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी समजून घेतला पाहिजे. आदित्य ठाकरेंना उत्तर देण्यासाठी मी मंत्री झालो नसून जनतेची सेवा करण्यासाठी मी मंत्री झालो आहे,' असा टोला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी ठाकरे यांना लगावला. युवा नेते आदित्य ठाकरे यांनी रत्नागिरीच्या सभेत बोलताना शिंदे गटावर जोरदार टीका केली. त्यांच्याबरोबर केसकर यांच्यावरही आरोप केले होते. ठाकरे कुटुंबीयांवर प्रेम आहे. मात्र अशाप्रकारे जर काहीही बोलून ते राजकारण करीत असतील, तर आमच्यासारख्या कार्यकर्ता असलेल्यांना बोलावे लागते. ज्यांनी अनेक वर्ष राजकारणात काम केले, त्यांना वस्तुस्थितीची जाणीव करून द्यावी लागते, असेही एका प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळात केसरकर यांनी शुक्रवारी शिक्षण विभागाचा आढावा बैठक घेतली. तसेच त्यांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित कार्यक्रमात याबाबत माहिती दिली.

ते म्हणाले, "मुलांवर अभ्यासाचे ओझे देऊ नये. मुलांच्या मेंदूचा विकास झाला पाहिजे. तसेच गृहपाठ ही शिक्षकांसाठी पळवाट असता कामा नये. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पटकन समजेल असे शिकवावे, जेणेकरून त्यांना गृहपाठाची गरज भासणार नाही," असे सांगत पुढील शैक्षणिक वर्षापासून गृहपाठ बंद करण्यात येण्याचे सूतोवाच त्यांनी केले आहे.

दरम्यान, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केसरकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी केसरकर बोलत होते. आमदार सिद्धार्थ शिरोळे, सोसायटीचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर, डॉ. निवेदिता एकबोटे आदी उपस्थित होते. केसरकर म्हणाले, 'लहान मुलांना झोपेची जास्त आवश्यकता असते. या मुलांची शालेय जीवनातील वर्षे महत्त्वाची असून, त्या काळातच मेंदूचा जास्त विकास होतो. मात्र, राज्यात शाळांच्या वेळा सात वाजतापासून असून, त्यांच्यावर मानसिक ताण येतो. त्यामुळे या मुलांची व्यवस्थित झोप होत नाही. या वयातच त्यांच्या मेंदूची कार्यक्षमता वाढण्याची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर सकाळच्या टप्प्यातील प्राथमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार सुरू आहे.' शैक्षणिक गुणवत्ता उत्तम ठेवणाऱ्या शाळांना स्वायत्त दर्जा देण्याबाबत राज्य सरकारने विचार करावा,' अशी मागणी डॉ. एकबोटे यांनी केली. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांनी प्रास्ताविक केले.

Pune, Main
17/09/2022 Page No. 3

# प्राथमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार : शिक्षण मंत्री केसरकर

पुणे : लहान मुलांच्या मानसिकतेचा विचार करता, सकाळच्या टप्प्यातील प्राथमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार सुरू आहे. शहरांमध्ये दोन ते तीन वेळामध्ये शाळा सुरू असतात. त्यामुळे याबाबतचा अंतिम निर्णय हा तज्ज्ञ, संस्थाचालक आणि शिक्षकांशी बोलून घेण्यात येईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी दिली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित शिक्षक संवाद आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात गुणवंत विद्यार्थ्यांचा केसरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी केसरकर बोलत होते. आमदार सिद्धार्थ शिरोळे, सोसायटीचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर, डॉ. निवेदिता एकबोटे आदी उपस्थित होते. या वेळी शिक्षकांनी वेतनेतर अनुदान, अशैक्षणिक कामे, परीक्षा सुरू करा, अभ्यासक्रमात मूल्यशिक्षण आणा, छत्रपती शिवाजी महाराज ते महादजी शिंदे यांचा इतिहास सामाविष्ट करा, क्रीडा धोरण अशा विविध मुद्द्यांवर संवाद साधला.

केसरकर म्हणाले, की लहान मुलांना झोपेची जास्त आवश्यकता असते. या मुलांची शालेय जीवनातील वर्षे महत्त्वाची असून, त्या काळातच मेंदूचा जास्त विकास होतो; मात्र राज्यात शाळांच्या वेळा सात वाजतापासून असून, त्यांच्यावर मानसिक ताण जादा येतो. त्यामुळे या मुलांची व्यवस्थित झोप होऊन, त्यांच्या मेंदूची कार्यक्षमता वाढण्याची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर सकाळच्या टप्प्यातील प्राथमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार सुरू आहे. याबाबत कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही, असे केसरकर यांनी स्पष्ट केले. सरकारी शाळांमधून अनेक हुशार विद्यार्थी शिकतात. अशा परिस्थितीत शैक्षणिक गुणवत्ता वाढवणाऱ्या सरकारी शाळांचे ऑडिट करून, त्यांना पायाभूत सुविधा पुरवून पाठबळ देणे गरजेचे आहे, असे शिरोळे यांनी सांगितले.

बदलत्या काळानुसार राज्याच्या शालेय शिक्षणात आमूलाग्र बदल होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी राज्य पातळीवर सल्लागार समिती किंवा मंडळाची स्थापना करण्याची आवश्कता आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता उत्तम ठेवणाऱ्या शाळांना स्वायत्त दर्जा देण्याबाबत राज्य सरकारने विचार करावा, अशी भूमिका डॉ. एकबोटे यांनी मांडली.

Kesari 17.9.2022

# शिक्षक संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ

लोकमत



शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचा सत्कार करताना डॉ. गजानन एकबोटे यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे, प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे. प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव.

## 'प्रोग्रेसिव्ह'चा पुण्याच्या शिक्षण परंपरेत वाटा मोठा : केसरकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे हे विद्येचे माहेरघर आहे, शिक्षणाची मोठी परंपरा पुण्यामध्ये आहे, त्यामध्ये प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचा वाटा मोठा आहे, असे प्रतिपादन राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केले.

संस्थेच्या वतीने शिक्षण संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे हे होते. यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे, संस्थेचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव, संस्थेच्या सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर, प्रा. श्यामाकांत देशमुख, शिक्षण उपसंचालक औदुंबर उकिरडे, शिक्षणाधिकारी संध्या सुतार, शिक्षणाधिकारी सुनंदा वाखारे उपस्थित होते.

यावेळी डॉ. गजानन एकबोटे म्हणाले की, उच्च व तत्रंत्रशिक्षणासाठी उच्च स्तरावर एखादी कमिटी जशी असते किंवा यूजीसी ही संस्था जशी आहे तशीच एक उच्च समिती शालेय शिक्षणाबाबत असली पाहिजे त्याद्वारे शिक्षण, शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

यावेळी शिक्षक व प्राध्यापकांनी शिक्षणमंत्र्यांना शिक्षकांची शाळाबाह्य कामे, खेळाचा तासांचा वेळ, वेतनेतर अनुदान, विद्यार्थ्यांची कल चाचणी, इतिहास विषयाचा अभ्यासक्रम आदी विषयांवर प्रश्न विचारले व काही उपायही सुचविले.

प्रा. रेणू भालेराव, प्रा. सुषमा नानगुडे, डॉ. मृगजा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्रियंका भट यांनी स्वागतगीत व पसायदान गायले. श्यामाकांत देशमुख यांनी आभार मानले.

### सत्कार झालेल्या विद्यार्थ्यांची नावे अशी

डॉ. दिग्विजय एकबोटे, सिद्धेश अडसूळ, दीक्षा बोडके, पृथा वटीकर, श्रुती महाबळेश्वरकर, गायत्री चपटे, अंकित गुप्ता, प्रसाद सावंत, शौनक प्रसादे, श्रुती उबाळे, हॅकथॉन स्पर्धेचा संघ (सुजित, ओंकार, माहेश्वरी, तेजस नंदिता, व शिवम).

Hello Pune
Page No. 4 Sep 17, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

## शिक्षणमंत्रीच म्हणाले, शिक्षणात आपण नापास!

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** दहावी-बारावीच्या परीक्षेत मुलांना शंभरपैकी शंभर गुण मिळत आहेत. मात्र, त्याच मुलांची थर्ड पार्टीकडून जेव्हा आम्ही चाचणी घेतली, तेव्हा त्यातील काही मुलांना गणितात तर काही मुलांना विज्ञानात केवळ ३६ गुण मिळाले. याचाच अर्थ, आपण मुलांना खरं शिक्षण देण्यात नापास झालो आहोत, अशी खंत राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वतीने शिक्षण संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ आयोजित केला होता. त्यावेळी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी ही खंत व्यक्त केली.

शिक्षण व्यवस्थेवरच शंका व्यक्त करताना ते म्हणाले की, दहावी-बारावी शालांत परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण घेतले, त्यांच्यासाठी थर्ड पार्टीकडून आम्ही एक वेगळी टेस्ट घेतली होती, त्यात ते ३६ टक्क्यांवर आले. मुलांना पहिलीपासून इंग्रजी शिक्षण दिले गेले, तरी दहावीत गेल्यावरही मुलांना इंग्रजी बोलता येत नाही, यासाठी प्रयत्न करावे लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विज्ञान विषय केवळ पुस्तकातून शिकविला जातो. मुलांना प्रयोगशाळेत सहा-सहा महिने नेले जात नाही. त्यामुळे मुलांना खरे शिक्षण मिळत नाही व विद्यार्थी बाहेरच्या टेस्टमध्ये नापास होतात. बाहेरील टेस्टमध्ये हे विद्यार्थी ८० टक्क्यापर्यंत जातील, तेव्हाच यूपीएससीसारख्या परीक्षांमध्येही सर्वत्र मराठी मुले दिसतील. शिक्षकांना शाळाबाह्य कामे दिली जाऊ नयेत, यासाठी आमच्या सरकारने अद्यादेश काढला आहे, असे आदेशच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी दिले आहेत.

### वेतनेत्तर अनुदानासाठी नाहीत पैसे

राज्यातील शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी एक लाख ४२ हजार कोटी रुपयांचे खर्च होतात. त्यातील केवळ शिक्षकांच्या पगारासाठी ६२ हजार कोटी रुपये खर्च होतात. दुसरीकडे दहावी-बारावीला राज्यात पहिला येणाऱ्या मुलांना केवळ एक लाख रुपयांचे पारितोषिके आपण देतो. त्यामुळे नेमका खर्च कशावर केला गेला पाहिजे व कशात काटकसर केली गेली पाहिजे, याचा ताळमेळ घालावा लागतो. त्यामुळे वेतनेत्तर अनुदानासाठी निधी उपलब्ध करणे सध्या तरी कठीण आहे.

# शिक्षक संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ

पुढारी

## शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'लहान मुलांच्या मानसिकतेचा विचार करता सकाळच्या टप्प्यातील प्राथमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार सुरू आहे. शहरांमध्ये दोन ते तीन शिफ्टमध्ये शाळा सुरू असतात. त्यामुळे याबाबतचा अंतिम निर्णय हा तज्ज्ञ, संस्थाचालक आणि शिक्षकांशी बोलून घेण्यात येईल,' अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी दिली.




प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित 'शिक्षक संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव' कार्यक्रमात ते बोलत होते. आमदार सिद्धार्थ शिरोळे, सोसायटीचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे उपस्थित होते.

केसरकर म्हणाले, 'लहान मुलांना झोपेची जास्त आवश्यकता असते. या मुलांसाठी शालेय जीवनातील वर्षे महत्त्वाचा असून, या काळातच त्यांचा मेंदूचा जास्त विकास होतो. मात्र, राज्यात शाळांच्या वेळा सात वाजल्यापासून सुरू होतात. त्यामुळे मुलांची पुरेशी झोप न होऊन त्यांच्यावर जादा मानसिक ताण येतो. या पार्श्वभूमीवर सकाळच्या टप्प्यातील प्राथमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार सुरू आहे. याबाबत कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच खेळले देखील पाहिजे. या दोघांची योग्य सांगड घालण्यासाठी शिक्षणपद्धतीत बदलाची आवश्यकता आहे. नव्या शैक्षणिक धोरणात या बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

'बदलत्या काळानुसार राज्याच्या शालेय शिक्षणात आमूलाग्र बदल होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी राज्य पातळीवर सल्लागार समिती किंवा मंडळाची स्थापना करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता उत्तम ठेवणाऱ्या शाळांना स्वायत्त दर्जा देण्याबाबत राज्य सरकारने विचार करावा,' अशी भूमिका डॉ. एकबोटे यांनी मांडली. शिरोळे यांनीही मनोगत व्यक्त केले.

### ...तर निवडणुकीच्या कामातून सुटका

शिक्षकांना देण्यात येणारी अशैक्षणिक कामे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे शिक्षकांना केवळ निवडणूक आणि जनगणनेशी संबंधित कामे देण्यात येणार आहेत. ही कामे देण्यापूर्वीही महसूल विभागात कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेण्यात येईल. त्यानंतरच ही कामे देण्यात येतील. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून, त्यांना योग्य सूचना देण्यात येईल, असेही केसरकर यांनी स्पष्ट केले. शिक्षकांच्या संघटनेमार्फत शिक्षकांना भेडसावणाऱ्या समस्या माझ्यापर्यंत पोहचल्या आहेत. त्यामुळे त्या सोडविण्याचा प्रयत्न नक्कीच करणार आहे, असेही केसरकर यांनी सांगितले.

### चांगले निर्णय रद्द होणार नाहीत

पूर्वीच्या शिक्षणमंत्र्यांच्या काळात घेतलेले चांगले निर्णय रद्द केले जाणार नाहीत. याबाबत सर्व अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. जे चांगले आहे ते टिकले पाहिजे, अशी माझी धारणा आहे. याउलट गरज पडली तर सर्वांशी चर्चा करण्याची माझी तयारी असल्याचे केसरकर यांनी स्पष्ट केले.

Pune Edition
Sep 17, 2022 Page No. 11
newspaper.pudhari.co.in

# शिक्षक संवाद व गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ

**मटा अँकर** दीपक केसरकर यांचे सूतोवाच; शिक्षकांना अशैक्षणिक कामे देणार नसल्याचे आश्वासन

## प्राथमिक शाळांची सकाळची वेळ बदलणार?

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'लहान मुलांच्या मानसिकतेचा विचार करता, सकाळच्या टप्प्यातील प्राथमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार सुरू आहे. शहरांमध्ये दोन ते तीन शिफ्टमध्ये शाळा सुरू असल्याने याबाबतचा अंतिम निर्णय तज्ज्ञ, संस्थाचालक आणि शिक्षकांशी बोलून घेण्यात येईल,' अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी दिली. शिक्षकांना निवडणूक आणि जनगणनेची कामे वगळता इतर अशैक्षणिक कामे देण्यात येणार नाहीत, असेही केसरकर यांनी स्पष्ट केले.

'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी'तर्फे आयोजित शिक्षक संवाद आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात गुणवंत विद्यार्थ्यांचा केसरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी केसरकर बोलत होते. आमदार सिद्धार्थ शिरोळे, सोसायटीचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर, डॉ. निवेदिता एकबोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंझारराव आदी उपस्थित होते. या वेळी शिक्षकांनी वेतनेतर अनुदान, अशैक्षणिक कामे, अभ्यासक्रमात मूल्यशिक्षणाचा समावेश, छत्रपती शिवाजी महाराज ते महादजी शिंदे यांचा इतिहास समाविष्ट करणे, क्रीडा धोरण अशा विविध मुद्द्यांवर संवाद साधला.

केसरकर म्हणाले, 'लहान मुलांना झोपेची जास्त आवश्यकता असते. या मुलांची शालेय जीवनातील सुरुवातीची वर्षे महत्त्वाची असून, या काळातच मेंदूचा जास्त विकास होतो. मात्र, राज्यात शाळांच्या वेळा सकाळी सात वाजतापासून असून, अभ्यासाच्या दडपणामुळे मानसिक ताण जादा येतो. सकाळच्या टप्प्यातील प्राथमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार सुरू आहे. याबाबत कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही.'

➤ संबंधित वृत्त...२



'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या कार्यक्रमात शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर आणि कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे.

> "शिक्षकांना देण्यात येणारी अशैक्षणिक कामे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे शिक्षकांना केवळ निवडणूक आणि जनगणनेशी संबंधित कामे देण्यात येणार आहे.
> – दीपक केसरकर, शिक्षणमंत्री

### 'आमूलाग्र बदलासाठी मंडळ करा'

'बदलत्या काळानुसार राज्याच्या शालेय शिक्षणात आमूलाग्र बदल होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी राज्य पातळीवर सल्लागार समिती किंवा मंडळाची स्थापना करण्याची आवश्कता आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता उत्तम ठेवणाऱ्या शाळांना स्वायत्त दर्जा देण्याबाबत राज्य सरकारने विचार करावा,' अशी भूमिका डॉ. गजानन एकबोटे यांनी मांडली.

Maharashtra Times 17.9.2022

## शिक्षकांची अशैक्षणिक कामे बंद करू

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १७ - 'शिक्षकांना केवळ निवडणूक आणि जनगणनेशी संबंधित कामे देण्यात येणार आहे. यापुढे शिक्षकांना देण्यात येणारी अशैक्षणिक कामे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,' अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित शिक्षक संवाद आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. आमदार सिद्धार्थ शिरोळे, सोसायटीचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर, डॉ. निवेदिता एकबोटे आदी उपस्थित होते.

यावेळी केसरकर म्हणाले, 'शिक्षकांना निवडणूक व जनगणनेची कामे देण्यापूर्वीही महसूल विभागात कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेण्यात येईल. त्यानंतरच ही कामे देण्यात येतील. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांना सूचना देण्यात येईल.'

डॉ. एकबोटे म्हणाले, 'बदलत्या काळानुसार राज्याच्या शालेय शिक्षणात आमूलाग्र बदलासाठी राज्य पातळीवर सल्लागार समिती किंवा मंडळाची स्थापना करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता उत्तम ठेवणाऱ्या शाळांना स्वायत्त दर्जा देण्याबाबत राज्य सरकारने विचार करावा.'


पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वतीने शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे उपस्थित होते.

### शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार

राज्यात बहुतांश प्राथमिक शाळांच्या वेळा सकाळी ७ वाजेपासून आहेत. त्यांचा मानसिक ताण विद्यार्थ्यांवर येतो. मुलांची व्यवस्थित झोप होऊन, त्यांच्या मेंदूची कार्यक्षमता वाढण्याची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर सकाळच्या टप्प्यातील प्राथमिक शाळांच्या वेळा बदलण्याचा विचार सुरू असल्याचे केसरकर यांनी सांगितले.

Prabhat 18.9.2022

**लोकमत**

## तुम्हीही खूप मोठ्या पदावर जाल!

पुण्याच्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीमध्ये शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचा शिक्षक संवाद हा कार्यक्रम नुकताच पार पडला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे म्हणाले की, आमच्या संस्थेत आतापर्यंत जे-जे प्रमुख पाहुणे म्हणून आले ते खूप मोठ्या पदावर गेले. विलासराव देशमुख हे कॅबिनेटमंत्री असताना आले होते. कार्यक्रमानंतर ते थेट मुख्यमंत्री झाले. सुशीलकुमार शिंदे आंध्रप्रदेशचे राज्यपाल असताना आले आणि दुसऱ्याच दिवशी सोनिया गांधींचा फोन आला व ते केंद्रीय गृहमंत्री झाले. तुम्हालाही मोठी संधी मिळेल.



Hello Pune
Page No. 8 Sep 21, 2022
Powered by: erelego.com

## *Digital Inauguration of New Academic Courses and Facilities in various Colleges under the aegis of Progressive Education Society, Pune-5*




## कमी खर्चात उत्तम दर्जाचे शिक्षण देण्याचा शासनाचा प्रयत्न- पालकमंत्री चंद्रकांत पाटील

September 26, 2022 maharashtralokmanch चंद्रकांत पाटील, डॉ. गजानन एकबोटे, प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

पुणे : गुणवत्तेचे शिक्षण कमी खर्चात मिळत नाही तोपर्यंत सामान्यांसाठी ते उपलब्ध होणार नाही. सामान्य जनतेला खाजगी संस्थांमधूनही कमी खर्चात उत्तम शिक्षण मिळावे यासाठी शासन प्रयत्न करेल, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रमांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार सिद्धार्थ शिरोळे, संस्थेचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ.गजानन एकबोटे, प्रा. शामकांत देशमुख, प्रा.सुरेश तोडकर, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे आदी उपस्थित होते.

## *Digital Inauguration of New Academic Courses and Facilities in various Colleges under the aegis of Progressive Education Society, Pune-5*



पालकमंत्री पाटील म्हणाले, शिक्षण आणि आरोग्यावर विशेष लक्ष दिल्यास देशाच्या विकासाला चालना मिळू शकेल. त्यामुळे स्वस्त आणि उत्तम शिक्षण सुविधा सर्वांना उपलब्ध असणे आवश्यक आहे. यावर्षी काही महाविद्यालयांना भेट देऊन एफआरएने निश्चित केलेल्या शुल्काची तपासणी केली जाईल.

*जीवनाला दिशा देणारे शिक्षण गरजेचे*

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देशाचा आत्मा जागृत करणारे , गतवैभवाची जाणीव करून देणारे आणि भविष्यातील उन्नत ज्ञानाचा आग्रह धरणारे आहे. विद्यार्थ्यांनी प्रयोगशील असावे, त्या प्रयोगांना मान्यता मिळवावी आणि त्याच्या साहाय्याने समृद्धी प्राप्त करावी अशी अपेक्षा आहे. या माध्यमातून जीवनाला दिशा देणारे आणि स्वावलंबी करणारे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे.

*बहुशाखीय पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाविद्यालयांना प्रोत्साहन*

नवीन शोध लावणे आणि त्याला बाजारात आणण्याचे हे जग आहे. त्यामुळे नवे शोध लावणाऱ्या तरुणाईमुळे देश आर्थिक विकासाचे उद्दिष्ट गाठण्यात यशस्वी होईल. त्याचा पाया राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आहे. बहुशाखीय अभ्यासक्रम शिकून पदवी मिळविल्यास यशस्वी विद्यार्थी तयार करता येतील. मॉडर्न महाविद्यालयाने असे अभ्यासक्रम राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा. राज्यात असे अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाविद्यालयांना शासनातर्फे प्रोत्साहन देण्यात येईल.

## *Digital Inauguration of New Academic Courses and Facilities in various Colleges under the aegis of Progressive Education Society, Pune-5*

महाराष्ट्र लोकमंच



शैक्षणिक संस्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक विचार करेल, असेही त्यांनी सांगितले.

आमदार शिरोळे म्हणाले, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची महाविद्यालये नावीन्यतेला प्रोत्साहन देत आहेत. कोरोनानंतरच्या काळात या संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कामगिरी केली आहे.

डॉ. एकबोटे म्हणाले, शिक्षणाला प्राधान्य देणाऱ्या देशांचा विकास वेगाने झाला आहे. आपल्या देशाची ओळख विकसीत राष्ट्र अशी करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण वेगाने राबवावे लागेल.

संस्थेचे कार्यवाह देशमुख यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

पालकमंत्री श्री.पाटील यांच्या हस्ते प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयातील इन्क्युबेशन सेंटर, विद्यार्थ्यांच्या न्यूट्रिडिश स्टार्टअप ॲपचे उद्घाटन डिजिटल पद्धतीने करण्यात आले. मॉडर्न विधी महाविद्यालयाने तयार केलेल्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सर्वोच्च न्यायालयाच्या ७५ महत्वाच्या निर्णयांवर आधारित '७५ माईलस्टोन्स' या पुस्तिकेचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

विधी महाविद्यालयाच्या 'इनोव्हेशिया आयपीआर सेल', तसेच 'आयमॉडर्ना' आभासी संवादीका, इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या आभासी प्रयोगशाळा उपकरणाचे उद्घाटनदेखील पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्या हस्ते फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या 'एंजल प्लेयर' या उपकरणांचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले.

## *Digital Inauguration of New Academic Courses and Facilities in various Colleges under the aegis of Progressive Education Society, Pune-5*

लोकमत



उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील म्हणतात...

# खासगी प्राध्यापकांचाही पगार सरकार देईल !



शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर म्हणतात...

# सरकारकडे पैसा नाही !

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांचा पगार सरकार करेल, तुम्ही विद्यार्थ्यांचे शुल्क कमी करण्यास तयार आहात का, असे प्रश्नवजा आवाहन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी (दि. २६) पुण्यात संस्थाचालकांना केले.

पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संस्थेच्या विविध महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रमांचे डिजिटल पद्धतीने उद्घाटन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी मंचावर आमदार सिद्धार्थ शिरोळे, संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्सा एकबोटे आदी उपस्थित होते.

## तुम्ही विद्यार्थ्यांचे शुल्क कमी करा

- खासगी संस्थांकडून एफआरए पद्धतीनुसार अर्थात महाविद्यालय चालविण्याचा खर्च भागिले विद्यार्थ्यांचे शुल्क या निकषावर विद्यार्थ्यांकडून शुल्क घेण्यात येते. त्यात सर्वाधिक खर्च हा प्राध्यापकांच्या वेतनावर होतो, असे महाविद्यालयांकडून दाखविले जाते.



- प्राध्यापकांच्या पगारासाठी सध्या राज्याचे १२ हजार कोटी रुपये खर्च होतात, त्यामध्ये आणि एक हजार कोटी वाढवून विनाअनुदानित प्राध्यापकांचे वेतन कमी करू, मात्र संस्था विद्यार्थ्यांचे शुल्क कमी करण्यास तयार आहेत का हे संस्थांनी सांगावे.
- एफआरएच्या नावाखाली व प्राध्यापकांना दिला जाणार पगार या नावाखाली महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून खूप मोठे शुल्क वसूल करतात. त्यावर लगाम लावण्यासाठी मी स्वत: विविध महाविद्यालयांमध्ये जाणार आहे. तेथे प्राध्यापकांना दिले जाणारे वेतन आणि विद्यार्थ्यांकडून घेतले जाणारे शुल्क स्वत:च तपासून पाहणार आहे.
- सध्या उच्च महाविद्यालयाचे अनेक प्रश्न आहेत. विशेषत: प्राध्यापकांच्या रिक्त जागांचा प्रश्न भेडसावत आहे. त्यामुळे येत्या वर्षात २,०७२ नवीन प्राध्यापक भरती करण्यात येईल. त्यामुळे महाविद्यालयांचे बरेचसे प्रश्न सुटण्यास मदत होईल, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.

## कॉम्बो अभ्यासक्रम सुरु केल्यास अनुदान देऊ

नव्याने सुरु होणाऱ्या महाविद्यालयांनी सर्व शाखांचे विषय विद्यार्थ्यांना घेता येतील, असा कॉम्बो पॅक अभ्यासक्रम सुरु करावेत. एकाच विद्यार्थ्यांना गणित, सायन्सबरोबर संगीत, अभिनय, मराठी, हिंदी असे विषय घेता आले पाहिजेत. ज्यात करिअर करायचे आहे, त्या क्षेत्रातील विषयावर ७० टक्के भर असावा. इतर विषयाचे किमान ज्ञान मिळावे यासाठी त्या विषयांचा ३० टक्के अभ्यासक्रम त्याचा असावा, असे अभिप्रेत आहेत. महाविद्यालयांनी असे प्रयोग करावेत, सरकार अनुदान देईल, असेही पाटील म्हणाले.

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या याच मंचावर शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या उपस्थितीत शिक्षण संवाद हा कार्यक्रम १६ स्पटेंबर रोजी झाला होता.

## शिक्षणक्षेत्रात दोन मंत्र्यांची दोन विधाने

शालेय शिक्षणमंत्री अनुदानासाठी पैसा नाही म्हणत असतानाच उच्च शिक्षणमंत्री त्याच मंचावर एक हजार कोटी रुपयांत सर्व विनाअनुदानित महाविद्यालयांच्या प्राध्यापकांचे वेतन देण्याचे आश्वासन देतात. यावरून उपस्थित प्राध्यापकांमध्ये चांगलीच चर्चा रंगली. राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आले. एकीकडे मंत्रिमंडळ विस्तार रखडलेला असतानाच मंत्र्यांतील विसंगती दिसत आहे.

दि. १७ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध

### शिक्षणमंत्रीच म्हणाले, शिक्षणात आपण नापास!



वेतनेत्तर अनुदानासाठी नाहीत पैसे

शालेय शिक्षणावर एक लाख ४२ हजार कोटी रुपये खर्च होतात. त्यातील तब्बल ६२ हजार कोटी रुपये शिक्षकांच्या पगारावर खर्च होतात.

**मुलांच्या शिष्यवृत्तीची रक्कम वाढविण्यासाठी देखील सरकारकडे पैसे नाहीत, त्यामुळे संस्थांना वेतनेतर अनुदान देणे शक्य नाही.**

उलटपक्षी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीसारख्या सक्षम संस्थांनी पुढे यावे व त्यांनीच पैसा खर्च करून शिक्षणाच्या पायाभूत व अद्ययावत सुविधा उपलब्ध करून मुलांना शिक्षणाची संधी द्यावी, त्यांच्या शाळांना मान्यता देण्यासाठी शासनाचे अधिकारी अडविणार नाहीत. सर्व मान्यता दिल्या जातील.

Hello Pune
Page No. 1 Sep 27, 2022
Powered by: erelego.com

# खासगी महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वेतनाची जबाबदारी घेण्याचा प्रयत्न

## - चंद्रकांत पाटील

पुणे, दि. २६ (प्रतिनिधी) - खासगी शिक्षण संस्था शिक्षकांच्या पगाराचे कारण पुढे करत जादा शुल्क आकारतात. म्हणून राज्य सरकार अनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांप्रमाणे खासगी महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या वेतनाची जबाबदारी घेण्याबाबत प्रयत्न करीत आहेत, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रमांचे उद्घाटन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार सिद्धार्थ शिरोळे, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, विघ्नहरी महाराज देव, कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर आदी यावेळी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, सध्या उच्च शिक्षणासाठी १२ हजार कोटी खर्च होतात. जर, खासगी महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या वेतनासाठी जबाबदारी घेतल्यास आणखी एक हजार कोटी रुपये खर्च होतील. प्राध्यापकांच्या रिक्त जागा ही महत्त्वाची समस्या आहे. त्यामुळे राज्य शासनाने २ हजार ७२ प्राध्यापकांची भरती करण्यास मान्यता दिली आहे.

### पुण्याने बाहेरचा म्हटले, पण पालकमंत्री झालो

ज्या शिक्षण क्षेत्रात वीस वर्षे खर्ची घातली त्याच शिक्षण क्षेत्राचा मंत्री झालो. मला सतत पुण्याबाहेरचा, उपरा असे हिणवण्यात आले. मात्र, त्याच पुण्याचा मी आज पालकमंत्री आहे, याचा सर्वाधिक आनंद मला आहे, असे चंद्रकांत पाटील म्हणाले.

Saamana 27.9.2022

## *Digital Inauguration of New Academic Courses and Facilities in various Colleges under the aegis of Progressive Education Society, Pune-5*

### कमी खर्चात उत्तम दर्जाचे शिक्षण देण्याचा शासनाचा प्रयत्न : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

**पुणे :** गुणवत्तेचे शिक्षण कमी खर्चात मिळत नाही तोपर्यंत सामान्यांसाठी ते उपलब्ध होणार नाही. सामान्य जनतेला खाजगी संस्थांमधूनही कमी खर्चात उत्तम शिक्षण मिळावे यासाठी शासन प्रयत्न करेल, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रमांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार सिद्धार्थ शिरोळे, संस्थेचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, प्रा. शामकांत देशमुख, प्रा. सुरेश तोडकर, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, शिक्षण आणि आरोग्यावर विशेष लक्ष दिल्यास देशाच्या विकासाला चालना मिळू शकेल. त्यामुळे स्वस्त आणि उत्तम

**जीवनाला दिशा देणारे शिक्षण गरजेचे**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देशाचा आत्मा जागृत करणारे, गतवैभवाची जाणीव करून देणारे आणि भविष्यातील उन्नत ज्ञानाचा आग्रह धरणारे आहे. विद्यार्थ्यांनी प्रयोगशील असावे, त्या प्रयोगांना मान्यता मिळवावी आणि त्याच्या साहाय्याने समृद्धी प्राप्त करावी, अशी अपेक्षा आहे. या माध्यमातून जीवनाला दिशा देणारे आणि स्वावलंबी करणारे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे.

शिक्षण सुविधा सर्वांना उपलब्ध असणे आवश्यक आहे. यावर्षी काही महाविद्यालयांना भेट देऊन एफआरएने निश्चित केलेल्या शुल्काची तपासणी केली जाईल.

Kesari 27.9.2022

### शुल्क कमी करा, पगार देतो

#### खासगी महाविद्यालयांबाबत चंद्रकांत पाटील यांची भूमिका

**पुणे, ता. २६ :** खासगी संस्थांमार्फत घेण्यात येणाऱ्या भरमसाट शुल्कामुळे शिक्षण महागले आहे. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण हे काही जणांसाठीच मर्यादित राहत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण सगळ्यांपर्यंत पोचविण्यासाठी शिक्षण स्वस्त होणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य सरकार खासगी महाविद्यालये, संस्थांमधील प्राध्यापकांच्या वेतनाची जबाबदारी घेईल, महाविद्यालयांनी शुल्क कमी करावे," अशी भूमिका राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी मांडली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयांमधील विविध शैक्षणिक उपक्रमांच्या डिजिटल पद्धतीचे उद्घाटन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, कार्यवाह डॉ. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर आदी उपस्थित होते. पाटील म्हणाले, "उच्च शिक्षणात १२ हजार कोटी रुपये हे केवळ प्राध्यापकांच्या पगारावर खर्च होतात. खासगी महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या वेतनासाठी त्यात आणखी हजार कोटी रुपये लागतील. तेही उपलब्ध करून दिले जातील. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे शुल्क ८४ हजार रुपये आणि



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी सभागृह, शिवाजीनगर : सोसायटीच्या विविध उपक्रमांचे डिजिटल पद्धतीने उद्घाटन करताना चंद्रकांत पाटील. या वेळी डॉ. गजानन एकबोटे यांच्यासह मान्यवर.

खासगी महाविद्यालयाचे शुल्क २२ लाख रुपये आहे. या शुल्कातून प्राध्यापकांचे वेतन करत असल्याचे खासगी महाविद्यालयांकडून सांगण्यात येते." आता शुल्क नियमन प्राधिकरणाने शुल्क मान्य केलेल्या महाविद्यालयांपैकी १० टक्के महाविद्यालयांना भेटी देऊन प्रत्यक्ष खर्चाची पाहणी करणार असल्याचेही पाटील यांनी अधोरेखित करत शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या भ्रष्टाचारावर ताशेरे ओढले.

महाविकास आघाडी सरकारने विद्यापीठ कायद्यात केलेले बदल आम्हाला मान्य नाहीत. त्यामुळे राज्य सरकारने तो कायदा परत मागविला आहे. या बदलांना राज्य सरकारने मान्यता दिलेली नसल्याचेही पाटील यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक देशमुख यांनी, तर सूत्रसंचालन डॉ. निवेदिता एकबोटे यांनी केले.

**"राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील शंभर महाविद्यालयांमध्ये 'कॉम्बो अभ्यासक्रम' राबवण्यात येणार आहे. यात विद्यार्थ्यांना संबंधित करिअरच्या अनुषंगाने ७० टक्के अभ्यासक्रम, तर ३० टक्के अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांच्या आवडीच्या विषयाचा असेल. अशा पद्धतीने अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाविद्यालयांना प्रोत्साहन देण्यात येईल.**

**– चंद्रकांत पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

Sakaal 27.9.2022

## *Digital Inauguration of New Academic Courses and Facilities in various Colleges under the aegis of Progressive Education Society, Pune-5*

# प्राध्यापकांचे वेतन आम्ही देतो, तुम्ही शुल्क कमी करा

### खासगी महाविद्यालयांबाबत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे वक्तव्य

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्य सरकार उच्च शिक्षणाची जबाबदारी खासगी संस्थांवर ढकलून मोकळे झाले. राज्यातील खासगी महाविद्यालये जास्त शुल्क आकारत असल्याने शिक्षण महागडे झाले आहे. या शुल्कातून प्राध्यापकांचे वेतन करत असल्याचे महाविद्यालयांकडून सांगितले जाते. मात्र राज्य सरकार खासगी महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या वेतनाची जबाबदारी घेईल, महाविद्यालयांनी शुल्क कमी करावे, असे वक्तव्य राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रमांचे उद्घाटन डिजिटल पद्धतीने पाटील यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, आमदार सिद्धार्थ शिरोळे, कार्यवाह डॉ. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर, उपकार्यवाह निवेदिता एकबोटे आदी या वेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात महाविद्यालयातील इन्क्युबेशन सेंटर, व्हर्च्युअल प्रयोगशाळा, न्यूट्रिडिशन अॅप, आयपीआर सेंटरचे उद्घाटन; तसेच मुकुल माधव फाउंडेशनतर्फे अंध विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला.

पाटील म्हणाले, की उच्च शिक्षणासाठी १२ हजार कोटी खर्च होतात. खासगी महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या वेतनासाठी आणखी एक हजार कोटी रुपये लागतील. ते उपलब्ध करता येतील; पण गुणवत्तापूर्ण शिक्षण स्वस्तात मिळणे आवश्यक आहे, अन्यथा शिक्षण काही जणांसाठीच मर्यादित राहील. नव्या शैक्षणिक धोरणाला अनुसरून राज्यातील शंभर महाविद्यालयांमध्ये कॉम्बो अभ्यासक्रम राबवण्याची योजना आहे. यात ७० टक्के करिअरसाठीचा अभ्यासक्रम, तर ३० टक्के विद्यार्थ्यांच्या आवडीचे विषय शिकवले जातील. शिक्षणामध्ये होणारा गैरव्यवहार अतिशय वाईट आहे. शुल्क निर्धारण प्राधिकरणान शुल्क मान्य केलेल्या महाविद्यालयांपैकी १० टक्के महाविद्यालयांना भेट देऊन प्रत्यक्ष खर्चाची पाहणीच करणार आहे असेही पाटील यांनी नमूद केले.

डॉ. एकबोटे यांनी स्वायत्त महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणींबाबत स्पष्ट धोरणाची मागणी केली.

#### विद्यापीठ कायद्यातील बदल मान्य नाहीत

महाविकास आघाडीने विद्यापीठ कायद्यात केलेले बदल मान्य नाहीत. या बदलांना मान्यता दिली जाणार नाही. त्यामुळे शासनाने तो कायदा आता परत मागवला आहे, असेही पाटील म्हणाले.

#### शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जोमाने

महाविकास आघाडीच्या काळात शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी ठप्प होती. मात्र आता केंद्र सरकारनुसार धोरणाची जोमाने अंमलबजावणी करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

#### पुण्याने बाहेरचा म्हटले; पण पुण्याचा पालकमंत्री झालो

माझे वडील गिरणी कामगार होते, मी वस्त्रोद्योगमंत्री झालो. शिक्षण क्षेत्रात वीस वर्षांहून अधिक काळ काम केले आणि आता उच्च शिक्षण मंत्री झालो. पुण्याने मला बाहेरचा, उपरा म्हटले; पण आता पुण्याचा पालकमंत्री झालो. मला बाहेरचा म्हटल्याने काही फरक पडत नाही. मी कधी अपयश पाहिलेले नाही, अशी टिप्पणीही पाटील यांनी केली.

लोकसत्ता Tue, 27 September 2022
https://epaper.loksatta.com/c/70297959

पुणे

# वेतन आम्ही देतो, शुल्क कमी करा!

### उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे खासगी वैद्यकीय महाविद्यालयांना आवाहन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २६ -** सरकारी मेडिकल महाविद्यालयाचे शुल्क ८४ हजार, तर खासगी महाविद्यालयांचे शुल्क २२ लाख रुपये आहे. प्राध्यापकांचे वेतन द्यायचे म्हणून शुल्कवाढ केली जाते. त्यामुळे शिक्षण महाग झाले आहे. आता खासगी महाविद्यालयांतील 'प्राध्यापकांचे वेतन आम्ही देतो, तुम्ही शुल्क कमी करा,' असे विधान राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. त्यावरून खासगी महाविद्यालयांतील प्राध्यापकांचे वेतन राज्य सरकारकडून करण्यात येणार असल्याचे स्पष्ट संकेत पाटील यांनी आज दिले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयांतील शैक्षणिक उपक्रमांचे उद्घाटन पाटील यांच्या हस्ते झाले. त्यानंतर ते बोलत होते. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, आमदार सिद्धार्थ शिरोळे, कार्यवाह डॉ. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर आदी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात महाविद्यालयातील इन्क्युबेशन सेंटर, व्हर्च्युअल प्रयोगशाळा, न्यूट्रिडिशन अॅप, आयपीआर सेंटरचे उद्घाटन तसेच मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे अंध विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला.

पाटील म्हणाले, "उच्च शिक्षणातील प्राध्यापकांच्या वेतनासाठी १२ हजार कोटी खर्च होतात.

खासगी महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या वेतनासाठी आणखी हजार कोटी रुपये लागतील. ते उपलब्ध करता येतील, पण गुणवत्तापूर्ण शिक्षण स्वस्तात मिळणे आवश्यक आहे. अन्यथा शिक्षण काही जणांसाठीच मर्यादित राहील. शिक्षणामध्ये होणारा गैरव्यवहार अतिशय वाईट आहे. शुल्क निर्धारण प्राधिकरणाने शुल्क मान्य केलेल्या महाविद्यालयांपैकी १० टक्के महाविद्यालयांना भेट देऊन प्रत्यक्ष खर्चाची पाहणीच करणार आहे," असेही पाटील यांनी नमूद केले. डॉ. एकबोटे यांनी स्वायत्त महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणींबाबत स्पष्ट धोरणाची मागणी केली.



**पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रमांचे उद्घाटन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी विघ्नहरी महाराज देव, डॉ. गजानन एकबोटे, सिद्धार्थ शिरोळे, ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर आदी उपस्थित होते.**

#### बाहेरचा म्हटल्याने फरक पडत नाही

माझे वडील गिरणी कामगार होते. आता वस्त्रोद्योगमंत्री झालो. शिक्षण क्षेत्रात वीस वर्षांहून अधिक काळ काम केले आणि उच्च शिक्षण मंत्री झालो. पुण्याने मला बाहेरचा, उपरा म्हटले; पण आता पुण्याचा पालकमंत्री झालो. मला बाहेरचा म्हटल्याने काही फरक पडत नाही. मी कधी अपयश पाहिलेले नाही, असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. तसेच महाविकास आघाडीने विद्यापीठ कायद्यात केलेले बदल मान्य नाहीत. या बदलांना मान्यता दिली जाणार नाही. त्यामुळे शासनाने तो कायदा आता परत मागवला आहे, असेही पाटील म्हणाले.

Prabhat 27.9.2022

## *Digital Inauguration of New Academic Courses and Facilities in various Colleges under the aegis of Progressive Education Society, Pune-5*

# आधी रिक्त पदे, शिष्यवृत्तींचे प्रलंबित प्रश्न सोडवा

### उच्च शिक्षण क्षेत्रातून नाराजीचा सूर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** उच्च शिक्षणातील ५० टक्क्यांहून अधिक पदे रिक्त आहेत, अनुदानित महाविद्यालये आणि विद्यापीठांतील प्राध्यापकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असणे, शिष्यवृत्तीची रक्कम थकणे असे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न आधी सोडवून मग शासनाने विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापकांचे वेतन देण्याचा विचार करावा, असा सूर उच्च शिक्षण क्षेत्रातून उमटत आहे.

पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयातील कार्यक्रमात सोमवारी पाटील यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण स्वस्तात मिळण्यासाठी विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांचे वेतन शासन देईल, महाविद्यालयांनी शुल्क कमी करावे असे विधान केले होते. या विधानानंतर उच्च शिक्षण क्षेत्रात चर्चा सुरू झाली आहे. आर्थिक अडचणी असल्याचे सांगत शासनाकडून प्राध्यापक भरती, उच्च शिक्षणातील रिक्त पदांच्या भरतीकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. मग विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांचे वेतन देण्याचा विचार करताना शासनाला आर्थिक अडचणी दिसत नाहीत का, असा प्रश्नही उपस्थित करण्यात येत आहे.

एमफुक्टो या संघटनेचे डॉ. प्रवीण रघुवंशी म्हणाले, की विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे वेतन शासनाने देण्याचा विचार उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मांडला जो स्वागतार्ह आहे. या बाबतची मागणी एमफुक्टोने या पूर्वीच केली आहे. पण उच्च शिक्षणातील ५० टक्क्यांहून अधिक संविधानिक पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याचा विचार शासनाने आधी करायला हवा. शासनाची एकूण आर्थिक परिस्थिती पाहता उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे विधान काल्पनिक वाटते.

विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वेतनाची जबाबदारी घेण्यास शासन अनुकूलता दर्शवत असेल तर अकृषी विद्यापीठे, अकृषी खासगी अनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांची सर्व रिक्त पदे भरण्यास शासन का तयार नाही, याचा खुलासा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी करण्याची मागणी नेट-सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीचे राज्य समन्वयक सुरेश देवढे पाटील यांनी केली.

### शिष्यवृत्तीची रक्कम थकीत

खासगी संस्थांतील प्राध्यापकांचे वेतन देण्यास उच्च व तंत्रशिक्षणमंत्री तयार आहेत. पण गेल्या दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या प्रवेशापोटी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीचे तीन हजार कोटी थकले आहेत. हा निधी मिळत नसल्याने संस्था आर्थिक अडचणीत आहेत, असे असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंट ऑफ अनएडेड इन्स्टिट्यूट्स इन रुरल एरियाचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 28 September 2022 https://epaper.loksatta.com/c/70309792

पुढारी

# कमी खर्चात दर्जेदार शिक्षण देऊ

- उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आश्वासन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

गुणवत्तेचे शिक्षण कमी खर्चात मिळत नाही तोपर्यंत सामान्यांसाठी ते उपलब्ध होणार नाही. सामान्य जनतेला खासगी संस्थांमधूनही कमी खर्चात उत्तम शिक्षण मिळावे यासाठी शासन प्रयत्न करेल, असे मत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रमांचे उद्घाटन डिजिटल पद्धतीने पाटील यांच्या हस्ते झाले. त्यानंतर ते बोलत होते. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, आमदार सिद्धार्थ शिरोळे, कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे आदी यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील इन्क्युबेशन सेंटर, व्हर्च्युअल प्रयोगशाळा, आयपीआर सेंटरचे उद्घाटन तसेच मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे अंध विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला.

पाटील म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाला अनुसरून राज्यातील शंभर महाविद्यालयांमध्ये कॉम्बो अभ्यासक्रम राबवण्याची योजना आहे. ज्यात ७० टक्के करिअरसाठीचा अभ्यासक्रम, तर ३० टक्के विद्यार्थ्यांच्या आवडीचे विषय शिकवले जातील. शुल्क निर्धारण प्राधिकरणाने शुल्क मान्य केलेल्या महाविद्यालयांपैकी १० टक्के महाविद्यालयांना भेट देऊन प्रत्यक्ष खर्चाची पाहणी करणार आहे.



अंध विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करताना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह इतर मान्यवर.

### पुण्याने बाहेरचा म्हटले; पण पालकमंत्री झालो

माझे वडील गिरणी कामगार होते, आता वस्त्रोद्योगमंत्री झालो, शिक्षण क्षेत्रात वीस वर्षांहून अधिक काळ काम केले आणि उच्चशिक्षणमंत्री झालो. पुण्याने मला बाहेरचा, उपरा म्हटले; पण आता पुण्याचा पालकमंत्री झालो. मला बाहेरचा म्हटल्याने काही फरक पडत नाही. मी कधी अपयश पाहिलेले नाही, अशी टिपणीही पाटील यांनी केली.

My Pune Edition
Sep 28, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *Digital Inauguration of New Academic Courses and Facilities in various Colleges under the aegis of Progressive Education Society, Pune-5*

# 'कॉलेजांचे शुल्कप्रस्ताव वेबसाइटवर द्यावेत'

### अभ्यासकांकडून मंत्र्यांना सूचना

म. टा. प्रतिनिधी, पुणे



चंद्रकांत पाटील

'शुल्क नियामक प्राधिकरणाकडे (एफआरए) शुल्क ठरविण्यासाठी कॉलेजांकडून प्रस्ताव पाठविले जातात. माहिती आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे हे प्रस्ताव सार्वजनिक स्वरूपात वेबसाइटवर उपलब्ध करून दिल्यास, विद्यार्थी-पालकांना कॉलेजच्या कामकाजाविषयी माहिती होईल; तसेच त्यांना प्रवेश घेताना फायदा होईल,' अशी सूचना अभ्यासक आणि तज्ज्ञांकडून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना करण्यात आली आहे. पाटील यांनी 'एफआरए'च्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यानंतर, ही मागणी पुढे आली आहे.

Of the 24,623 students who were allotted colleges, 17,641 students were given the college of their first preference; 3,210 students the college of their second preference; and 1,545 the college of their third preference, according to education department officials.

Till now in this academic year, a total of 105,989 students have registered for the 110,990 total available Class 11 seats while 50,813 students have taken admission in 315 junior colleges in the first three regular rounds.

Over the last two academic years, Class 11 admissions have gone on till December as a special round process was ongoing and students were reluctant to take admissions.

Rajendra Zunjarrao, principal, Modern College of Arts Science and Commerce, Shivajinagar, said, "The Class 11 admission process has reached up to the first special round and it is feared that even this year, a large number of seats will remain vacant across colleges in Pune.

If the admission process goes on till year-end, it will be a challenge for all the colleges to complete the syllabus for FYJC students due to the delayed admission process. If admissions had been completed earlier, colleges would have started offline classes much earlier and now we are planning extra classes to cover the syllabus of students who will get admitted."

Hindustan Times 6.9.2022

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

सकाळ

## पुरुषोत्तम करंडकाची अंतिम फेरी उद्यापासून

पुणे, ता. १५ : महाराष्ट्रीय कलोपासक आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची चुरस आता अंतिम टप्प्यात आली आहे. शनिवारी (ता. १७) व रविवारी (ता. १८) नऊ संघांमध्ये भरत नाट्य मंदिर येथे स्पर्धेची अंतिम फेरी रंगणार असून रविवारी रात्रीच करंडक कोणाकडे जाणार, याचा निर्णय होणार आहे.

प्राथमिक फेरीत ५१ संघांचे सादरीकरण झाले होते. यातून अंतिम फेरीसाठी नऊ सर्वोत्तम एकांकिका निवडण्यात आल्या. यंदा करंडक आपल्याच महाविद्यालयात आणण्याच्या जिद्दीने या संघांनी जय्यत तयारी केली. प्राथमिक फेरीचा निकाल जाहीर झाल्यानंतर अंतिम फेरीची तयारी करण्यासाठी या संघांना सुमारे १७ दिवसांचा कालावधी मिळाला.

कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालयाची आकांक्षा पन्हाळे म्हणाली, "प्राथमिक फेरीतील सादरीकरण चांगले झाल्याने आम्ही एकांकिकेत आमूलाग्र बदल केला नाही. परीक्षक आणि प्रेक्षकांनी दिलेल्या प्रतिक्रियांनुसार काही बदल केले आहेत."

'पीआयसीटी'चा अनिकेत बंग म्हणाला, "टीमवर्कवर भर दिला आहे. नशिबाच्या चिठ्ठीतून प्रवेश मिळाल्याने तयारीला कमी वेळ मिळाला होता. त्यामुळे आता अंतिम फेरीसाठी मिळालेला वेळ तयारीसाठी वापरण्यावर भर दिला आहे."

### वेळापत्रक

- **शनिवार (ता. १७) : सायंकाळी ५ ते ८** : फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे - आद्य, मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर - गाभारा, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड - अहो, ऐकताय ना?
- **रविवार (ता. १८) : सकाळी ९ ते १२** : टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, पुणे - काय झाडी, काय डोंगार, काय हाटील, कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे - चाराणे, पीआयसीटी महाविद्यालय, पुणे - कलिगमन
- **सायंकाळी ५ ते ८** : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती - भू भू, डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी - एक्स्पायरी डेट, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे - ओंजळभर चंद्र

Pune, Main
16/09/2022 Page No. 3

पुढारी

## 'पुरुषोत्तम करंडक'ची अंतिम फेरी आजपासून

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या 'पुरुषोत्तम करंडक' आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी ज्या जल्लोषात पार पडली, त्याच जोशात अन् उत्साहात स्पर्धेची अंतिम फेरी शनिवारी (दि. १७) आणि रविवारी (दि. १८) रंगणार आहे.

अंतिम फेरीत नऊ महाविद्यालयांच्या संघांची निवड करण्यात आली आहे. भरत नाट्य मंदिरात स्पर्धेची अंतिम फेरी रंगेल आणि रविवारी (दि. १८) रात्री उशिरा स्पर्धेचा निकाल जाहीर होईल.

स्पर्धेसाठी प्रत्येक जण नव्या दमाने आणि ऊर्जेने कामाला लागला असून, अंतिम फेरीत आत्मविश्वासाने एकांकिकांचे सादरीकरण करण्यास प्रत्येक जण तयार आहे. शनिवारी (दि. १७) सायंकाळी पाच ते रात्री आठ या वेळेत फर्ग्युसन महाविद्यालय (आद्य), मॉर्डन कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय (गाभारा) आणि मॉर्डन महाविद्यालय, गणेशखिंड (अहो, ऐकताय ना?) हे संघ सादरीकरण करणार आहेत.

रविवारी (दि. १८) सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय (काय झाडी, काय डोंगार, काय हाटील), कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालय (चाराणे) आणि पीआयसीटी महाविद्यालय (कलिगमन) या महाविद्यालयांचे संघ सादरीकरण करतील. याच दिवशी सायंकाळी पाच ते रात्री आठ या वेळेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती (भू-भू), डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी (एक्सपायरी डेट) आणि अभियांत्रिकी महाविद्यालय (ओंजळभर चंद्र) या महाविद्यालयांच्या संघांचे सादरीकरण पाहता येणार आहे.

Pune Edition
Sep 17, 2022 Page No. 11
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

सकाळ

## हौस ऑफ बांबू

कु. सरोज चंदनवाले

# 'पुरुषोत्तम'ची तिसरी घंटा!

नमस्कार! ''संध्याकाळच्या सुमारास रोज नट्टापट्टा करून कुठे जाता हो,?'' या उर्मट सवालाकडे तितक्याच उर्मटपणाने दुर्लक्ष करून मी रिक्षा पकडली. रिक्षावाल्यास म्हटलं, ''सदाशिव चलो!'' तर तो चटकन म्हणाला, '' परसोत्तम को जाना है क्या? चलो, मैं वहीं जा रहा हूं...'' पुण्यातल्या रिक्षाचालकाची अभिरूची पाहून अभिमान वाटला...

तसं बघायला गेलं तर (आमच्या) पुण्यात ॲम्फीथिएटरं आणि एकांकिका स्पर्धांचा सुकाळु आहे. पुरुषोत्तम, फिरोदिया, विनोदोत्तम...बऱ्याच चांगल्या चांगल्या स्पर्धा होत असतात. पण...पण...विश्वाचा केंद्रबिंदू म्हणून त्रैलोक्यात प्रसिद्ध असलेली आमची सदाशिव पेठ. त्या सदाशिव पेठेचं केंद्रक म्हणजे भरत नाट्य मंदिर, आणि तिथं नव्या कलावंतांची वाट पाहात तिष्ठणारा पुरुषोत्तम करंडक हे त्या केंद्रकाचं केंद्रक!!

'जीवलगा, कधी रे नेशील तू?' असं जणू तो करंडक तरुण कलावंतांना विचारतो आहे. इथंच महाराष्ट्राच्या नाट्यकलेची गंगोत्री आहे बरं का! या करंडकातून कितीतरी नामवंत सेलेब्रिटी भळाभळा बाहेर पडले. (अरे, सारंग, निपुण, आलोक, अतुल, पर्ण, गिरीजा, अमेय... ऐकताय ना?तुम्हाला सेलेब्रिटी म्हणतेय..!! )तेथे सध्या तारुण्याचा जो उत्सव सुरु आहे, त्याला तोड नाही. राजकारणातली नाटकं काय बारमाही चालू असतात, पण इथं पुरुषोत्तम करंडकासाठी महाविद्यालयातली मुलं-मुली जे काही करताहेत, ते बघून च्याट पडायला झालं...

भरत नाट्यमंदिरातलं वातावरण भारलेलं होतं. पहावं तिथं तारुण्याचे ताटवे. ती बॅकस्टेजची धावपळ. तोंडाला रंग लावून विंगेत उभी असलेली ती हुरहुरलेली मुलं. मागल्या



बाजूनं नेपथ्याचे फलाट आणण्याची धडपड...केस पिकलेल्या बुजुर्गांच्या अखेरच्या क्षणी येणाऱ्या सूचना. नाट्यगृहातल्या आरोळ्या...मन कैक वर्षं मागे गेलं. तरी बरं, मी अजून तरुण आहे! 'महाराष्ट्रीय कलोपासक'तर्फे पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेचं करडं आयोजन केलं जातं. आयोजनात इतका करडेपणा असतो की काही लोक त्याला 'पुरुषोत्तम करडक' असंच म्हणतात. पण ते असो.

'पुरुषोत्तम'मध्ये रंगायला मिळावं म्हणूनही अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी कॉलेजांमध्ये प्रवेश घेतात, ही वस्तुस्थिती आहे. काही तर मुक्कामी राहतातसुद्धा!! गेल्या महिनाभरात प्राथमिक फेरी पार पडली. ५१ मधल्या नऊ एकांकिका अंतिम फेरीत आल्या आहेत. अंतिम फेरीत प्रवेश केलेल्या एकांकिकांमध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय (बारामती)ची 'भू भू', फर्ग्युसन महाविद्यालयाची 'आद्य', डीवाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय (आकुर्डी)ची 'एक्स्पायरी डेट', कमिन्स अभियांत्रिकीची 'चाराणे', पीआयसीटी महाविद्यालयाची 'कलिगमन', मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय (शिवाजीनगर)ची 'गाभारा', मॉडर्न महाविद्यालय (गणेशखिंड) संघाची 'अहो, ऐकताय ना', अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे संघाची 'ओंजळभर चंद्र' आणि टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय संघाची 'काय झाडी, काय डोंगार, काय हाटील' या एकांकिकांचा समावेश आहे.

गेल्या वेळेला बीएमसीसीनं करंडक नेला होता. काय अप्रतिम एकांकिका होती- 'मंजम्मापुरामण'! दुसऱ्या क्रमांकाची नगरच्या पेमराज सारडाची 'सहल'ही टॉप क्लास होती. यंदा हे दोन्ही संघ फायनलला आले नाहीत. याउलट 'पीआयसीटी'च्या संघाला नशिबाच्या चिठ्ठीनं हात दिला, म्हणून स्पर्धेत स्थान मिळालं, आणि आज ही मंडळी चक्क फायनलला आली आहेत! नाट्यकलेचा प्रवाह बदलतोय, याचंच हे चिन्ह म्हणायचं. शनिवार-रविवारी सकाळ-संध्याकाळच्या तीन सत्रात नऊ एकांकिका होतील. रविवारी रात्री करंडकाचा धनी ठरेल! नेमके कोण फेवरिट आहे, हे मी काही सांगणार नाही. हा उत्साह, एनर्जी अशीच टिकून राहो!! आखिर विश्वाच्या केंद्राच्या इज्जतीचा सवाल आहे. अरे, आव्वाज कुणाचा...पुरुषोत्तमचा!!

या स्पर्धेत उतरलेल्या सर्वच कलावंतांना आणि नवरंगकर्मींना शुभेच्छा!

Pune, Main
17/09/2022 Page No. 6

लोकमत

# परीक्षकांचा निर्णय अजब...पण मान्य!

## पुरुषोत्तम करंडकमधील कलावंतांच्या प्रतिक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : पुणे विभागातील प्राथमिक फेरीतल्या ८० एकांकिका परीक्षकांनी पाहिल्या, त्यातील नऊ एकांकिका त्यांनी अंतिम फेरीत पात्र ठरवल्या.

प्राथमिक फेरीतील परीक्षकांनी अंतिम फेरीत पोहोचलेल्या नऊ एकांकिकांचे तोंड भरून कौतुक केले. त्यांनी आमच्या जमेच्या बाजू आणि सुधारणा करण्याजोगे अनेक मुद्दे सुचविले. सकारात्मक आणि नकारात्मक बाबीही त्यांनी स्पष्ट केल्या.

मात्र अंतिमला परीक्षक बदलले आणि एकही एकांकिका पुरुषोत्तमच्या लायक नाही, असा टोकाचा निर्णय दिला.

हा निर्णय एकूण आम्हाला अजब वाटलं; पण परीक्षकांचा निर्णय अंतिम असतो ही अटच असल्याने ते आम्हाला मान्य करावेच लागेल, असा सूर करंडक स्पर्धेत सहभागी झालेल्या कलावंत विद्यार्थ्यांनी आळवला.

> प्रथम आलेल्या संघाला पुरुषोत्तम करंडक दिला नाही, याची खंत आहे. आम्ही दुसऱ्या क्रमांकावर आहोत आणि आम्हाला महाकरंडकमध्ये प्रवेश मिळाला, याचा आनंद आहे. मात्र, परीक्षकांना वाटत असेल की, पुणे विभागात पुरुषोत्तमसाठी एकही संघ पात्र नाही, तर आम्ही डिसेंबरमध्ये होणाऱ्या महाकरंडकमध्ये आणखी तयारी करू.
>
> **- सौरभ पांढरे, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती**

> पुरुषोत्तम करंडक देणार नाही, हा निर्णय ऐकून आम्ही अचंबित झालो. असा निर्णय असू शकतो, यावर आमचा विश्वासच बसला नाही. मात्र, परीक्षकांचा निर्णय अंतिम असल्याने तो आम्हाला मान्य आहे. आम्ही तिसऱ्या क्रमांकावर असल्याने आमचा करंडक दिला गेला त्याचा आनंद आहे. त्यामुळे आम्ही महाकरंडकची तयारी सुरू केली आहे.
>
> **- प्रांचिका पोतदार, मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पुणे**

Hello Pune
Page No. 8 Sep 20, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकमत

# कसदार, गुणवत्तापूर्ण काम करणाऱ्याला उथळपणाचे वावडे हवेच

## वामन केंद्रे : पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेचे पारितोषिक वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्याचा काळ हा सन्मान न देण्याचा आहे. सगळीकडे उथळपणाचा उदोउदो सुरू आहे. उथळपणा करणारे लाखो रुपये कमवत आहेत आणि कसदार माणसं मागे राहिली आहेत. जगभरात ही लहर आहे. या लहरीचे आपण शिकार होऊ नये याची भीती वाटणे गरजेचे आहे. कसदार, गुणवत्तापूर्ण काम करणाऱ्याला उथळपणाचे वावडे असले पाहिजे, असे स्पष्ट मत नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे माजी संचालक व ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक वामन केंद्रे यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

महाराष्ट्रीय कलोपासक आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका



**महाराष्ट्रीय कलोपासक आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस 'पीआयसीटी' महाविद्यालयाच्या 'कलिगमन' या एकांकिकेला मिळाले. यावेळी ज्येष्ठ रंगकर्मी वामन केंद्रे, स्पर्धेच्या परीक्षक पौर्णिमा मनोहर, स्वाती महाळंक, महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेचे अध्यक्ष अनंत निघोचकर उपस्थित होते.**

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. भरत नाट्य मंदिरमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला स्पर्धेच्या परीक्षक पौर्णिमा मनोहर, स्वाती महाळंक, आशुतोष नेर्लेकर, महाराष्ट्रीय कलोपासकचे अध्यक्ष अनंत निघोचकर उपस्थित होते.

मराठी माणूस नाटक आणि कलाप्रकारासाठी वेडा आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात लोकाश्रयावर दोनशे वर्षांपेक्षा जास्त काळ नाटकांची परंपरा टिकून आहे, असे सांगून केंद्रे पुढे म्हणाले, स्पर्धा म्हणजे पारितोषिक जिंकणे असले तरी ते अंतिम सत्य नाही. 'घाशीराम कोतवाल' आणि 'झुलवा' ही नाटके महाराष्ट्राच्या नव्हेतर, भारतीय रंगभूमीवरील मैलाची दगड ठरली आहेत. पण, त्यांना कधीही पारितोषिके मिळाली नाहीत. म्हणून नाटक थांबले का? पारितोषिक आवश्यक असले तरी सध्याच्या काळात उथळपणाचा उदोउदो सुरू आहे. कसदार काम करणारे लोक मागे पडले आहेत. अपयश ही यशाची पहिली पायरी असते. माणसे अल्पसंतुष्ट राहणे हेच सगळ्यात समाधान आहे. सर्वोत्तमाचे स्वप्न पडले पाहिजे. ज्याला सूत्र सापडत नाही तरी जो कार्यरत असतो तोच सर्जनशील आत्मा असतो. स्वतःला डिसमेंटल करून बघणे हा रिस्क घेण्याचा संस्कार नाटक करू शकते.

परीक्षकांच्या वतीने पौर्णिमा मनोहर, स्वाती महाळंक यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे चिटणीस राजेंद्र ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले.

स्पर्धेतील सांघिक प्रथम क्रमांकाचे बक्षीस 'पीआयसीटी' महाविद्यालयाच्या 'कलिगमन' या एकांकिकेला तर बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या 'भू-भू' या एकांकिकेला द्वितीय आणि शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या 'गाभारा' एकांकिकेला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. या वर्षी सर्वोत्कृष्ट सांघिक कलाकृतीला देण्यात येणारा पुरुषोत्तम करंडक कोणत्याही संघाला मिळाला नाही. 'अरे, आवाज कुणाचा?'च्या निनादात विजेत्यांनी परिसर दणाणून सोडला.

Hello Pune
Page No. 2 Sep 24, 2022
Powered by: erelego.com

# नामांकित महाविद्यालये झाली 'हाउसफुल्ल'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

**मिशन ॲडमिशन**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील नामांकित कनिष्ठ महाविद्यालये 'हाउसफुल्ल' झाली आहेत. या महाविद्यालयांमधील अकरावी प्रवेशांच्या सर्व जागांवर प्रवेश निश्चित झाल्याने शिक्षण विभागाकडून, अशा महाविद्यालयांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. आता अकरावी प्रवेशांसाठी अजूनही वाट पाहत असलेल्या विद्यार्थ्यांना नामांकित महाविद्यालय वगळून इतर महाविद्यालयांचा पर्याय स्वीकारावा लागणार आहे.

माध्यमिक शिक्षण विभागाकडून पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील प्रवेशांच्या रिक्त जागा संपलेल्या १४० महाविद्यालयांची यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (बीएमसीसी), स. प. महाविद्यालय, मॉडर्न कॉलेज, आबासाहेब गरवारे, गरवारे वाणिज्य महाविद्यालय, सिम्बायोसिस, वाडिया महाविद्यालय अशा महाविद्यालयांसह सर्व नामांकित महाविद्यालयामधील प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाली असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. यामुळे आता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उर्वरित १७६ महाविद्यालयामध्ये प्रवेश निश्चित करणे बंधनकारक राहील. प्रवेश प्रक्रिया जशी पुढील फेरीमध्ये जात होती तसतसे काही नामांकित महाविद्यालयाचे 'कट ऑफ' कमी होण्याऐवजी वाढत गेले.

अजूनही अकरावीला प्रवेश मिळू न शकलेल्या विद्यार्थ्यांना एक ऑक्टोबरपर्यंत प्रवेश घेता येणार आहेत. यासाठी दररोज एक गुणवत्ता फेरी राबवण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना त्याच दिवशी अर्जात बदल करून तातडीने प्रवेश घ्यावे लागणार आहेत.

Maharashtra Times 29.9.2022

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

# अकरावी प्रवेश प्रक्रियेतील महाविद्यालयांचा पसंतीक्रम ठरवण्यासाठी आजचा दिवस शेवटचा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या प्रवेशासाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष प्रवेश फेरीला मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे अर्ज प्रक्रिया अपूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना आज आपले पसंतीक्रम भरून अर्जप्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. सोमवारी (५ सप्टेंबर) ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश जाहीर होतील, त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीकडून पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. आतापर्यंत झालेल्या तीन फेऱ्यांमधून एकूण ४५,५६३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या प्रक्रियेत सध्या अर्जातील भाग एक पूर्ण न केलेले ५,०३७ विद्यार्थी, पडताळणी बाकी असलेले १३७८ विद्यार्थी, तर अर्जाचा भाग दोन पूर्ण न भरलेले ५१,४०९ विद्यार्थी आहेत.

या विद्यार्थ्यांना प्रवेशाची शेवटची संधी म्हणून विशेष फेरीत सहभागी होण्याची संधी म्हणून ही मुदतवाढ देण्यात आली आहे. आज (शुक्रवार, २ सप्टेंबर) अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याची शेवटची तारीख असून ही प्रक्रिया पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची निवड यादी सोमवारी, ५ सप्टेंबरला प्रसिद्ध होणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना गुरुवार, ८ सप्टेंबरपर्यंत महाविद्यालयांमध्ये कागदपत्रे आणि शुल्कासह प्रवेश निश्चित करायचा आहे. याच पद्धतीने कोटांतर्गत विशेष फेरी आणि बायफोकलची प्रवेश प्रक्रियाही सुरू राहणार आहे. विद्यार्थी आणि पालकांना प्रवेश फेरीचे सुधारित वेळापत्रक अकरावी प्रवेशाच्या संकेतस्थळावर पाहता येईल.

लोकसत्ता Fri, 02 September 2022
https://epaper.loksatta.com/c/69960541

# दोन वर्षांनंतर होणार आविष्कार स्पर्धा

## यंदा आयोजनाचा मान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांमधील संशोधन आणि नवविचाराला चालना देणारी आविष्कार स्पर्धा दोन वर्षांच्या खंडानंतर यंदा घेण्यात येणार आहे. यंदा या स्पर्धेच्या आयोजनाचा मान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला मिळाला आहे. कोरोनामुळे मागील दोन वर्षे ही स्पर्धा होऊ शकली नव्हती.

महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल एस. एम. कृष्णा यांच्या प्रयत्नातून २००६ पासून ही राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धा आयोजित केली जाते. यंदाची ही स्पर्धा १५ सप्टेंबरपर्यंत विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये तसेच २५ ते ३० वर्ष जुन्या महाविद्यालयांमध्ये राबविण्यात यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

> मागील दोन वर्षे या स्पर्धा झाल्या नसल्याने यंदा मुलांना खूप मोठी संधी आहे. तसेच आयोजनाचा मानही आपल्याला मिळाल्याने विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होत विद्यापीठाला आणखी उंचीवर न्यावे.
>
> **डॉ. संजीव सोनवणे,** प्र- कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> दरवर्षी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातून साधारण अकराशे विद्यार्थी तसेच प्राध्यापक या स्पर्धेत सहभागी होतात. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थी व शिक्षकांनी केलेली अनेक चांगली व समाजोपयोगी संशोधने समोर आली आहेत.
>
> **- डॉ. सुप्रिया पाटील,** संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

याबाबत विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता आणि सिद्धता कक्षाच्या संचालक डॉ. सुप्रिया पाटील म्हणाल्या, 'ही स्पर्धा सुरुवातीला महाविद्यालय स्तरावर, त्यानंतर विभागीय स्तरावर, मग जिल्हा आणि त्यानंतर विद्यापीठ स्तरावर होते. विद्यापीठ स्तरावरून मग राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेत पदवी अभ्यासक्रम शिकणारे, पदव्युत्तर, संशोधनाचे विद्यार्थी तसेच प्राध्यापकदेखील सहभागी होऊ शकतात. यातील विद्यार्थ्यांना रोख पारितोषिकांसोबतच शिष्यवृत्तीदेखील देण्यात येते.'

'या वर्षाअखेर यंदाची अंतिम स्पर्धा होणे अपेक्षित आहे. याबाबत अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेस्थळावर विद्यार्थ्यांना पाहता येईल,' असे सहायक कुलसचिव श्रीकांत गायकवाड यांनी सांगितले.

Pudhari 2.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# दोन महिन्यांत नवे कुलगुरू

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'कुलगुरू निवडीसंदर्भातील नवीन कायदा अस्तित्वात आलेला नाही. त्यामुळे जुन्याच कायद्यानुसार सर्व नियुक्त्या केल्या जाणार आहेत. येत्या दोन महिन्यांत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह चार विद्यापीठांमधील कुलगुरूंच्या नियुक्त्या जुन्याच कायद्यानुसार केल्या जातील,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

**चंद्रकांत पाटील यांची माहिती**

पाटील म्हणाले, 'कोरोनामध्ये ज्या विद्यार्थ्यांचे दोन्ही पालक मृत्युमुखी पडले त्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आले आहे. त्यासाठी शासनाकडून २ कोटी ७९ लाख रुपये देण्यात आले आहेत. यामध्ये वैद्यकीय आणि कृषीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग नाही, परंतु लवकरच त्यांचाही सहभाग करण्यात येणार आहे. त्याचबरोबर कोरोनामुळे ज्या विद्यार्थ्यांचे एक पालक मृत्युमुखी पडले आहेत. त्यावरदेखील सकारात्मक निर्णय घेण्यात येणार आहे.

माजी खासदार सुरेश कलमाडी यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, तरीदेखील पुणे फेस्टिव्हलला आपण जाणार आहात का, असा प्रश्न पत्रकारांनी पाटील यांना विचारला असता पाटील म्हणाले, 'आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणजे आपण सणांमध्ये एकमेकांच्या घरी जात असतो. त्यामुळे सध्या अनेक राजकीय नेते एकमेकांच्या घरी जात आहेत. कलमाडी यांनी सुरू केलेल्या फेस्टिव्हलला जाणे म्हणजे त्यांचे गुन्हे माफ करणे नाही. त्यामुळे गणेश फेस्टिव्हलला जाणारच आहे.'

पाटील म्हणाले, 'गणपती उत्सवानिमित्त रस्त्यावर वाहनांची प्रचंड गर्दी होती. एका ठिकाणी तत्काळ जाणे गरजेचे असल्यामुळे वाहतूक पोलिसांच्या गाडीवर बसलो. दुचाकी चालविण्याच्या तयारीने आलो नव्हतो.

Pudhari 2.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# वर्षअखेरीस नवे कुलगुरू?

## निवडीसाठी तीन महिन्यांचा कालावधी; सध्या धुरा प्रभारींवर

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नव्या कुलगुरूंची निवड आता जुन्या सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसार होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. नव्या कुलगुरूंच्या निवडीसाठी समिती जाहीर होणे, निवड प्रक्रियेची जाहिरात प्रसिद्ध होणे, अर्जांसाठी मुदत, पडताळणी, मुलाखत अशी प्रक्रिया लक्षात घेता विद्यापीठाला नवे कुलगुरू डिसेंबरअखेरपर्यंत मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यापीठातील प्रभारी कुलगुरूंची कारकीर्द सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ लांबण्याची शक्यता आहे.

राज्यात भाजप आणि शिवसेनेचे युती सरकार असताना २०१६मध्ये नव्या सार्वजनिक विद्यापीठ कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. कालातंराने महाविकास आघाडी सरकारने सार्वजनिक विद्यापीठ कायद्यामध्ये बदल केले. त्यामुळे कुलगुरूंच्या अधिकारांवर गदा येईल, अशी टीका करण्यात आली. या पार्श्वभूमीवर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी महाविकास आघाडीने मंजूर केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी केली नाही. त्यातच राज्यात पुन्हा भाजप आणि शिवसेनेचे (शिंदे गट) सरकार आल्यानंतर, कुलगुरूंची निवड सध्या अस्तित्वात असलेल्या विद्यापीठ कायद्यानुसार होण्यावर शिक्कामोर्तब झाले. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही कुलगुरू निवड प्रक्रिया लवकर सुरू करण्याचे सूतोवाच केले आहे. मात्र, कुलगुरू निवड प्रक्रियेला लागणारा एकूण कालावधी पाहता, पुणे विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळण्यासाठी किमान तीन महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी लागणार असल्याने नवे कुलगुरू चालू वर्षात मिळणार की नव्य वर्षात सूत्रे स्वीकारणार या चर्चेला उधाण आले आहे.



**“ पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू निवड प्रक्रियेची जाहिरात येत्या काही दिवसांत प्रसिद्ध होईल. त्यानंतरही विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळेपर्यंत तीन महिन्यांचा कालावधी जातो. अशा परिस्थितीत सरकारी विद्यापीठांना पूर्णवेळ कुलगुरू नसल्याने, विद्यापीठांचे शैक्षणिक नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी कुलगुरू निवृत्त होण्याच्या किमान तीन महिन्यांपूर्वी राज्यपाल कार्यालयाने ही निवड प्रक्रिया करणे गरजेचे आहे. पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठांच्या कुलगुरू निवड प्रक्रियेला तातडीने सुरुवात व्हायला हवी.**

- डॉ. ए. पी. कुलकर्णी,
माजी प्रदेशाध्यक्ष, अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ

**प्रभारी कुलगुरूंच्या हाती कारभार**

- पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर १८ मे रोजी निवृत्त झाले.
- त्यानंतर विद्यापीठाचा कारभार प्रभारी कुलगुरू डॉ. कारभारी काळे आणि प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्यामार्फत चालू आहे.
- नव्या कुलगुरू निवडीसाठी सरकारने कुलगुरू निवड समितीची स्थापना करणे अपेक्षित आहे.
- ही निवड समिती अजून जाहीर झालेली नाही.
- समिती जाहीर झाल्यानंतर, कुलगुरूपदाची जाहिरात प्रसिद्ध करण्यात येते.
- त्यानंतर इच्छुक उमेदवारांना अर्ज करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी दिला जातो.
- अर्ज पडताळणीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येते.
- ही प्रक्रिया झाल्यानंतर राज्यपाल कार्यालयाकडून कुलगुरूंचे नाव जाहीर होते.

Maharashtra Times 3.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# एकाच वेळी दोन पदव्यांचा पर्याय

## 'यूजीसी'चा निर्णय : विद्यार्थ्यांना दिलासा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३** - नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या आधारे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) शनिवारी नवीन गाइडलाइन्स जारी केल्या. त्यानुसार विद्यार्थ्यांना आता एकाच वेळी दोन अभ्यासक्रम अर्थात कोर्सचा पर्यायही उपलब्ध असेल आणि एकाच वेळी त्याला दोन सर्टिफिकेटही मिळणार आहेत. 'यूजीसी'चा हा निर्णय २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार आहे. त्यानुसार सर्व विद्यापीठे (पान २ पहा)

### डिस्टन्स एज्युकेशनचाही पर्याय

यूजीसीच्या या नव्या नियमानुसार विद्यार्थी आता त्यांच्या सोयीने वेगवेगळे कोर्स करू शकणार आहेत. यामध्ये सेमिस्टरप्रमाणे वर्गात उपस्थित राहून हे कोर्स करता येऊ शकतील. तसेच ऑफलाइन पद्धतीने हे कोर्स करू शकतील. तसेच विद्यार्थ्यांना डिस्टन्स एज्युकेशनच्या माध्यमातून एकाच वेळी हे कोर्स करता येऊ शकेल, असेही 'यूजीसी'ने म्हटले आहे.

## एकाच वेळी दोन पदव्यांचा पर्याय

आणि महाविद्यालयांनी धोरण आखावे, असेही 'यूजीसी'ने आज स्पष्ट केले आहे. उच्च शिक्षण संस्थांचे बहुविद्याशाखीय संस्थांमध्ये रूपांतर करण्यासाठी मार्गदर्शन तत्त्वे 'यूजीसी'कडून संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना आता देशातील सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये म्हणजे मॅनेजमेंट, लॉ आणि इंजिनिअरिंग महाविद्यालयामध्ये मल्टिपल कोर्स 'एन्ट्री-एक्झिट' पर्याय देण्यात आला आहे. तसेच त्याच कोर्ससाठी पुन्हा अॅडमिशन मिळवण्याचा पर्यायही उपलब्ध करून देण्यात आला आहे. म्हणजे विद्यार्थ्यांना आता एकाच वेळी एकापेक्षा जास्त अभ्यासक्रम पूर्ण करता येणे शक्य होणार आहे. 'यूजीसी'चा हा निर्णय विद्यार्थ्यांना दिलासादायक ठरणारा आहे.

Pabhat 4.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

एकल विद्याशाखा रद्दबातल; 'यूजीसी'कडून नियमावली

# महाविद्यालयांचे आता विलीनीकरण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** विधि, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वाणिज्य असे एखाद्याच विद्याशाखेचे सखोल शिक्षण देणाऱ्या उच्च शिक्षणसंस्था येत्या काळात दुसऱ्या संस्थेत विलिन कराव्या लागणार आहेत अथवा महाविद्यालयांमध्ये विविध विद्याशाखांचे विभाग सुरू करावे लागणार आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतुदीनुसार येत्या काळात सर्व उच्च शिक्षण संस्था आंतरविद्याशाखीय असाव्यात अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली असून २०३५ पर्यंत विद्यापीठ संलग्न महाविद्यालये ही संकल्पना संपुष्टात येणार आहे. सर्व महाविद्यालये पदवी प्रदान करणारी आंतरविद्याशाखीय महाविद्यालये करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

आंतरविद्याशाखीय शिक्षण नियमावली विद्यापीठ अनुदान आयोगाने जाहीर केली आहे. आंतरविद्याशाखीय शिक्षण देण्यासाठी उच्च शिक्षणसंस्थांना विविध पर्यायही सुचवण्यात आले आहेत.



## आता काय होईल?

येत्या काळात कोणतेही महाविद्यालय किंवा विद्यापीठ एकाच विद्याशाखेचे शिक्षण देणारे असणार नाही. विविध शाखांमधील विषयांचे शिक्षण एकाच वेळी घेण्याचा पर्याय विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी एकल विद्याशाखेची महाविद्यालये विलीन करण्याची सूचना आयोगाने दिली आहे.

### अभियंत्याला संगीत शिक्षणाची मुभा...

या धोरणामुळे अभियांत्रिकीचा विद्यार्थी एकाच वेळी संगीतशास्त्राचेही धडे घेऊ शकणार आहे. विधि शाखेचा अभ्यासक्रम शिकताना विज्ञानाचेही शिक्षण घेता येणार आहे. कला शाखेचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेतील आवडीच्या विषयाचेही ज्ञान घेता येणार आहे.

### विद्यापीठाऐवजी महाविद्यालयांतर्फेच पदवी

महाविद्यालये आंतरविद्याशाखीय करताना महाविद्यालयांनाच पदवी देण्याचा अधिकार देण्यात येणार आहे. विद्यापीठाशी असलेली संलग्नता संपुष्टात आणण्यात येईल आणि महाविद्यालये स्वायत्त करण्यात येतील.

सध्या देशात विधि, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कला, ललित कला अशा विविध विद्याशाखांतील सखोल शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. आयआयएम, आयआयटी, राष्ट्रीय विधि विद्यापीठे अशी केंद्रीय विद्यापीठेही आहेत. नव्या शिक्षण धोरणानुसार आता य विद्यापीठांमध्ये इतर विद्याशाखांचे विभागही सुरू करावे लागतील. त्यासाठी दुसऱ्या संस्थेच्या समन्वयाने अभ्यासक्रम सुरू करणे, एकाच संस्थेच्या वेगवेगळ्या विद्याशाखांचे शिक्षण देणारी ***(पान ४ वर)***

लोकसत्ता Sun, 04 September 2022 https://epaper.loksatta.com/c/69984216

## महाविद्यालयांचे आता विलिनीकरण

***(पान ३ वरून)***

महाविद्यालये विलिन करणे, दुसऱ्या संस्थेत महाविद्यालय विलिन करणे किंवा महाविद्यालयात इतर विभाग सुरू करणे असे पर्याय आयोगाने सुचवले आहेत. त्यामुळे एखाद्या विद्याशाखेचे सखोल शिक्षण घेताना दुसऱ्या विद्याशाखेतील आवडीचे विषयही काही प्रमाणात अभ्यासता येतील.

**धोरणानुसार...**

भारतीय उच्च शिक्षण पद्धतीतील शाखानिहाय शिक्षण पद्धती मोडीत काढून शिक्षणात लवचिकता आणण्याचे धोरण आखण्यात आले आहे. त्यानुसार आंतरविद्याशाखीय शिक्षणाची तरतूद धोरणात करण्यात आली आहे.

**आंतरविद्याशाखीय शिक्षणाचा इतिहास...**

भारतीत आंतरविद्याशाखीय शिक्षणाचीच परंपरा होती. आंतरविद्याशाखीय शिक्षणाचे महत्व ऋग्वेदात सांगण्यात आले आहे. नालंदा, तक्षशीला या विद्यापाठींमध्ये आंतरविद्याशाखीय शिक्षण होते. सर्व कला, विद्यांचे शिक्षण देण्यात येत असे. मात्र कालौघात ही शिक्षण पद्धती बदलत गेली. एखाद्याच विद्याशाखेतील सखोल शिक्षण घेण्याची पद्धत रुढ झाल्याने एकल विद्याशाखीय शिक्षणसंस्था निर्माण झाल्या. मात्र, आता राष्ट्रीय शिक्षण धोरणाने पुन्हा एकदा आंतरविद्याशाखीय शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

लोकसत्ता Sun http

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

सकाळ

# परंपरेला जोडणारे शिक्षण महत्त्वाचे!

नवे शैक्षणिक धोरण परंपरेशी सांगड घालत व्यावसायिकतेला, कौशल्याला प्राधान्य देणारे आहे. त्यातून देशाला जगाचे नेतृत्व करण्याची संधी मिळणार आहे. तीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विश्वगुरू ही संकल्पना आहे.



राजेश पांडे

शिक्षक दिनाच्या शिक्षक बंधू भगिनींना मनःपूर्वक शुभेच्छा. मी गेली चाळीस वर्षे शिक्षण क्षेत्रात विविध भूमिकेत काम केले आहे. प्रत्येक भूमिकेचा धर्म अत्यंत प्रभावीपणे निभावला आहे. प्रत्येक शिक्षकाने आपली भूमिका व्यवस्थित पार पाडल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपणास जे विश्वगुरू होण्याचे स्वप्न दाखवले आहे ते सहज प्रत्यक्षात उतरवू, याची मला खात्री आहे. भारताने विश्वगुरू बनण्याचा निश्चय केला आहे. पंतप्रधान मोदींनी २०१४पासून हा ध्यास घेतला आहे. विश्वगुरू बनायचे म्हणजे काय? हे समजून घेतले पाहिजे. देशावर अकराव्या-बाराव्या शतकापासून मोगलांसह विविध प्रकारची आक्रमणे झाली, त्यानंतर इंग्रजांनी गुलामगिरीत लोटले. भारत आपली शिक्षण व्यवस्था विसरला. लॉर्ड मेकॉले यांनी १८५७ मध्ये भारतीय शिक्षणाचे, जुने सर्व आयाम बदलून कारकुनी पद्धतीची शिक्षण व्यवस्था लादली. मेकॉलेने बनवलेली गुलाम बनवणारी शिक्षण व्यवस्था भारताचा गाभा बनली. गुलाम ही इंग्रजांची गरज होती; स्वतंत्र भारताची नाही. परंतु आता प्रचंड मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत.

## विद्वान सर्वत्र पूज्यते

भारतात इंग्रज येण्याआधी आपल्याकडे गुरुकुल शिक्षण पद्धती होती. गुरूला अर्थात शिक्षकाला, आचार्य यांना प्रचंड मान होता. 'स्वदेशे पूज्यते राजा, विद्वान सर्वत्र पूज्यते' अशी आपली परंपरा आहे. राजापेक्षा विद्वानाला श्रेष्ठ मानणारा भारत आहे. वेद हा भारतीय संस्कृतीचा प्राचीन ग्रंथ. वेदांना अपौरुषेय म्हणतात. आपल्या गुरुकुल पद्धतीमध्ये ६४ कला शिकवल्या जात असत. ज्याला जे आवडते त्यांनी ते शिकावे, अशी पद्धती होती. सोदाहरण म्हणून आपण द्रोणाचार्यांच्या गुरुकुलाचे उदाहरण घेऊया! भीमाला धनुर्विद्या, अर्जुनाला गदायुद्ध शिकवण्याची आवश्यकता नव्हती. धर्माला, अर्थात युधिष्ठिराला धर्मशास्त्राचे ज्ञान शिकवले गेले. म्हणजेच 'जो जे वांछील तो ते लाहो...' अशी शिक्षण पद्धती होती. म्हणजे ज्याला जे आवडते त्याने ते शिकावे. शिक्षण व्यवस्था ज्ञान देणारी असावी आणि ते ज्ञान निसर्गाचे, जगणे सुंदर बनवणारे, संपन्न बनवणारे असावे असे भारतीय परंपरा सांगते. समाजातील सर्व घटकांना त्यांच्या कलानुसार, कौशल्यानुसार शिक्षण मिळावे, अशी ही परंपरा आहे. भारतीय शिक्षण हे जीवनपद्धती होती. योग, आयुर्वेद, गुरुकुल शिक्षण पद्धती, व्यापार, शस्त्र, विविध कला-शास्त्रांचे शिक्षण दिले जायचे. आर्यभट्ट, कणाद, चाणक्य, चार्वाक, सुश्रुत, वराहमिहीर, लीलावती, भास्कराचार्य यांच्यासारखी पारंगत मंडळी; तसेच नालंदा, तक्षशिला अशी वैभवशाली विद्यापीठे ही अफाट शिक्षण परंपरा आपल्याकडे होती.

## वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक धोरण

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या निमित्ताने पहिल्यांदाच भारतीय प्राचीन परंपरेचा विचार शैक्षणिक धोरणात आला. गेली दोन वर्षे मोदी सरकार धोरणाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील आहे. आपली वैभवशाली परंपरा समजावून सांगत आपला प्रगल्भ इतिहास मुलांना शिकवला पाहिजे. त्यातील उत्तम ते स्वीकारणे आणि काळाशी सुसंगत रचना करणे हा धोरणाचा उद्देश आहे. यासाठी शिक्षकांच्या भूमिका बदलाव्या लागतील. केवळ वर्गात जाऊन शिकवणे, ज्ञानाचे हस्तांतरण म्हणजे शिक्षण नव्हे; तर विद्यार्थ्याला ज्ञानाचा वापर करायला शिकवणे महत्त्वाचे आहे. अर्थात कौशल्याधिष्ठित शिक्षण पद्धती आणणे. विद्यार्थ्यांचा संशोधनाकडे कल वाढावा, यासाठी संशोधनाधिष्ठित शिक्षण पद्धती आणणे. ज्याला उद्योजकतेमध्ये आवड आहे त्यांनी व्यावसायिकता जपावी. कलेमध्ये आवड असणाऱ्यांनी कला जपावी. खेळ जमतो त्यांनी खेळातच भाग घ्यावा. आता मोदी सरकारच्या धोरणांमुळे खेळांमधील आपलं वर्चस्व वाढत आहे. सुवर्णपदकांची संख्या वाढत आहे.

## परंपरा, आधुनिकतेची सांगड

चाकोरीबाहेरच्या शिक्षणावर आपल्याला भर द्यावा लागेल. केवळ पुस्तकी ज्ञान उपयोगी नाही, त्याला पारंपरिक ज्ञानाची जोड हवी. भारतीय परंपरांना उज्ज्वल दिवस आणावे लागतील. त्यांना अभ्यासक्रमात आणावे लागेल. जसे विविध प्रकारची कामे परंपरेने शिकली तरी त्याला आधुनिक आणि पूरक ज्ञानाची जोड द्यावी लागेल. केवळमधून आपल्याकडे आलेल्या पंक्चर काढणाऱ्याचा मुलगा पंक्चर काढण्यात वाकबगार असतो, अशा मुलाला पूरक मोटार रिवाइंडिंगचा अभ्यासक्रम शिकवला पाहिजे. परंपरेने खाद्यपदार्थ, मिठाई बनवणाऱ्याच्या मुलाला खाद्यपदार्थ बनवण्यात वाकबगार करायला लागेल. आदिवासींच्या परंपरागत ज्ञानालाही अभ्यासक्रमात आणावे लागेल. पारंपरिक ज्ञानाचा वापर हा विश्वगुरू होण्यासाठी उपयोगी ठरू शकतो, याची मला खात्री आहे. यासाठी शिक्षकांना मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण द्यावे लागेल. त्यांची भूमिका, मानसिकता बदलावी लागेल. यातूनच बहुआयामी अष्टावधानी नागरिक तयार होतील. आपल्याकडे शिक्षणामध्ये जे प्रचंड बदल होत आहेत ते आपण कसोशीने अमलात आणले पाहिजेत. ही अंमलबजावणी वेगाने करून विश्वगुरू होण्याकडे वाटचाल केली पाहिजे. शिक्षक दिनाच्या पुन्हा शुभेच्छा.

(लेखक नवीन शैक्षणिक धोरण टास्क फोर्सचे चेअरमन आहेत.)

### स्वातंत्र्यानंतरचे बदल

- स्वातंत्र्यानंतर आपण संस्थात्मक व्यवस्थेची पायाभरणी केली. शिक्षणाचा संख्यात्मक विस्तार झाला. परदेशात शिकायला जाणारे वाढले.
- परदेशातील कंपन्यांचे प्रमुख भारतीय आहेत, याचा अभिमानच! पण भारतीय कंपन्या जागतिक दर्जाच्या बनण्यासाठी शिक्षण हवे.
- केवळ नोकरी नव्हे; तर जीवनकौशल्ये विकसित करणारे शिक्षण हवे.

### विश्वगुरू व्यापक संकल्पना

- भारतीय परंपरेत ज्ञान कधीच बंदिस्त नव्हते. अमर्याद ज्ञान खुले करणे ही भारतीय परंपरा. या अर्थाने भारत विश्वगुरू बनू शकतो.
- केवळ पैसे मिळविण्यासाठी शिक्षण नसते. योगासारख्या शिक्षणाने आयुष्यभरासाठी आरोग्य सुधारते. असे शिक्षण जगाला देणे ही विश्वगुरूची परंपरा.
- केवळ उपग्रह बनवणे हे शिक्षण नाही; तर ध्यानात विश्वाचे आकलन होणे ही भारतीय परंपरा. इथून पुढच्या काळामध्ये परदेशांच्या लढायांचा अभ्यास करण्यापेक्षा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लढाया, त्यांचे व्यवस्थापन याचे धडे आपल्याला द्यायला हवेत.
- आपल्या नौदलाचा ध्वज बदलून त्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजमुद्रेचा अष्टकोन स्वीकारला गेला, यालाच शिक्षणाचे भारतीयकरण म्हणूया!

Pune, Main
05/09/2022 Page No. 7

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

# SPPU forgets ex before senate members, leaves pupils angry

### Admin says invitation cards printed before end of tenure; student groups furious with move, say officials under pressure

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com

TWEET @YashPune_Mirror

The Savitribai Phule Pune University (SPPU) administration has landed in an embarrassing, if not controversial, situation following the printing of invitation cards for the foundation laying of its sub-centre at Baburdi Ghumat in Ahmednagar wherein the name of its six former senate members have been mentioned as being position holders currently.



Invitation cards have been printed for foundation laying of sub-centre at Ahmednagar. FILE PHOTO

Higher and technical education minister Chandrakant Patil and revenue minister Radhakrishna Vikhe Patil are scheduled to lay the foundation on September 6. The invitation card bears the names of former senate members whose tenure ended on August 31. This has ruffled the feathers of student organisations who have raised objections.

Kuldeep Ambekar, founder and president of Students Helping Hand, said the Maharashtra Public University Act barred the use of designation of the post of senate member subsequent to the completion of tenure of the senate of a University. "The administration should have mentioned former senate members. We demand that the SPPU cancel the invitation cards and reprint new ones with 'former senate members', as such cards are misleading."

Shubhankar Bachal, Mahanagar Mantri of ABVP, said, "The pending work of SPPU's sub-centre in Ahmednagar district is going on. I have seen the invitation card. Such mistakes are not expected from the administration."

Satish Pawar, working president, National Students Union of India (NSUI), said, "This sort of negligence is not acceptable. It seems there is some pressure on the SPPU administration. The invitation card should be cancelled and the varsity should provide a clarification."

Rahul Sasane, working president, Dalit Panther Student Wing, described the invitation card as a fraud on students. Sasane also hinted at some sort of pressure being there on the SPPU administration.

Sachin Pandule, president, Yuvak Kranti Dal, said, "The senate dissolved on August 31 with the tenure of its members coming to end. Their reluctance to get introduced as former members might be stemming from lack of work done on students' issues during their tenure. The invitation card should be corrected. It also underlines the need for appointment of full-time vice-chancellor and pro vice-chancellor as it seems that there is no control over the SPPU administration."

Meanwhile, the administration has come up with a weird explanation to defend the faux pas. Prafulla Pawar, registrar, SPPU, said, "The senate dissolved on August 31, but the printing of invitation cards was completed on August 28."

He further said, "Invitation cards were distributed 10 days ago, much before the conclusion of the tenure of senate members, who are also part of the coordination committee for the sub-centre and have been working on the project for the last one year. As senior academicians, they are a part of the event."

Attempts by *Mirror* to contact acting VC Karbhari Kale, acting pro VC Sanjeev Sonawane and senate member Rajesh Pande proved futile.

Pune Mirror 5.9.2022

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

**लोकमत**

### यूजीसीची एकुलत्या एक कन्येसाठी सावित्रीबाई फुले पाठ्यवृत्ती

**नवी दिल्ली :** विद्यापीठ अनुदान आयोग आज, सोमवारी शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर पाच पाठ्यवृत्ती व संशोधनासाठी अनुदान देण्याबाबतच्या योजनांची घोषणा करणार आहे. यात एकुलत्या कन्येला सावित्रीबाई फुले पाठ्यवृत्ती दिली जाणार आहे. सेवानिवृत्त प्राध्यापकांनाही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेचा लाभ मिळणार आहे.

या आयोगाचे अध्यक्ष जगदीशकुमार यांनी सांगितले की, एकुलत्या एक कन्येसाठी सावित्रीबाई फुले पाठ्यवृत्ती, पोस्ट डॉक्टरल संशोधनासाठी डॉ. राधाकृष्णन पाठ्यवृत्ती, सेवानिवृत्त प्राध्यापकांसाठी, सेवेत असलेल्या विविध विद्याशाखांतील प्राध्यापकांना संशोधनासाठी अनुदान, नव्या प्राध्यापकांसाठी डॉ. डी. एस. कोठारी संशोधन अनुदान या पाच योजनांची घोषणा विद्यापीठ अनुदान आयोग उद्या, सोमवारी शिक्षक दिनानिमित्त करणार आहे. या योजनांमुळे देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा आणखी उंचावण्यास मदत होईल असे जगदीशकुमार म्हणाले. (वृत्तसंस्था)

Pune Main
Page No. 12 Sep 05, 2022
Powered by: erelego.com

### प्राध्यापकांसाठी पाच नव्या संशोधनवृत्तींची घोषणा

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्राध्यापकांसाठी विविध संशोधनवृत्ती, अभ्यासवृत्ती योजना जाहीर केल्या आहेत. मुली, निवृत्त प्राध्यापकांसाठीही विशेष योजनांचा यात समावेश आहे.

शिक्षकदिनी, सोमवारी या संशोधनवृत्ती लागू करण्यात येतील असे आयोगाचे अध्यक्ष एम. जगदेश कुमार यांनी सांगितले. अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, विज्ञान, मानव्य विज्ञान, सामाजिकशास्त्र, भारतीय भाषा यातील संशोधनासाठी डॉ. राधाकृष्ण यांच्या नावाने संशोधनवृत्ती देण्यात येणार आहे. त्याअंतर्गत पीएच.डी.नंतर पुढील संशोधनासाठी ९०० संशोधकांना महिना ५० हजार रुपये निधी देण्यात येणार आहे. या ९०० जागांपैकी ३० टक्के जागा या महिला संशोधकांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. निवृत्त प्राध्यापकांना संशोधनासाठी महिना ५० हजार रुपये संशोधनवृत्ती देण्यात येणार आहे. यासाठी शंभर प्राध्यापकांची निवड करण्यात येईल. सेवेत असलेल्या प्राध्यापकांना १० लाख रुपयांपर्यंत संशोधन निधी मिळू शकेल. निवड झालेल्या दोनशे प्राध्यापकांना दोन वर्षांसाठी हा निधी मिळेल. नव्याने रुजू झालेल्या नियमित महाविद्यालयीन शिक्षकांसाठी डॉ. डी. एस. कोठारी संशोधनवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. देशभरातून १३२ प्राध्यापकांना ही संधी देण्यात येणार असून दोन वर्षांसाठी १० लाख रुपयांपर्यंत निधी मिळू शकेल. एकटेच अपत्य असलेल्या मुलींसाठी सावित्रीबाई जोतिराव फुले अभ्यासवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. पूर्णवेळ पीएच.डी. करण्यासाठी पाच वर्षांसाठी ही अभ्यासवृत्ती देण्यात येईल. महिना १० हजार रुपयांपासुन ते ४५ हजार रुपयांपर्यंत विषय, अनुभव, संशोधनाचा स्तर यानुसार ही अभ्यासवृत्ती देण्यात येणार आहे.

#### मुख्यमंत्र्यांचा आज शिक्षकांशी संवाद



मुंबई : शिक्षकदिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी राज्यातील शिक्षकांशी दूरस्थ प्रणालीद्वारे संवाद साधणार आहेत. मुख्यमंत्री शिंदे हे वर्षा शासकीय निवासस्थानातून दुपारी एक वाजल्यापासून दृक-श्राव्य प्रणालीद्वारे राज्यातील विविध जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये उपस्थित राहणाऱ्या शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. करोना संकटानंतर अलीकडेच शैक्षणिक वर्षाला नियमितपणे सुरुवात झाली आहे. केंद्र सरकारने नव्या शैक्षणिक धोरणाचा अंगीकार करण्याचे जाहीर केले आहे. या अनुषंगाने राज्यातील शैक्षणिक क्षेत्रातील विविध मुद्दे आणि नवी दिशा यांचा या संवादादरम्यान ऊहापोह होणे अपेक्षित आहे. या संवादाचे मुख्यमंत्री सचिवालयाच्या समाजमाध्यमांवरून थेट प्रसारण करण्यात येणार आहे.

लोकसत्ता Mon, 05 September 2022
https://epaper.loksatta.com/c/69993975

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

सकाळ

# विशेष फेरीत २४ हजार विद्यार्थ्यांना संधी

**पुणे, ता. ५ :** अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या विशेष फेरीची गुणवत्ता यादी सोमवारी जाहीर करण्यात आली. यात २४ हजार ६२३ विद्यार्थ्यांना महाविद्यालये मिळाली. या यादीत समाविष्ट विद्यार्थ्यांना गुरुवारपर्यंत (ता. ८) प्रवेश निश्चित करता येणार आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये या प्रवेश फेरीअंतर्गत ५६ हजार ४१३ जागा उपलब्ध होत्या, तर प्रवेशासाठी २९ हजार ४१६ विद्यार्थी पात्र ठरले होते. त्यातील २४ हजार ६२३ विद्यार्थ्यांना महाविद्यालये मिळाली आहेत. त्यातील एक हजार ७२९ विद्यार्थ्यांनी सोमवारीच प्रवेश निश्चित केला. या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश लवकर निश्चित करणे गरजेचे असल्याचे राज्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी सांगितले आहे.

फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी दिलेल्या मुदतीत अर्ज 'अनलॉक' ही सुविधा उपलब्ध होणार नाही. तसेच कोटांतर्गत प्रवेश तसेच द्विलक्षी विषयांसाठीचे प्रवेश स्वतंत्र वेळापत्रकात दर्शविल्याप्रमाणे करत येतील, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती पोर्टलवर ऑनलाइन नोंदविण्यासाठी गुरुवारी (ता. ८) रात्री आठ वाजेपर्यंतची मुदत आहे. त्यानंतर शुक्रवारी (ता. ९) पुढील प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील जाहीर करण्यात येईल.

### अकरावीसाठी भाग दोन अर्ज भरणे आवश्यक

**विशेष फेरीसाठी प्रत्येक विद्यार्थ्याने पसंती अर्ज भाग दोन भरणे आवश्यक आहे. प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्याने या फेरीत सहभागी होणे गरजेचे आहे, अशी सूचना शिक्षण विभागाने केली आहे.**

### प्रवेश फेरीनिहाय प्रवेशाचा आढावा...

| प्रवेश फेरी | उपलब्ध जागा | पात्र विद्यार्थी | निवडलेले विद्यार्थी | प्रवेश प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| पहिली फेरी | ९३,९०६ | ६५५१९ | ४२,६३८ | २५,३८१ |
| दुसरी फेरी | ६८,५१० | ४१,११५ | १७,०६२ | ०७,४४९ |
| तिसरी फेरी | ६१,०६१ | ३८,६१५ | १२,२५३ | ०४,६४८ |
| पहिली विशेष फेरी | ५६,४१३ | २९,४१६ | २४,६२३ | ०१,७२९ (५ सप्टेंबरपर्यंत) |

Pune, Pune-Today
06/09/2022 Page No. 1

पुढारी

# नव्या प्रणालीनुसारच ८५ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन

**गणेश खळदकर**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यांतील ८५ महाविद्यालयांचे मूल्यांकन आता नवीन प्रणालीनुसारच करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी महाविद्यालयांच्या प्राचार्यांची ऑनलाइन बैठक घेऊन त्यांना मूल्यांकनाचे महत्त्व आणि मूल्यांकन नेमके कसे करावे, नवीन प्रणाली कशी आहे, याचे मार्गदर्शन करण्यात आले. यातून नॅक मूल्यांकन सोपे झाल्याचे मत महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी व्यक्त केले आहे.

## नॅक मूल्यांकन सोपे झाल्याचे प्राचार्यांचे मत

पुढारी वॉच

राज्यातील बहुसंख्य महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन प्रक्रियेत सहभाग घेऊन नॅककडून नॅक मान्यतेचा दर्जा प्राप्त करून घेतलेला आहे. परंतु, त्यातील काही महाविद्यालयांची नॅक मूल्यांकनाची वैधता संपुष्टात आली आहे. अशा संलग्न महाविद्यालयांच्या व्यवस्थापन प्रतिनिधी तसेच प्राचार्य यांची ऑनलाइन कार्यशाळा घेऊन त्यांना मूल्यांकनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यासंदर्भात काही महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी दिलेल्या माहितीनुसार, नॅक मूल्यांकनासाठी पात्र असलेल्या महाविद्यालयांचे नवीन प्रणालीनुसार मूल्यांकन करण्यासाठी नवीन मॅन्युअल तयार करण्यात आले आहे. त्यानुसारच मूल्यांकन करावे लागणार आहे. यापुढे महाविद्यालयांना आवश्यक कोणत्याही सुविधा तसेच विद्यापीठाकडून, यूजीसीकडून मिळणारे अर्थसाहाय्य हवे असेल तर नॅक बंधनकारक करण्यात आले आहे.

### मूल्यांकनामधील जाचक अटी वगळल्या

नॅक मूल्यांकनामधील अनेक जाचक अटी काढण्यात आल्या आहेत. उदा. : महाविद्यालयात परदेशी विद्यार्थी किंवा परराज्यातील विद्यार्थी किती प्रवेश घेतात, यासाठी गुण होते. परंतु, ग्रामीण भागात या दोन्ही प्रकारांतील विद्यार्थी प्रवेश घेत नव्हते, त्यामुळे ही अट वगळण्यात आली आहे. तसेच, अपेक्षित प्रश्नांची संख्या कमी करण्यात आली असून, मोजकेच प्रश्न विचारण्यात आले आहेत. त्याचबरोबर अशाच क्षेत्रांची माहिती विचारण्यात आली आहे. ज्यामध्ये प्रत्येक महाविद्यालयाला गुण मिळवणे शक्य आहे.

> नॅक मूल्यांकनाची नवीन प्रक्रिया सुकर आणि सुसह्य झाली आहे. मूल्यांकनामधील क्लिष्टता आता दूर झाली आहे. त्यामुळे सर्वच महाविद्यालयांनी या प्रक्रियेत येऊन महाविद्यालयांचा दर्जा, गुणवत्ता सुधारणे अत्यंत गरजेचे आहे.
>
> **- डॉ. नंदकुमार जाधव,** प्राचार्य, सुभाष बाबूराव कुल कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय

Pune Edition
Sep 6, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

# नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांची प्रगती - शहा

मुंबई, दि. ६- देशाने नवीन शैक्षणिक धोरण २०२० चा अवलंब केला असून या धोरणामुळे देशातील प्रत्येक विद्यार्थ्याची प्रगती होईल, असे मत केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केले. मंत्री शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत पवई येथील ए. एम. नाईक शाळेचे उद्घाटन आज करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार पूनम महाजन, खासदार मनोज कोटक, एल अँड टी चे अध्यक्ष ए. एम. नाईक, सीईओ एस.एम. सुब्रमण्यम, चॅरिटेबल ट्रस्टचे जिग्नेश नाईक, प्राचार्य मधुरा फडके, शिक्षक आदी उपस्थित होते.

शहा म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरण बहुआयामी आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा लाभ होणार आहे. शिक्षकांनी सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे मानवतावादी, अध्यात्मवादी विचार देशातील प्रत्येक विद्यार्थ्यांचा मनात रुजवावेत. एक उत्तम शिक्षक कसा असावा, यांचा बोध घ्यायला हवा. शिक्षकांनी बालकांना समाजातील उत्तम नागरिक बनवावे.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणामुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबर त्यांचे चांगले चारित्र्य निर्माण होणार आहे.

Prabhat 7.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# शिक्षण संस्थांचे संचालक जागे होतील?

■ आनंद मापुस्कर

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये अभ्यासक्रमांतील बदलांबरोबरच शैक्षणिक संस्थांमध्ये रचनात्मक बदलही अपेक्षित आहेत. सन २०३५ पर्यंत विद्यापीठांना संलग्नित महाविद्यालये ही रचना कालबाह्य होणार आहे. प्रत्येक महाविद्यालय हे पदवी प्रदान करणारे बहुविद्याशाखीय स्वायत्त संस्था असेल. सर्व महाविद्यालये अशी स्वायत्त होण्यासाठी कालबद्ध योजना हवी. पदवी प्रदात्या बहुविद्याशाखीय स्वायत्त संस्थेचा दर्जा मिळवण्यासाठी चांगले नॅक मानांकन मिळवून स्वायत्त महाविद्यालयांचा दर्जा प्राप्त करणे किंवा अन्य संस्थांशी सहयोग करून समूह तयार करणे किंवा विद्यापीठाचे घटक महाविद्यालय बनणे हे पर्याय आहेत.

आजचे महाविद्यालयीन शिक्षण हे बंदिस्त तसेच खंडित आहे. यामध्ये एका विद्याशाखेत शिकताना अन्य विद्याशाखेतील विषय शिकण्याची सोय नाही. पारंपरिक उच्च शिक्षणात व्यावसायिक तसेच व्यवसाय (व्होकेशनल) शिक्षणाचा अंतर्भाव व्हावा, ही बहुविद्याशाखीय शिक्षणात अंतर्भूत कल्पना आहे. यामध्ये भाषा, साहित्य, तत्त्वज्ञान, भारतीयत्व, कला, नृत्य, नाटक, शिक्षणशास्त्र, गणित, संख्याशास्त्र, मूलभूत व उपयोजित विज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, खेळ, भाषांतर अशा विषयांचे विभाग बहुविद्याशाखीय संस्थेत असावेत ही कल्पना आहे. केवळ एखाद्या विषयाचे (उदा. शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधनिर्माणशास्त्र, विधी वगैरे) महाविद्यालय या संकल्पनेतून बाहेर येऊन सर्व विद्याशाखेतील विविध विषय विद्यार्थ्यांना अभ्यासता येतील, अशी कल्पना नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात आहे. भारतामध्ये आयआयटी, एनआयटी, आयआयएम अशा कायद्याने स्थापित व अनुदानित संस्था आहेत. तसेच, केंद्रीय विद्यापीठे, खासगी विद्यापीठे, खासगी व अनुदानित अभिमत विद्यापीठे, राज्यस्तरीय सार्वजनिक विद्यापीठे आहेत. महाविद्यालयांतही शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित असे प्रकार आहेत.

यामधील बऱ्याच शैक्षणिक संस्था एकात्मिक पद्धतीच्या (एकाच विद्याशाखेचे) शिक्षण देतात. त्यामुळे केंद्र सरकारच्या संस्थांपासून ते तालुक्यातील एखाद्या महाविद्यालयांपर्यंत सर्वांना बहुविद्याशाखीय शिक्षणसंस्थेत परिवर्तित करताना अनेक रचनात्मक बदल करावे लागतील. राज्य सरकारच्या अखत्यारीतली विद्यापीठे तसेच संलग्न महाविद्यालये यात म्हणावे तसे नियोजन नाही. दोन सप्टेंबर २०२२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांमुळे आता राज्यस्तरावर या विषयाला गती येईल.

राष्ट्रीय शिक्षण धोरण तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना यांची अंमलबजावणी कशी होणार, असा प्रश्न आहे. मार्गदर्शक सूचना वाचल्यास त्याचे उत्तर मिळते. मूळ विद्यापीठांचे काम बहुविद्याशाखीय शिक्षण संस्थांच्या निर्मितीसाठी जलद अनुमती देणे, विविध समित्यांसाठी नामनिर्देशने करणे हे आहे. राज्य सरकारचे काम त्यासाठी कायदे मंजूर करणे तसेच २०३० पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात किमान अशी एक शिक्षण संस्था उभी करणे हे आहे. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षण धोरण तसेच मार्गदर्शन सूचनांनुसार सध्याच्या महाविद्यालयांचे रूपांतर बहुशाखीय संस्थांमध्ये करण्याचे काम संस्थाचालकांना करायचे आहे.



**नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण यशस्वी व्हायचे असेल तर शिक्षण संस्था चालविणाऱ्या संचालकांनी पुढाकार घेऊन स्वागतशील व्हावे लागेल. बदल करावे लागतील. भविष्यवेधी दृष्टी ठेवावी लागेल. हे खरेच होईल का?**

प्राचार्य, प्राध्यापक हे शिक्षण संस्थेचे महत्त्वाचे घटक असतात. परंतु, त्यांना संस्थेच्या वतीने निर्णय घेण्याची मुभा नसते. त्यामुळे जोपर्यंत संस्थाचालक ठरवत नाहीत तोवर परिवर्तन अशक्य आहे. महाराष्ट्रात तीन प्रकारच्या शिक्षण संस्था आहेत. १) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाद्वारे स्थापित २) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० नोंदणीद्वारे स्थापित संस्था ३) कंपनी अधिनियम, २०१३च्या कलम ८ अन्वये स्थापलेली कंपनी. शिक्षण संस्थांचे तीन प्रकार असले तरी संस्थाचालकांचे वर्गीकरण करता येईल. उदा. राजकीय नेत्यांच्या संस्था, ज्ञातिसंस्थांच्या संस्था, अल्पसंख्याक समुदायाच्या संस्था, समाजसुधारकांनी सुरू केलेल्या स्वातंत्र्यपूर्व काळातल्या संस्था वगैरे. शिक्षणसंस्थांच्या निवडणुका होतात. संचालक मंडळावर नवीन सदस्य येतात. प्राचार्यांच्या, प्राध्यापकांच्या निवडीचे निकष विद्यापीठ अनुदान आयोगाकडून जारी होतात. पण संस्थाचालकांचे तसे नसते. उच्च शिक्षण व्यवस्थेचा काडीमात्रही गंध नसलेली व्यक्ती संचालक मंडळाचा सदस्य वा अध्यक्षदेखील बनू शकतो. काही शिक्षण संस्थांमध्ये आजीव सदस्यांची नवीन नोंदणीच केली जात नाही. त्यामुळे त्याच व्यक्ती अधिकारपदावर कायम विराजमान राहतात.

शिक्षण संस्थाचालकांची निवड विचारपूर्वक झाली तरच महाविद्यालयांचे परिवर्तन बहुविद्याशाखीय स्वायत्त महाविद्यालय वा समूह विद्यापीठात होईल. या प्रस्तावित संस्थांचे विविध प्रकार आयोगाने नमूद केले आहेत. एकाच शिक्षण संस्थेची विविध विद्याशाखांची महाविद्यालये असल्यास परिवर्तन सोपे आहे. पण विभिन्न शिक्षण संस्थांनी एकत्र येण्यासाठी संस्थाचालकांना मानसिकता बदलावी लागेल. प्राचार्य व प्राध्यापकांवर सर्व व्यवस्थापकीय कामाचा बोजा टाकण्याऐवजी व्यवस्थापकीय कामांसाठी (उदा. अर्थउभारणी, प्रवेश, मनुष्यबळ विकास, पायाभूत सुविधा विकास, माहिती तंत्रज्ञान, विधी वगैरे) विषयानुसार स्वतंत्र अधिकारी नेमणे सयुक्तिक राहील.

संस्थाचालकांची भूमिका ही सुविधा देणे तसेच व्यवस्थापनाची हवी. शैक्षणिक बाबीं तसेच दैनंदिन कामांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार प्राचार्य तसेच प्राध्यापकांना हवेत. आजपर्यंत अभ्यासक्रम निर्मिती, प्रशिक्षण, मूल्यमापन, संशोधन हे निर्णय विद्यापीठ पातळीवर होत. आता हे सर्व निर्णय घेण्याचे काम नव्या संस्थांना करावे लागेल. यासाठी प्राचार्य, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे लागेल. प्राचार्यांना नेतृत्वकौशल्य विकसित करावे लागेल. उद्योग, समाज, सरकार तसेच विविध संस्था यांच्याशी सहकार्य करावे लागेल. प्राध्यापकांना राष्ट्रीय धोरणाप्रमाणे आपापल्या विषयातील कालसुसंगत कौशल्य अभ्यासक्रम विकसित करावे लागतील.

शिक्षण संस्था आजपर्यंत अर्थउभारणीसाठी सरकारी मदतीवरच वा विद्यार्थ्यांच्या डोनेशनवर (कायद्याने बंदी असली तरी.) अवलंबून आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदान कायम राहील. संस्था विकासासाठी सर्व खर्च हा विद्यार्थ्यांच्या शुल्कातून या डोनेशनमधून जमा करणे चुकीचे ठरेल. शिक्षणसंस्थेने पारदर्शक व्यवहार केल्यास समाजातून, उद्योगजगतातून पैसे येतील.

एकूणच काय तर शिक्षण संस्था जरी विश्वस्त संस्था म्हणून चालत असल्या तरी त्यांचे व्यवस्थापन हे व्यावसायिक हवे. गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण देण्यासाठी संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाला पर्याय नाही. तसेच, या शैक्षणिक घटकांच्या संस्थेतील जबाबदाऱ्या निश्चित करायला हव्यात. राष्ट्रीय शिक्षण धोरण यशस्वी होण्यासाठी शिक्षण संस्थांच्या विचार व कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल व्हायला हवा.

**(लेखक उच्च शिक्षणविषयक धोरणाचे अभ्यासक आहेत.)**

Maharashtra Times 7.9.2022

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

सकाळ

# वर्ष संपेपर्यंत कुलगुरू मिळण्याची चिन्हे

मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ११ : राज्यात सत्तापालटानंतर आता विद्यापीठांच्या कुलगुरु निवड प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे. कुलगुरूंची निवड ही जुन्या सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसारच होईल, असे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. तर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'कुलगुरूंच्या निवडीची प्रक्रिया लवकरच सुरू करणार असून येत्या दोन महिन्यांत या नियुक्ती होईल,' असा सूतोवाच केला. त्यामुळे राज्यातील विद्यापीठांना वर्ष संपताना नवे कुलगुरू मिळण्याची शक्यता आहे.

महाविकास आघाडी सरकारने यापूर्वी नव्या कायद्यानुसार कुलगुरूंची निवड प्रक्रिया करण्याचा आग्रह धरला. मात्र, राज्यपाल कोश्यारी यांनी विधेयकावर स्वाक्षरी न केल्याने ही प्रक्रिया सुरूच होऊ शकली नाही. त्यानंतर नव्या सरकारने जुन्या विद्यापीठ कायद्यानुसारच कुलगुरूंची निवड होणार असल्याचे स्पष्ट केले.

मविआ सरकारच्या काळात २०१६ च्या विद्यापीठ कायद्यात बदल करण्यात आला होता. या बदलानुसार कुलगुरूंच्या निवड समितीने पाचऐवजी दोनच नावे कुलपतींकडे पाठविण्याचे बंधन घालण्यात आले. शिवाय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांना कुलपतींप्रमाणे अधिकार दिले. मविआ सरकारने हा नवा कायदा मंजूर करून घेतला, परंतु राज्यपालांनी सुधारणा विधेयकावर स्वाक्षरी न केल्याने विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले नाही.

### कुलगुरूंच्या प्रतीक्षेतील विद्यापीठे

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : सध्या लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्याकडे पुणे विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू पदाचा कार्यभार आहे. कुलगुरू निवड समितीसाठी विद्यापीठाने दोन नावे राज्यपालांना पाठवली आहेत.
- मुंबई विद्यापीठ : सध्याचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांचा कार्यकाल ८ सप्टेंबरला संपत आहे. विद्यापीठाने कुलगुरू निवड समितीतील सदस्यांची नावे मान्यतेसाठी पाठवली आहेत.
- वायसीएमओयू, नाशिक : विद्यापीठाचे यापूर्वीचे कुलगुरू डॉ. ई. वायुनंदन यांचा कार्यकाळ ७ मार्चला संपला.

"कुलगुरू निवड समिती स्थापन करणे, अर्जांसाठी जाहिरात प्रसिद्ध करणे, त्यानंतर मुलाखतीचा कालावधी ठरविणे, या संपूर्ण प्रक्रियेला कमीत कमी तीन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रक्रियेला गती देऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विचार करून लवकरात लवकर कुलगुरूंची निवड करावी.

- डॉ. अरुण अडसूळ, माजी कुलगुरू

Pune Main
12/09/2022 Page No. 3

# ऑनलाइन शिक्षणाला पारंपरिक पदवीचे कोंदण

### 'यूजीसी'चा निर्णय; अल्प शुल्कात शिक्षणाची संधी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'विद्यापीठ अनुदान आयोगा'ने (यूजीसी) ऑनलाइन, दूरशिक्षणाद्वारे मिळणाऱ्या पदवी, पदव्युत्तर पदवीला कॉलेज, विद्यापीठांमध्ये पूर्णवेळ शिकल्यानंतर मिळणाऱ्या पारंपरिक पदवीची समकक्षता प्रदान केली आहे. या निर्णयामुळे ऑनलाइन आणि दूरशिक्षण पद्धतीने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. त्याचप्रमाणे आगामी काळात कमी शुल्कात परवडणारे शिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली आहे.

या निर्णयामुळे येत्या काळात दूरशिक्षण, ऑनलाइन पद्धतीने पदवी, पदव्युत्तर, पदविका अभ्यासक्रमांच्या प्रतिसादात वाढ होण्याची शक्यता आहे. या संदर्भातील परिपत्रक 'यूजीसी'चे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी प्रसिद्ध केले. 'यूजीसी'ने मान्यताप्राप्त संस्थांमधून दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षणाद्वारे प्राप्त केलेली पदवी पारंपरिक पद्धतीने प्रदान केलेल्या पदवीला समकक्ष असल्याबाबतचा निर्णय 'यूजीसी'च्या 'मुक्त आणि दूरशिक्षण अभ्यासक्रम आणि ऑनलाइन अभ्यासक्रम नियमावली २०२०'च्या नियम २२ नुसार, घेण्यात आला. 'यूजीसी'च्या २०१४ मधील पदवीच्या अधिकृततेसंदर्भातील अधिसूचना, 'यूजीसी'शी संलग्न उच्च शिक्षण संस्थांद्वारे दूरशिक्षण आणि ऑनलाइन पद्धतीने घेतलेल्या पदवीपूर्व, पदव्युत्तर स्तरावरील पदवी, पदविकांना मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे दूरशिक्षण आणि ऑनलाइन पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदव्युत्तर पदविका पारंपरिक पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदव्युत्तर पदविका यांना समकक्ष असतील, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.



"उच्च शिक्षणाचा टक्का २७ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी यूजीसीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शिक्षणाला समाजात दुय्यम समजणे बंद होणार आहे. आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांना कमी शुल्कात शिक्षण पूर्ण करता येईल. समकक्षतेच्या निर्णयामुळे अडचण येणार नाही.

- डॉ. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### निर्णयामुळे काय होईल ?

- दूरशिक्षण, ऑनलाइन पद्धतीने घेतलेल्या शिक्षणाला समाजात दुय्यम समजले जाणार नाही.
- समकक्षता मिळाल्याने पारंपरिक पद्धतीने घेतलेले शिक्षण; तसेच दूरशिक्षण, ऑनलाइन शिक्षणामध्ये भेदभाव करता येणार नाही.
- कमी शुल्कात पदविका, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होईल.
- जगातील नामवंत विद्यापीठांचे शिक्षण विद्यार्थ्यांना घरबसल्या घेता येईल.
- कॉलेज, विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्याऐवजी, मान्यताप्राप्त संस्थांमधून दूरशिक्षण, ऑनलाइन पद्धतीने शिक्षण घेण्याला पसंती मिळेल.
- सध्या एमफिल, पीएचडीसाठी हा निर्णय लागू नसेल.

Maharashtra Times 13.9.2022

# पीएच.डी.च्या तोंडी परीक्षेसाठी ऑनलाइन, ऑफलाइनचा पर्याय

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांची मौखिक परीक्षा ऑनलाइन आणि किंवा ऑफलाइन पद्धतीने घेतली जाणार आहे. परीक्षा पद्धतीबाबतचा निर्णय संबंधित मार्गदर्शकांवर आणि संशोधन केंद्र प्रमुखांवर सोपवण्यात आला असून मार्गदर्शकांना दोन्ही पर्याय उपलब्ध असतील.

विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. करोनाच्या प्रादुर्भावामुळे मौखिक परीक्षा गेली दोन वर्षे ऑनलाइन घेतल्या जात होत्या. आता करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने या परीक्षा पुन्हा प्रत्यक्ष पद्धतीने घेतल्या जाऊ लागल्या. पुढील काही दिवसांमध्ये या परीक्षा होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर काही प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी मौखिक परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने घेण्याची विनंती केली. त्यानुसार विद्यापीठाने दोन्ही पर्याय खुले असल्याचे स्पष्ट करून परीक्षा ऑनलाइन घ्यायची की ऑफलाइन याचा निर्णय मार्गदर्शकांवर सोपवला. जर मार्गदर्शक व संशोधन केंद्र प्रमुख ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यावर ठाम असतील तर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहून तोंडी परीक्षा द्यावी लागणार असल्याचे विद्यापीठाने नमूद केले.

परीक्षा ऑफलाइन घ्यावी की ऑनलाइन या बाबत संशोधन केंद्र प्रमुख आणि मार्गदर्शक यांच्यात एकमत न झाल्यास संबंधित निर्णय त्या त्या विभागाचे अधिष्ठाता घेतील. परीक्षेबाबत एकमताने झालेला निर्णय विद्यार्थ्यांना मान्य करावा लागेल. मार्गदर्शक अथवा संशोधनप्रमुख सांगतील त्याच पद्धतीने परीक्षा देणे बंधनकारक असेल. करोनाच्या काळात पीएच.डी.च्या तोंडी परीक्षा ऑनलाइन पद्धतीने कोणत्याही अडथळ्यांशिवाय पार पडल्या होत्या. त्यामुळे हा पर्याय उत्तम असल्यानेच दोन्ही पद्धतीने परीक्षा घेण्यासाठी मान्यता दिल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली.

लोकसत्ता Tue, 13 September 2022
https://epaper.loksatta.com/c,

# News Paper Clippings During September 2022

## Section: Education

पुढारी
www.pudhari.com

# ऑनलाईन शिक्षण झाले 'राजमान्य'

## डॉ. संजीव सोनावणे : पारंपरिक शिक्षणाएवढेच महत्त्व येणार

**पुणे : गणेश खळदकर**

नवीन शैक्षणिक धोरणातील उच्चशिक्षित विद्यार्थ्यांचे ध्येय केवळ पारंपरिक शिक्षणातून पूर्ण होणे शक्य नाही. त्यामुळे ऑनलाईन, दूरस्थ शिक्षण हा एक चांगला पर्याय आहे; परंतु यातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी पारंपरिक शिक्षणाएवढेच महत्व संबंधित शिक्षणाला देणे गरजेचे होते. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात, यूजीसीने ऑनलाईन, दूरस्थ शिक्षणातील पदव्यांना पारंपरिक पदव्यांची समकक्षता देऊन ऑनलाईन शिक्षणाला एकप्रकारची राजमान्यताच दिली, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांनी व्यक्त केले.

ते म्हणाले, 'भारतातील १६ ते २६ वयोगटांतील ५० टक्के मुलांना २०३० पर्यंत उच्चशिक्षित करण्याचे ध्येय ठेवले आहे. सध्या २६ टक्के विद्यार्थी उच्चशिक्षण घेत आहेत. त्यांची संख्या साधारणत: सव्वा कोटी आहे. येत्या काळात तब्बल अडीच कोटी विद्यार्थ्यांना उच्चशिक्षित करावे लागणार आहे. यासाठी पायाभूत सुविधा उदा., वर्गखोल्या, प्राध्यापक, अन्य मनुष्यबळ उपलब्ध करावे लागणार आहे. ते एवढ्या कमी कालावधीत उपलब्ध करणे शक्य नाही. त्यामुळे देशातील ५० टक्के विद्यार्थ्यांना उच्चशिक्षित करण्याचे ध्येय गाठायचे असेल, तर आपल्याला इतर मार्गांचा उपयोग करणे आवश्यक आहे. त्यासाठीच दूरस्थ शिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण हा एक चांगला मार्ग आहे. परंतु, या शिक्षणासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये विश्वास केव्हा निर्माण होईल, ज्यावेळी विद्यार्थ्यांना वाटेल की त्यांनी दूरस्थ शिक्षण आणि ऑनलाईन शिक्षणाद्वारे मिळवलेल्या पदव्या आणि पारंपरिक शिक्षणातून घेतलेल्या पदव्या एकच आहेत, त्यांना समान दर्जा आहे. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण आणि दूरस्थ शिक्षणातील विद्यार्थ्यांचा टक्का वाढविण्यासाठी यूजीसीने घेतलेला निर्णय आनंददायी आणि स्तुत्य आहे.'



संशोधन पदव्यांसंदर्भात डॉ. सोनावणे म्हणाले, 'यूजीसीने एम.फील. आणि पीएच.डी.ला मान्यता दिलेली नाही. त्यामुळे संशोधन पदवी ही महाविद्यालये किंवा विद्यापीठातच पूर्ण करावी लागणार आहे, हेही महत्त्वाचे आहे. यामुळे कमी शिक्षण घेऊन नोकरी किंवा व्यवसाय करतात, त्यांना आपले उच्चशिक्षणाचे स्वप्न पूर्ण करता येणार आहे.

### ऑनलाईन शिक्षण स्वस्त होईल...

*ऑनलाईन शिक्षणाची जमेची बाजू म्हणजे विद्यार्थी त्यांचा कामधंदा बघून शिक्षण पूर्ण करणार आहेत. ऑनलाईन शिक्षणासाठी भौतिक सुविधांची फारशी आवश्यकता नाही. त्यामुळे शुल्क नियमन करणाऱ्या प्राधिकरणांनी प्रत्यक्ष खर्चावर आधारित शुल्करचना केली, तर शुल्क कमी होण्यासदेखील मदत होणार असल्याचे डॉ. सोनावणे यांनी स्पष्ट केले.*

**आमने-सामने**

**ऑनलाईन, दूरस्थ पदव्यांना पारंपरिक पदव्यांची समकक्षता**

# ऑनलाईन शिक्षण तार्किक नाहीच!

## डॉ. अरूण अडसूळ : विद्यार्थी केवळ माहीतगार होतील

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**



'स्पर्धेच्या युगात शिक्षण ही तत्त्वज्ञानाची गतिशील आणि मानसशास्त्राची कृतिशील बाजू आहे. त्यामुळे मानसशास्त्र बाजूला ठेवता येणार नाही. ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानी किंवा माहितगार माणसे तयार होतील; परंतु सुसंस्कृत पिढी तयार करायची असेल, तर पारंपरिक शिक्षणाला पर्याय नाही. म्हणून ऑनलाइन शिक्षण तार्किक नाही,' असे रोखठोक मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांनी व्यक्त केले.

डॉ. अडसूळ म्हणाले की, ऑनलाइन शिक्षणामध्ये शिक्षणाचा सर्वच भाग केवळ ऑनलाइन माध्यमातून घेणे शहाणपणाचे ठरणार नाही. ज्या विषयांना प्रात्यक्षिकांची आवश्यकता आहे. त्या विषयांमध्ये ऑनलाइन शिक्षण देणे हे डोक्यातून काढणे गरजेचे आहे. कोणत्याही प्रकारच्या शिक्षणात माहिती मिळवणे हा एक भाग आहे. विद्या मिळवणे हा दुसरा भाग आहे. विद्यादान करण्यासाठी समोरासमोर संवाद होणे गरजेचे आहे. केवळ माहिती मिळवण्यासाठी ऑनलाइन माध्यम उपयोगाचे आहे; परंतु विद्यार्जनाच्या बाबतीत ज्यामध्ये मूल्ये आणि तत्त्वांचा भाग आहे, असे शिक्षण ऑनलाइनच्या माध्यमातून देणे शक्य होणार नाही. उच्च शिक्षणात जेव्हा विद्यार्थ्यांची मते मांडण्याची प्रक्रिया सुरू होते, त्यावेळी केवळ त्यांना माहिती, ज्ञान आणि कौशल्ये देऊन चालणार नाही, तर गुरूच्या भूमिकेतून थोडे विद्यादान होणेही आवश्यक आहे. ऑनलाइन शिक्षणातून होणारे मूल्यमापनही योग्य होत नाही. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणातील पदव्यांना पारंपरिक शिक्षणातील पदव्यांची समकक्षता देणे चुकीचे ठरणार आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून शहाणी माणसे तयार होणे गरजेचे आहे. आज जगात जी परिस्थिती निर्माण होत आहे, त्याकडे पाहता माणसाने माणसासारखे वागावे यासाठी मूल्य शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे. अन्यथा स्पर्धेला वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे. मूल्ये आणि तत्त्वे बाजूला सारून स्पर्धेत पुढे जाण्यासाठी वाट्टेल ते करणे योग्य होणार नाही. भारतातील १६ ते २६ वयोगटातील ५० टक्के मुलांना २०३० पर्यंत उच्चशिक्षित करण्याचे ध्येय ठेवले आहे. त्यामुळे त्यांना सुसंस्कृत न बनवता केवळ माहितगार आणि ज्ञानी बनवणे धोकादायक ठरणार आहे, असेही डॉ. अडसूळ यांनी स्पष्ट केले.

### केवळ पदव्या मिळवण्याचे साधन

*ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थी वर्गाला उपस्थित आहे का इथंपासून ते शिकवलेले त्याला समजले का इथंपर्यंत कशाचाही मागमूस लागत नाही. त्यामुळे ऑनलाइन शिक्षण केवळ पदव्या मिळवण्याचे साधन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अपेक्षित ज्ञानापासून विद्यार्थी वंचित राहण्याचा धोका निर्माण झाला आहे, असेही डॉ. अडसूळ यांनी सांगितले.*

Pune Edition
Sep 14, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांची संख्या लवकरच पाच लाख

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** महाविद्यालयीन शिक्षण घेताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजसेवेची आवड निर्माण व्हावी आणि सामजिक प्रश्नांची जाणीव होऊन विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, यासाठी या योजनेच्या विद्यार्थ्यांची संख्या आता पाच लाख करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. दर पाच वर्षांनी नॅक मूल्यांकन करणे महाविद्यालयांवर बंधनकारक आहे. राज्य शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाने सूचना देऊनही ते पूर्ण न केलेल्या महाविद्यालयांनी तीन महिन्यांमध्ये ही प्रक्रिया सुरू करावी, अन्यथा त्याची गंभीर दखल घेण्यात येईल, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

पाटील यांनी विभागाची आढावा बैठक घेतली. यावेळी ते म्हणाले, सामजिक बांधिलकी जोपासण्यासाठी नेतृत्व गुण, लोकशाहीचा विकास आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यासाठी योजनेतील विद्यार्थ्यांची संख्या तीन लाख ७० हजारांवरून आता पाच लाख करण्यात येणार आहे. वाढीव विद्यार्थ्यांचा खर्च राज्य शासन करणार आहे. शासकीय महाविद्यालय व खासगी महाविद्यालयांतील शैक्षणिक शुल्कात मोठी तफावत आहे. ही तफावत कमी होणे आवश्यक असून विद्यार्थ्यांना कमी खर्चात दर्जेदार उच्च शिक्षण मिळाले पाहिजे. यासाठी उच्च शिक्षण विभागाअंतर्गत नाविन्यपूर्ण शैक्षणिक योजना, विविध उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी आणि उत्कृष्ट नियोजन करावे.

लोकसत्ता Wed, 14 September 2022
https://epaper.loksatta.com/c/70116379

# News Paper Clippings During September 2022

## Section: Education

### विद्यापीठातर्फे ६ नोव्हेंबरला पीएच.डी. प्रवेश परीक्षा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची पीएच.डी. प्रवेश परीक्षा (पेट) ६ नोव्हेंबरला परीक्षा केंद्रांवर ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. त्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी ३० सप्टेंबरची मुदत देण्यात आली असून, या परीक्षेद्वारे विद्यापीठातील शैक्षणिक विभाग आणि संलग्न संशोधन केंद्रातील पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या एकूण तीन हजार १८७ हजार जागा भरण्यात येणार आहे.

विद्यापीठाने पेट परीक्षेचे परिपत्रक गुरुवारी प्रसिद्ध केले. त्यामुळे परीक्षेच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार शंभर गुणांची परीक्षा असेल. परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांची मुलाखत घेऊन निवड यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. एम.फिल., नेट, पेट २०२१ अशा परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना ही परीक्षा न देण्याची सवलत दिली जाईल. उमेदवारांना अर्जासोबतच कागदपत्रे अपलोड करावी लागतील. या परीक्षेचा निकाल १० नोव्हेंबरला प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. परीक्षेबाबत अधिक माहिती उमेदवारांना https:// bcud. unipune. ac. in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

लोकसत्ता Fri, 16 September 2022
https://epaper.loksatta.com/c/70148950

### अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या विशेष फेरीत ६ हजार ७३७ विद्यार्थ्यांना प्रवेश

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या विशेष फेरीत ६ हजार ७३७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला असून, ४ हजार २८५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले. केंद्रीय अकरावी ऑनलाइन प्रवेश समितीतर्फे ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये १ लाख १० हजार ९९० जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यापैकी ९३ हजार ९६० जागा केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेद्वारे भरल्या जाणार आहेत. प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या आणि एका विशेष फेरीद्वारे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले. तर अद्याप प्रवेश न घेतलेले विद्यार्थी, पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी आणि एटीकेटी सवलत प्राप्त विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळण्यासाठी दुसरी विशेष फेरी राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

दुसऱ्या विशेष फेरीची गुणवत्ता यादी आणि महाविद्यालय प्रवेश गुरुवारी जाहीर करण्यात आले. दुसऱ्या विशेष फेरीत ९ हजार ४१५ विद्यार्थी सहभागी झाले. त्यातील ६ हजार ७३७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला, तर २ हजार ६७८ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला नाही. प्रवेश जाहीर झालेल्यांपैकी ४ हजार २८५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे, १ हजार १३४ विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंतीचे, ५०४ विद्यार्थ्यांना तिसऱ्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले.

लोकसत्ता Fri, 16 September 2022
https://epaper.loksatta.com/c/7(

सकाळ

### अकरावीच्या दुसऱ्या विशेष फेरीची यादी जाहीर

**पुणे, ता. १५ :** इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत दुसऱ्या विशेष फेरीची गुणवत्ता यादी गुरुवारी जाहीर झाली. या फेरीत सहा हजार ७३७ विद्यार्थ्यांना महाविद्यालये मिळाली आहेत. महाविद्यालये मिळालेल्या विद्यार्थ्यांना येत्या शनिवारपर्यंत (ता. १७) प्रवेश निश्चित करण्यासाठी मुदत दिली आहे.

या फेरीत चार हजार २८५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे, तर एक हजार १३५ विद्यार्थ्यांना दुसऱ्या, ५०४ विद्यार्थ्यांना तिसऱ्या, २९३ विद्यार्थ्यांना चौथ्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे. या प्रवेश फेरीसाठी ३७ हजार ८६९ जागा उपलब्ध होत्या, त्यासाठी नऊ हजार ४१५ विद्यार्थी पात्र ठरले. विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करणे, प्रवेश रद्द करणे, तसेच प्रवेश नाकारणे, ही प्रक्रिया शनिवारपर्यंत सुरू राहणार आहे. प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती पोर्टलवर नोंदविण्यासाठी उच्च माध्यमिक विद्यालयांना शनिवारी रात्री आठ वाजेपर्यंत मुदत दिली आहे. त्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयांना रिक्त जागांचा तपशील रविवारी (ता. १८) जाहीर करण्यात येणार आहे.

Pune, Main
16/09/2022 Page No. 2

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

पुढारी



स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेने विद्यापीठ मेन गेट ते संविधान स्तंभापर्यंत काढलेली रॅली.

# 'यूजीसी' बंद करण्याचे षड्यंत्र

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरण शिक्षणाचे बाजारीकरण करणारे असून, बहुसंख्य गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याबरोबरच विद्यापीठ अनुदान आयोग रद्द करण्याचे केंद्र सरकारचे षड्यंत्र आहे, अशी टीका जेएनयू विद्यार्थी नेत्या व स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय सहसचिव दिप्सिता धर यांनी केली.

शिक्षण वाचवा, संविधान वाचवा, देश वाचवा या संकल्पनेला घेऊन देशभरात स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेच्या वतीने 'अखिल भारतीय जथ्याचे' आयोजन केले आहे. या जथ्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात गुरुवारी जोरदार स्वागत करण्यात आले. या जथ्याचे नेतृत्व एसएफआयच्या राष्ट्रीय सहसचिव, तसेच जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्लीमध्ये पीएचडीचे शिक्षण घेत असलेल्या दिप्सिता धर या करत असून, शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुणे जिल्ह्यात गुरुवारी या जथ्याचे आगमन झाले. या वेळी विद्यापीठ मेन गेट ते संविधान स्तंभ अशी रॅली काढण्यात आली होती. त्यानंतर विद्यापीठ मुख्य इमारत येथे झालेल्या जाहीर सभेस संबोधित करताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी पुणे जिल्हाध्यक्ष अविनाश गवारी होते.

**केंद्र सरकारवर दिप्सिता धर यांची टीका**

या वेळी मंचावर एसएफआय राज्य अध्यक्ष बालाजी कलेटवाड, राज्य सहसचिव नितीन वाव्हळे, मलेशम कारमपुरी, छत्तीसगड राज्य निमंत्रक अर्चना धुर्व, जिल्हा सचिव नवनाथ मोरे, विलास साबळे, जन आरोग्य मंचचे डॉ. ज्ञानेश्वर मोटे, गणेश दराडे उपस्थित होते.

या वेळी विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी तुकाराम शिंदे, युक्रांदचे कमलाकर शेटे, दलित पँथरचे राहुल ससाणे, विद्यार्थी ओम यांनी मनोगत व्यक्त करीत जत्थाला शुभेच्छा दिल्या. अक्षय निर्मळ यांनी सूत्रसंचालन केले.

My Pune Edition
Sep 16, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

सामना

# विद्यार्थ्यांची 'गृहपाठा'तून सुटका! सरकार अभ्यास करतेय!!

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) – पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा गृहपाठ बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आज तसे सूतोवाच केले. तज्ज्ञांशी चर्चा करून लवकरच यासंदर्भात निर्णय घेऊ असे म्हणाले.

मुलांच्या मेंदूचा विकास व्हायला हवा. त्यावर जास्त ताण नको. तसे गृहपाठ ही शिक्षकांसाठी पळवाट नको. जे काही अर्धा तास शिकवतात ते शिक्षकांनी लक्षपूर्वक शिकवले पाहिजे. विद्यार्थ्यांना गृहपाठ करण्याची गरजच राहता कामा नये, हे माझे वैयक्तिक मत असल्याचे केसरकर म्हणाले. यासंदर्भात शिक्षक संघटना, संस्थाचालक यांच्याशी बोलल्यानंतरच निर्णय घेतला जाईल, असेही शिक्षणमंत्र्यांनी सांगितले.



### शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ काय म्हणतात...

- गृहपाठबंदीच्या 'विचारा'वर शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कोरोनाकाळात विद्यार्थ्यांची लिहिण्याची आणि वाचण्याची सवय तुटली आहे. त्याचा आधी विचार करा असे काहींचे म्हणणे आहे.
- गृहपाठ बंद ही पालकांसाठी आनंदाची बातमी कधीच नव्हती. विद्यार्थ्यांवर गृहपाठाचा ताण येतो म्हणून तो बंद करणे योग्य नाही. त्यापेक्षा गृहपाठाचे स्वरूप बदलून प्रश्नोत्तराला पर्याय आणा, असे शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब चासकर यांनी म्हटले आहे.
- शिक्षण क्षेत्रात मागील अनेक वर्षांपासून विद्यार्थी, शिक्षकांशी निगडित समस्या जैसे थे आहेत. या समस्यांचा गृहपाठ आधी पूर्ण करा, अशी सूचनाही काहींनी सरकारला केली आहे.

### एकच पुस्तक घेऊन जाणार

*शाळेतील पुस्तक बदलले जात असून एक धडा झाल्यावर त्यालाच जोडलेले दोन कोरे कागद असतील. म्हणजे मुले धडा पूर्ण झाल्यावर त्यातच नोंद करून ठेवतील. पुस्तके तीन भागांमध्ये असतील. म्हणजे जेव्हा विद्यार्थी शाळेत जाईल तेव्हा वही न घेता फक्त एकच पुस्तक घेऊन जाईल, असेही केसरकर यांनी सांगितले.*

### पाचवीपासून शेती



ग्रामीण भागातील शाळांमध्ये 'शेती' विषय शिकवला जाणार आहे. पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शेतीचे धडे दिले जातील, असे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी जाहीर केले आहे. नोकरी नाही मिळाली तरी बेहत्तर, पण ग्रामीण विद्यार्थी अत्याधुनिक शेतीत पारंगत होतील. परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखता येतील, असा हेतू यामागे असल्याचे कृषिमंत्र्यांनी सांगितले.

शेतीची प्रयोगशाळा म्हणून काही सरकारी जमिनी शाळांकडे सोपविण्यात येतील. शिवाय शिक्षकांनाही प्रशिक्षण दिले जाईल, असेही सत्तार यांनी सांगितले.

Pune Edition
Sep 17, 2022 Page No. 1
Powered by : eReleGo.com

सकाळ

## अकरावी प्रवेश : 'कॅप'अंतर्गत ३४ हजार जागा विद्यार्थ्यांच्या प्रतीक्षेत

# पुण्यात ४१ हजार जागा रिक्त

**पुणे, ता. १६ :** दहावीच्या निकालात वाढ होऊनही यंदा पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील कनिष्ठ महाविद्यालयांमधील इयत्ता अकरावीच्या जवळपास ४१ हजार ९५२ जागा रिक्त आहेत. दुसऱ्या विशेष फेरीनंतरही नोंदणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकलेले नाही. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतंर्गत ३४ हजार ६४० जागा, तर कोटाअंतर्गत सात हजार ३१२ जागा रिक्त आहेत.

अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या पूर्ण झाल्या. या फेऱ्यांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केले, प्रथम पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश निश्चित न केल्याने अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द झाले. त्यावेळी अकरावीच्या जागाही अधिक प्रमाणात रिक्त होत्या. त्यामुळे केंद्रीय प्रवेश समितीने विशेष फेऱ्यांचे आयोजन केले, आतापर्यंत दोन विशेष फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. तरीही पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील ३७.७१ टक्के जागा रिक्त आहेत, तर कॅप फेरीअंतर्गत ३६.५२ टक्के जागा अद्यापही रिक्त असल्याचे निदर्शनास येत आहे.

### अद्याप रिक्त जागा राहण्याची कारणे

- प्रवेशासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत जागांची संख्या अधिक
- अकरावी प्रवेशासाठी नोंदणी करून आयटीआय, पदविका अभ्यासक्रमाला प्रवेशाचा कल
- नामांकित महाविद्यालयातच प्रवेशाबाबत विद्यार्थी-पालकांचा आग्रह
- 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरी'साठी होतेय प्रतीक्षा
- पसंतीचे महाविद्यालय न मिळाल्याने अद्यापही विद्यार्थी प्रवेशापासून दूर

"दहावीला ६३ टक्के असून शहरातील नामांकित महाविद्यालयात विज्ञान शाखेला प्रवेश मिळावा, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे त्याच महाविद्यालयांची नावे पसंतीक्रमात नोंदवीत आहे. आता 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' फेरीअंतर्गत संबंधित महाविद्यालयात प्रवेश मिळण्याची शक्यता वाटत आहे. त्यामुळे अद्याप प्रवेश निश्चित केलेला नाही.
– एक विद्यार्थी




Pune, Pune-Today
17/09/2022 Page No. 1

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

पुढारी

# शालेय गृहपाठ बंद करण्याचा विचार

## शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचे सूतोवाच; तज्ज्ञांशी चर्चा करणार



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

शालेय विद्यार्थ्यांचा गृहपाठ बंद करण्याबाबत राज्य सरकार गांभीर्याने विचार करीत असून तज्ज्ञांशी चर्चा करून याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे सूतोवाच शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी पुण्यात पत्रकारांशी बोलताना केले. तसेच मुलांना शाळेच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करता यावे, म्हणून शाळांच्या वेळा कमी करण्याकडे भर देणार असल्याचेही त्यांनी येथील दुसऱ्या कार्यक्रमात सांगितले.

शिक्षण विभागाच्या आढावा बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना केसरकर म्हणाले, मुलांना अतिरिक्त ताण देऊ नये. त्यांच्या मेंदूचा विकास होऊ दिला पाहिजे. शिक्षकांसाठी गृहपाठ ही पळवाट असता कामा नये. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कमी वेळेत पटकन समजेल असे शिकवावे, जेणेकरून त्यांना गृहपाठाची गरज भासणार नाही,

असे माझे वैयक्तिक मत आहे. परंतु हा मोठा निर्णय असून याबद्दल शिक्षक संघटना, संस्था चालक यांच्याशी बोलणार आणि मग त्यावर पान ६ वर

**पुस्तकालाच वह्यांची पाने जोडणार**

पुस्तकांमध्येही बदल केला जाणार आहे, एक धडा झाल्यानंतर वह्यांची दोन पाने त्यालाच जोडली जाणार आहेत. धडा वाचून मुले त्यात नोंदी घेऊ शकतात. हे पुस्तक तीन भागात असणार आहे. पुढील वर्षी विद्यार्थी शाळेत जाताना एकच पुस्तक घेऊन जाईल.

**शालेय अभ्यासक्रमात पाचवीपासून शेतीचा विषय** | आतील पानांत | **यंदाही शैक्षणिक वर्षाचा बट्ट्याबोळ होणार**

Pune Edition
Sep 17, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## शालेय गृहपाठ बंद करण्याचा विचार

(पान १ वरून) निर्णय घेण्यात येणार आहे.

**डॉक्टरांना डीआर तसे शिक्षकांना टीआर?**

डॉक्टरांसाठी डीआर, वकिलांसाठी एडीव्ही वापरले जाते तसेच शिक्षकांसाठी टीआर संबोधता येईल का यावर विचार सुरू आहे. मी जेव्हा शिक्षकांकडून अपेक्षा ठेवतो तेव्हा शिक्षणमंत्री म्हणून त्यांना मान देण्याची जबाबदारी माझीसुद्धा असल्याचे मंत्री केसरकर यांनी सांगितले.

**गृहपाठ रद्द होणार नाही : मुख्यमंत्र्यांचे संकेत**

विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा येईल असा कोणताही निर्णय राज्य सरकार घेणार नाही असे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गृहपाठ रद्द करण्याचा निर्णय घेतला जाणार नसल्याचा संकेत दिला आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी याबाबतची भूमिका स्पष्ट केली. यानिमित्ताने राज्य सरकारमधील विसंवाद पुन्हा एकदा समोर आला.

Pune Edition
Sep 17, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

पुढारी

# यंदाही शैक्षणिक वर्षाचा बट्ट्याबोळ होणार

## प्रवेशाचा गोंधळ : व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शैक्षणिक सत्र कोलमडणार!

पवन होन्याळकर

**मुंबई : कोरोनामुळे गेली दोन वर्षे शैक्षणिक सत्र लांबले. त्यामुळे ही वर्षे वाया गेली. यंदाच्या शैक्षणिक वर्षात कोरोनाचे निर्बंध कमी झाले असतानाही व्यावसायिक अभ्यासक्रमाचे वर्ष अद्याप सुरू झालेले नाही. नीट, जेईई आणि एमएचटी-सीईटीचा ताळमेळ बसवण्यासाठी तारखांचा झालेला घोळ आणि एआयसीटीईचा शैक्षणिक वर्ष ऑक्टोबरपासून चालू करण्याचा फतवा यामुळे यंदाही शैक्षणिक वर्षाचा बट्ट्याबोळ होणार आहे.**



राज्यातील अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी आणि अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी सेलकडून दरवर्षी प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. त्या गुणांच्या आधारे या अभ्यासक्रमांच्या तब्बल तीन लाख जागांवर प्रवेश दिले जातात. यंदा कोरोनाचे संकट फारसे नव्हते. तरीही परीक्षा या ना त्या कारणाने लांबल्या. मे महिन्यापासून आत्तापर्यंत तब्बल आठ लाख विद्यार्थी घरी बसून आहेत. सरकारने परीक्षा तारखांचा घोळ घातला नसता तर परीक्षा मे मध्ये घेऊन निकालही जाहीर झाले असते. ऑगस्टमध्ये परीक्षा आणि आता निकालासाठी निम्मा सप्टेंबर संपला. केवळ एमएचटी या परीक्षेसाठी राज्यातून ६ लाख ५ हजार ९४४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील ४ लाख ६७ हजार ३७९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये मुलांची संख्या २ लाख ६४ हजार ७६७ तर मुलींची संख्या २ लाख २ हजार ६१२ इतकी आहे. यामध्ये पीसीबी ग्रुपमधून २ लाख ३१ हजार २६४ तर पीसीएम ग्रुपमध्ये २ लाख ३६ हजार ११५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. प्रवेश वेळेत झाले नाही तर शैक्षणिक वेळापत्रक कोलमडण्याची भीती आहे. कोरोनामुळे गेल्यावर्षी प्रवेशाला मोठा फटका बसला. पूर्ण तुकडीला विद्यार्थी मिळाले नसल्याने संस्थाचालकांनी अनेक तुकड्या बंद केल्या. यंदाही प्रवेश फेरी लांबली आहे.

सप्टेंबरमध्ये निकाल आणि त्यानंतर प्रवेश प्रक्रिया एक महिना चालणार आहे. त्यानंतर महाविद्यालये सुरू होतील. इतक्या कमी कालावधीत विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम कसा पूर्ण करायचा, असा सवालही **पान ६ वर**

### प्रवेशासाठी हे विद्यार्थी वेटिंगवर

एमएचटी सीईटी : ४,६७,३७९, एमसीए : ३१०५०, एमबीए : १०३७३९, विधी ५ वर्ष : १९३४९, विधी ३ वर्ष : ५५५३१, बी.एड : ७३३४२, एम.एड : २४५६, बीपीएड : ५१२९, एम.पी.एड. : १९२४, बीएबीएड, बीएस्सीबी.एड (एकात्मिक) : ९२९, बी.एड-एम.एड (एकात्मिक) : ९६१, बीएचएमसीटी : ४३३, एमएचएमसीटी : १६, एम.आर्च : ५८३.

"प्रवेश उशिरा झाले तर जादा तास घेऊन अभ्यासक्रम पूर्ण करावे लागणार आहेत. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकांचे प्रयत्न असतात.

**- अनुराधा मजुमदार,**
माजी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, मुंबई विद्यापीठ

Pune Edition
Sep 17, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# यंदाही शैक्षणिक वर्षाचा बट्ट्याबोळ होणार

**(पान ३ वरून)** संस्थाकडून उपस्थित केला जात आहे. याला पालकांनीही जोरदार आक्षेप घेतले आहेत. प्रवेश आणि त्यानंतरच्या सत्र परीक्षा कशा घेणार, असा सवाल पालकांनी उपस्थित केला आहे.

**शैक्षणिक सत्रांचा नेमका गोंधळ कुठे?**

१. अभियांत्रिकी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी २० ऑक्टोबरपूर्वी जाहीर करावी, असे आदेश अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने (एआयसीटीई) दिले. यामुळे सीईटी परीक्षांचे वेळापत्रक लांबले. त्या तुलनेत बारावीनंतर विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील एफवाय पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश लवकर झाले आहेत. त्यामुळे व्यावसायिक प्रवेशासाठी थांबलेले पालक गोंधळात आहेत.

२. आता निकाल जाहीर होत असले तरी यानंतर महिनाभर प्रवेश प्रक्रिया आणि त्यानंतर वर्ग सुरू होणार आहेत. राज्यातील अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी आणि डीएड, बीएड आदी अभ्यासक्रमांचे शैक्षणिक सत्रच कोलमडण्याची भीती आहे. परीक्षा कालावधी आणि जात असलेला वेळ यामुळे विद्यार्थी अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या जागा भरणे मुश्कील होणार आहे.

३. फार्मसी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनेक संस्थांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडून मान्यताच मिळाली नसल्याने हे प्रवेशही लटकले आहेत. डीफार्मसाठी अर्ज घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र प्रवेश देण्यासाठी अद्याप अनेक संस्थातील जागांना मंजुरी व मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे फार्मसी (औषध निर्माणशास्त्र) प्रवेश कधी सुरू होतील हे सांगता येत नाही.

Pune Edition
Sep 17, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# निर्णय 'गृहपाठा'नंतरच

## 'चौथीपर्यंत गृहपाठ बंद'बाबत दीपक केसरकर यांचे स्पष्टीकरण

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'आगामी शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा गृहपाठ (होमवर्क) बंद करण्याचा केवळ विचार सुरू असून, कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. याबाबत शिक्षक संघटना, संस्थाचालक यांच्याशी चर्चा केल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे,' अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी दिली. राज्यातील तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षाही जुन्या पद्धतीने सुरू करण्याचा विचार असल्याचे केसरकर यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळ येथे केसरकर यांनी शुक्रवारी शिक्षण विभागाची आढावा बैठक घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. केसरकर म्हणाले, 'मुलांवर अभ्यासाचे ओझे देऊ नये. मुलांच्या मेंदूचा विकास झाला पाहिजे. यासोबतच गृहपाठ ही शिक्षकांसाठी पळवाट असता कामा नये. अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना पटकन आणि योग्य प्रकारे समजेल, अशा पद्धतीने शिक्षकांनी शिकवण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांना गृहपाठाची गरज भासणार नाही.'

**"शिक्षण मंत्री झाल्यानंतर मी सर्व शैक्षणिक विभागांचे कामकाज समजून घेत आहे. शिक्षण विभागातील अधिकारी आणि तज्ज्ञांकडून शैक्षणिक प्रक्रियांची माहिती घेत आहे. त्यामुळे केवळ निर्णय घेऊन, त्याची घोषणा करणे, मला पटत नाही. शिक्षण विभागात माझ्यापेक्षा तज्ज्ञ मंडळी आहेत. त्यामुळे त्यांच्याशी आणि शिक्षकांशी चर्चा करूनच शालेय शिक्षण विभागाचे निर्णय घेईन.**

**– दीपक केसरकर,** शालेय शिक्षण मंत्री

**"'गृहपाठ बंद' ही पालकांसाठी आनंदाची बातमी नाही. उलट घरचा अभ्यास देण्यासाठी पालकांचाच आग्रह असतो. काही मुलेही 'घरचा अभ्यास द्या' असे शिक्षकांना म्हणतात आणि आवडीने अभ्यास पूर्ण करून आणतात.**

**– भाऊ चासकर,** शिक्षक



**गृहपाठ बंद करण्यासारखे घातकी निर्णय घेण्यासाठी कोणते तज्ज्ञ सल्ले देतात, हे कधीच पुढे येत नाही. घरी गृहपाठ केल्यास, अभ्यासाची उजळणीही होते आणि दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांना पुढचा पाठ्यक्रम शिकवणे सुलभ होते. सरसकट गृहपाठ बंदीमुळे बालकांचा अभ्यास थांबेल.**

**– विजय कोंबे,** सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

पुढील वर्षापासून पहिली ते आठवी इयत्तेपर्यंतच्या विद्यार्थ्यांना असणाऱ्या नवीन पाठ्यपुस्तकांमध्ये वह्यांची पाने जोडण्यात येणार आहे. यात कोरी पाने उत्तरे लिहिण्यासाठी दिली जाणार आहेत. शाळेतच नोट्स काढून विद्यार्थ्यांचा अभ्यास घेतला जाईल, असा सरकारचा प्रयत्न आहे. यासोबतच विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे ओझेही कमी करण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी जास्त वेळ मिळावा आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, हा हेतू आहे, असे केसरकर यांनी सांगितले.

गृहपाठ बंद करण्याच्या केसरकर यांच्या वक्तव्यावरून शिक्षण क्षेत्रातून उलट-सुलट प्रतिक्रिया उमटत असून, शिक्षक आणि संघटनांनी विरोध केला आहे.

**शाळेच्या परीक्षेत अनुत्तीर्ण करणार?**

राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होत नाहीत. त्यामुळे त्यांची शैक्षणिक गुणवत्ता कळत नाही. या पार्श्वभूमीवर तिसरी ते आठवीच्या परीक्षा पुन्हा जुन्या पद्धतीने सुरू करण्याचा विचार आहे. त्यामुळे या परीक्षेतून विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता समजून घेता येईल, अशी माहिती केसरकर यांनी दिली. मात्र, या परीक्षेत अनुत्तीर्ण केले जाणार, की नाही, याबाबत कोणतीही माहिती केसरकर यांनी दिली नाही.

Maharashtra Times 17.9.2022

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

# चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची गृहपाठातून सुटका

## तज्ज्ञांबरोबर चर्चा करून लवकरच अंतिम निर्णय : केसरकर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** लहान मुलांच्या मेंदूचा विकास झाला पाहिजे. त्यासाठी त्यांच्यावरील अभ्यासाचे ओझे कमी झाले पाहिजे. तसेच, गृहपाठ ही शिक्षकांसाठी पळवाट असता कामा नये. यासाठी चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी गृहपाठ बंद करण्याच्या हालचाली शिक्षण विभागाने सुरू केल्या आहेत. राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनीही त्याला दुजोरा दिला असून गृहपाठ बंद झाला पाहिजे, अशी आपली व्यक्तिगत भूमिका असून याबाबत तज्ज्ञांशी चर्चा करून लवकरच निर्णय घेणार असल्याची माहिती त्यांनी शुक्रवारी दिली.

चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा गृहपाठ ही पालकांची मोठी डोकेदुखी असते. त्यातच मुलांच्या मेंदूचा विकास होण्यासाठी त्यांना अधिक ताण देऊ नये. त्यांना खेळण्यासाठी जास्त वेळ मिळावा आणि त्यातून त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या दृष्टिकोनातून शिक्षण विभाग हा निर्णय घेण्याची तयारी करीत आहे. गृहपाठबंदी हा मोठा विषय असून या संदर्भात शिक्षकांच्या संघटना, संस्थाचालक तसेच शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांशी बोलून निर्णय घेणार आहे. इतका मोठा निर्णय सहजासहजी घेता येणार नाही, असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

"लहान मुलांवर अभ्यासाचे अधिक ओझे असता कामा नये. त्यांच्या मेंदूचा विकास होऊ दिला पाहिजे. शिक्षकांबद्दल आदर आहे. मात्र गृहपाठ ही शिक्षकांसाठी पळवाट असता कामा नये. आपण जे काही अर्धा तास शिकवतो ते त्यांनी लक्षपूर्वक शिकवले पाहिजे, की विद्यार्थ्यांना गृहपाठ करण्याची आवश्यकताच राहता कामा नये. - दीपक केसरकर, शिक्षणमंत्री





### पुढील वर्षी पुस्तकांत कोरी पाने...

सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत दिली जाणारी पुस्तके बदलणार असून एक धडा झाल्यावर त्यालाच जोडलेली दोन कोरी पाने असतील. त्यामुळे धडा झाल्यानंतर मुले त्यातच नोंद करू शकतील. ही पुस्तके तीन भागांमध्ये असतील. पुढच्या वर्षी जेव्हा मुले शाळेत जातील तेव्हा त्यांना एकच पुस्तक घेऊन शाळेत जाता येईल. त्यामुळे पुस्तके, वही शोधण्यात त्यांचा गोंधळ उडणार नाही. हा नवा प्रयोग राज्यात शंभर टक्के यशस्वी होईल, असा विश्वास शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केला.

लोकसत्ता Sat, 17 September 2022
https://epaper.loksatta.com/c/70160865

# निवड प्रक्रियेला गती

## पुणे विद्यापीठासह, मुंबई, संस्कृत विद्यापीठासाठी प्रतिनिधी घोषित

मटा इम्पॅक्ट

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू निवड प्रक्रियेला गती मिळाली असून, कुलगुरू शोध समितीसाठी राज्य सरकारतर्फे दीपक कपूर यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी तातडीने त्यांच्या प्रतिनिधीची (अध्यक्ष) घोषणा करून निवड प्रक्रियेला सुरुवात करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे डिसेंबर अखेरपर्यंत विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



'कुलगुरू निवड' कोर्टात

"पुणे विद्यापीठ आणि राज्य सरकारने त्यांचे प्रतिनिधी कुलगुरू शोध समितीसाठी जाहीर केले आहेत. त्यानुसार आता राज्यपालांनी समितीच्या अध्यक्षांची घोषणा करावी. ही प्रक्रिया तातडीने झाल्यास पुणे विद्यापीठाला पुढील दोन महिन्यांत नवे कुलगुरू मिळतील.
- धनंजय कुलकर्णी,
माजी सिनेट सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**महत्त्वाचे निर्णय घेताना अडचणी**

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर १८ मे रोजी निवृत्त झाले. तेव्हापासून विद्यापीठाचा कारभार प्रभारी कुलगुरू डॉ. कारभारी काळे आणि प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्यामार्फत सुरू आहे. मात्र, पुणे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र मोठे असल्याने, विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरूची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरू नसल्याने महत्त्वाचे निर्णय घेताना आणि शैक्षणिक गुणवत्ता टिकवताना अडचणी येतात, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरूंची आवश्यकता असून, त्यांच्या निवडीसाठी तीन सदस्यीय कुलगुरू शोध समिती स्थापन होणे गरजेचे आहे. ही गरज ओळखून पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाने समितीसाठी 'आयआयटी' कानपूरचे प्रा. अभय करंदीकर यांची पूर्वीच घोषणा केली आहे. याबाबत 'महाराष्ट्र टाइम्स'ने वृत्तांद्वारे भूमिका मांडली होती.

**याचिकेनंतर सदस्यांची घोषणा**

सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील प्रस्तावित बदलांना विरोध झाल्याने, ही प्रक्रिया ठप्प होती. या पार्श्वभूमीवर कुलगुरू शोध समिती स्थापन होऊन, निवड प्रक्रिया तातडीने सुरू होण्यासाठी पुणे विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य धनंजय कुलकर्णी आणि बागेश्री मंठाळकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

या याचिकेला अनुसरून राज्य सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ अशा तीन विद्यापीठांच्या कुलगुरू शोध समितीसाठी सदस्यांची घोषणा केली आहे.

पुणे विद्यापीठासाठी सरकारचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर, मुंबई विद्यापीठासाठी अतिरिक्त मुख्य सचिव आनंद लिमये आणि संस्कृत विद्यापीठासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे राज्यपाल कार्यालयाने तातडीने सदस्याची नियुक्ती करून समितीचे कामकाज सुरू करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

Maharashtra Times 17.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

लोकमत

# अकरावीची विशेष तिसरी फेरी आजपासून; २४ पर्यंत करा अर्ज

## तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर : गुणवत्ता यादी २५ सप्टेंबरला

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे, पिंपरी, चिंचवड महापालिका क्षेत्रातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत आता तिसरी विशेष फेरी सोमवार (दि. १९)पासून राबविली जाणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना १९ ते २४ सप्टेंबरच्या दरम्यान अर्ज भरण्यासह अर्जात दुरुस्ती, पसंतीक्रम नोंदविणे, अर्जाचा भाग दोन भरणे व प्रवेश निश्चित करणे आदी प्रक्रिया करता येणार आहे.

### अर्ज पुन्हा लॉक करणे गरजेचे

- विशेष फेरीमध्ये दहावी उत्तीर्ण सर्व विद्यार्थी, एटीकेटी सवलत प्राप्त विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. त्यांनी ६ विषयांमध्ये मिळालेल्या ६०० पैकी गुण नोंदवावेत. यापूर्वी अर्ज भरलेले आणि प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही सहभागी होता येईल.
- विशेष फेरीत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्याने नव्याने संमती देणे आवश्यक असल्याने, सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जाचा भाग दोन अनलॉक करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम सुधारित करून, अर्ज पुन्हा लॉक करणे गरजेचे आहे.

### ही फेरी शेवटची

अकरावी प्रवेशाची ही शेवटची फेरी असणार आहे. यानंतर, एफसीएफएस फेरी होणार नाही, असे संचालनालयाचे जारी केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन केले आहे. त्यामुळे या फेरीत प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

या तिसऱ्या विशेष फेरीची निवड यादी २५ सप्टेंबरला जाहीर होईल, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक कार्यालयाने दिली.

अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत आत्तापर्यंत तीन नियमित फेऱ्या, तर दोन विशेष फेरी अशा एकूण पाच फेऱ्या राबविण्यात आल्या. अद्याप तब्बल ४० हजार जागा रिक्त आहेत. गेल्यावेळी विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत असल्याने, तसेच राज्य मंडळाने घेतलेल्या पुरवणी परीक्षेच्या निकालातील उत्तीर्ण आणि एटीकेटी सवलत प्राप्त विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळण्यासाठी दसरी विशेष फेरी राबविली होती.

तिसऱ्या फेरीची निवड यादी २५ सप्टेंबरला जाहीर होणार असून, त्यापूर्वी २३ सप्टेंबर या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी महाविद्यालय निवड यादी संकेतस्थळावर प्रदर्शित करणे, प्रवेशासाठी मिळालेले उच्च माध्यमिक विद्यालय दर्शविणे. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रवेश लॉगिनमध्ये दर्शविणे, फेरीचे कटऑफ पोर्टलवर दर्शविणे व महाविद्यालयात प्रत्यक्ष जाऊन प्रवेश निश्चित करणे आदी प्रक्रिया पार पडेल, तसेच २४ सप्टेंबरच्या सायंकाळी सहा वाजेपर्यंत ऑनलाइन प्रवेश निश्चित करणे, रद्द करणे व नाकारता येईल.

Hello Pune
Page No. 3 Sep 19, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

लोकमत

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कामकाज सुधारणार कधी?

# शिक्षणाचा बट्ट्याबोळ!

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : पदवीच्या परीक्षेसाठी विद्यापीठाकडून ५ ते ६ महिने विलंब केले गेल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसाना होताना दिसत आहे. बॅचलर ऑफ आर्टस (बीए) आणि बॅचलर ऑफ कॉमर्स (बी.कॉम) करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा एप्रिलमध्ये अपेक्षित होत्या, मात्र थेट सहा महिन्यांनी सुरू झाल्या आहेत. त्यामुळे अभ्यासक्रमाचे चक्रच बिघडून गेले आहे.

राज्यातील इतर विद्यापीठांनी कोरोना संकट काळातही वेळेत परीक्षा घेतल्या. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे परीक्षांना उशिर झाला असून, त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसला आहे. यावरून शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाल्याची तीव्र प्रतिक्रिया पालक, विद्यार्थी व्यक्त करीत आहेत.

### ...तरच प्रवेश निश्चित

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची प्रवेशपरीक्षा घेऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि इतर महाविद्यालयांनी एम.ए., एम.कॉम यांसारख्या पदव्युत्तर पदवीच्या प्रथम वर्षाला तात्पुरता (प्रोव्हिजनल) प्रवेश दिला असला तरी, खरे भवितव्य आता होत असलेल्या बी.ए., बी.कॉम.च्या अंतिम वर्षाच्या निकालावरच अवलंबून राहणार आहे. त्यात हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले तरच ते पुढे जाऊ शकतात. नापास झाले तर त्यांचा प्रोव्हिजनल प्रवेशही रद्द होणार आहे. या अटींवरच त्यांना प्रवेश देण्यात आला आहे.



### प्रत्येक समस्येचे खापर कोरोनावर

पुण्यासह नगर व नाशिक जिल्ह्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आहे. विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांत मिळून दरवर्षी सर्व शाखांचे मिळून सात ते आठ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठाचा देशात व परदेशात नावलौकिक आहे. मात्र, कोरोनामुळे विद्यापीठाच्या कामकाजावर परिणाम झाला. त्यावर मात करण्याऐवजी प्रत्येक समस्येचे खापर कोरोनावर फोडले गेले. त्यामुळे, खरे नुकसान हे विद्यार्थ्यांचे होत आहे. याबाबत परीक्षा विभागाचे प्रमुख महेश काकडे यांना संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये अनियमितता दिसून येत आहे. उशिरा परीक्षा सुरु करून उशिरा निकाल लावण्याचा जणू पायंडाच पडला आहे. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना मिळालेली नोकरी सोडण्याची वेळ आली आहे. शैक्षणिक वर्षात जवळपास ५ ते ६ महिन्यांचे अंतर पडले आहे. आता लागलेल्या निकालाबाबत विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून किंवा विद्यापीठाकडून कंबाईन पासिंग ग्रेस मार्क्सबाबत स्पष्टता दिली जात नाही.

**- सचिन पांडुळे, शहर अध्यक्ष, युक्रांद**

### कुलगुरूंची नियुक्ती रखडली अन् कामेही थांबली

पाच महिने होऊनही विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरू नाहीत, ही मोठी शोकांतिका आहे. सध्याच्या कुलगुरूंकडे दुहेरी जबाबदारी असल्याने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर त्यांची कधीच भेट होत नाही. विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही ते भेटत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रश्न बाजूलाच राहत आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही कोणतेच प्रश्न मार्गी लागत नाहीत, असा विद्यार्थ्यांचा अनुभव आहे. विद्यापीठात एखादा प्रश्न घेऊन गेल्यास आम्हाला हे काम करायला अधिकार नाहीत, अशी उत्तरे दिली जातात.



कोरोनामुळे टीवायबीएस्सीच्या परीक्षा गेल्या महिन्यात झाल्या. आता निकाल चार ते पाच दिवसांत लागणार आहे. प्रोव्हिजनल ॲडमिशन मिळू शकते. मात्र यामुळे शैक्षणिक वर्ष चार ते पाच महिने लांबणीवर पडले आहे.

**- हर्षदा फुगे, विद्यार्थिनी, टीवायबीएस्सी**

परीक्षांना नेहमीपेक्षा उशीर झाला. अभ्यास लवकर संपायला हवा होता. यात विद्यापीठाने ऑफलाइन परीक्षा घेतली हे योग्यच केले. काही अभ्यासक्रम शिकवायचा राहिला होता. वेळ लागल्याने आम्हाला इतर ठिकाणी ॲडमिशनसाठी वेळ लागेल.

**- वैभव खांडेकर, विद्यार्थी, बी. ए.**

Hello Pune
Page No. 1 Sep 19, 2022
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

# अकरावी प्रवेशासाठी शेवटची संधी

## तिसरी फेरी १९, 20 सप्टेंबरपासून

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे, पिंपरी-चिंचवडसह मुंबई महानगर क्षेत्र, नाशिक, अमरावती आणि नागपूर महापालिका क्षेत्रातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत आता विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याची शेवटची संधी मिळणार आहे. माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडून तिसरी आणि अंतिम विशेष फेरी राबवली जाणार असुन, त्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या फेरीअंतर्गत विद्यार्थ्यांना १९ आणि २० सप्टेंबर दरम्यान अर्ज भरण्यासह अर्जात दुरुस्ती, पसंतीक्रम नोंदवणे, अर्जाचा भाग दोन भरणे आदी प्रक्रिया करता येईल. तिसऱ्या विशेष फेरीची निवड यादी २३ सप्टेंबरला जाहीर होणार आहे.

माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या; तर दोन विशेष फेऱ्या अशा एकूण पाच फेऱ्या राबविण्यात आल्या. तरीही काही विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला नसल्याने आता तिसरी आणि शेवटची विशेष फेरी राबवली जाणार आहे. या फेरीचे वेळापत्रक रविवारी जाहीर करण्यात आले. या वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांना १९ आणि २० सप्टेंबरला अर्ज भरण्यासह अर्जात दुरुस्ती, पसंतिक्रम नोंदवणे, अर्जाचा भाग दोन भरणे आदी प्रक्रिया करता येईल; तसेच गरज असल्यास प्रवेश रद्द करून पुन्हा प्रवेश अर्जाचा भाग दोन, पसंतिक्रम भरून या फेरीत सहभागी होता येईल. २१ सप्टेंबरला भरलेला अर्ज प्रमाणित करून घ्यावा लागेल. तिसऱ्या फेरीची निवड यादी २३ सप्टेंबरला जाहीर होईल. २३ आणि २४ सप्टेंबर या कालावधीत प्रवेश निश्चित करणे, प्रवेश रद्द करणे आदी प्रक्रिया पार पडणार आहेत.

विशेष फेरीमध्ये दहावी उत्तीर्ण सर्व विद्यार्थी, एटीकेटी सवलतप्राप्त विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. यापूर्वी अर्ज भरलेले आणि प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही सहभागी होता येईल. विशेष फेरीत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्याने नव्याने संमती देणे आवश्यक असल्याने सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जाचा भाग दोन 'अनलॉक' करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पसंतिक्रम पुन्हा भरून अर्ज लॉक करणे गरजेचे आहे. एटीकेटी सवलतप्राप्त विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेशाठी अर्ज भरताना सहाशेपैकी मिळालेले गुण भरावेत. तिसरी विशेष फेरी ही शेवटची फेरी असेल. यानंतर कोणतीही फेरी होणार नसल्याचे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### 'वर्ग तातडीने सुरू करा'

अकरावी प्रवेश प्रक्रियेतील विशेष फेरीत ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. त्यांचे वर्ग तातडीने सुरू करा, अशा सूचना माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी दिल्या आहेत. या विद्यार्थ्यांना लवकरात लवकर कॉलेजमध्ये सामावून घेऊन त्यांचे नियमित वर्ग सुरू करावेत, असे पालकर यांनी स्पष्ट केले आहे.

### पुणे, पिंपरी-चिंचवडमधील प्रवेशांची सद्यस्थिती

| | |
|---|---|
| एकूण महाविद्यालये<br>३१६ | प्रवेशासाठी उपलब्ध जागा<br>एक लाख ११ हजार २३० |
| आतापर्यंत झालेले प्रवेश<br>७१ हजार १५४ | रिक्त जागा<br>४० हजार ७६ |




### मिशन ॲडमिशन

Maharashtra times 19.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

सकाळ

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : परीक्षा व निकाल लांबल्यामुळे मोठा फटव

# शैक्षणिक सत्रांमध्ये सहा महिन्यांचा खंड

पुणे, ता. १८ : लांबलेल्या परीक्षा आणि निकालांच्या दीर्घ प्रक्रियेमुळे यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्रांत तब्बल सहा महिन्यांचा खंड पडण्याची शक्यता आहे. मे २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात मागील सत्राची शिकवणी पूर्ण झाली. त्यानंतर आता चार महिने उलटले तरी शेवटच्या वर्षाच्या परीक्षाच सुरू आहेत.

कला आणि वाणिज्य विद्याशाखांतील काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा अद्यापही प्रलंबीत आहेत. त्यामुळे या पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांचे निकाल लांबण्याची शक्यता आहे. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात हे निकाल घोषित होण्याची शक्यता असून, पदव्युत्तरच्या प्रवेश प्रक्रिया पूर्ण व्हायला नोव्हेंबर उजाडण्याची शक्यता आहे. पर्यायाने दोन शैक्षणिक वर्षात तब्बल सहा महिन्यांचा खंड पडणार आहे.

सर परशुराम महाविद्यालयाचे प्रा. डॉ. शिवाजी भोसले सांगतात, ''परीक्षा ऑनलाइन घ्यायची की ऑफलाइन, या गोंधळात अनेक दिवस गेले. निर्णयात उशीर झाल्यामुळे परीक्षा प्रचंड लांबल्या आहे. अजूनही काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा बाकी आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी विद्यापीठाने जलदगतीने प्रक्रिया राबवावी. आमच्यासारख्या स्वायत्त महाविद्यालयांनी तात्पुरते प्रवेश आणि शिकवण्यांसारख्या उपाययोजना केल्या आहेत.''

**तात्पुरते प्रवेश**

विद्यापीठाप्रमाणेच बहुतेक स्वायत्त महाविद्यालयांनी विज्ञान शाखेसाठी प्रवेश परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना तात्पुरते प्रवेश दिले आहेत. असे जरी असले तरी विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागेल. पदवीच्या द्वितीय व तृतीय वर्गांना शिकवण्यास सुरूवात केली आहे. महाविद्यालय स्तरावर अधिक तातडीच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.



### नक्की काय झाले?

- कोरोनानंतरही निर्णयातील गोंधळामुळे परीक्षा लांबल्या
- सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत उन्हाळी सत्राच्या परीक्षा
- ऑफलाइन पेपर तपासणीला वेळ लागतो
- परीक्षांचे निकाल आणि प्रत्यक्ष प्रवेशासाठी अजून दोन महिने जाण्याची शक्यता

### काय परिणाम होणार?

१. पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा पहिल्या सत्राचा कालावधी कमी होईल
२. कमी वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे आव्हान
३. प्रात्यक्षिके, विविध उपक्रम, कार्यक्रमांना फटका बसणार
४. अजूनही नवीन शैक्षणिक वर्षाच्या मुहूर्ताबद्दल शंका
५. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार

### आकडे बोलतात

७०५ विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये

६.५ लाख अंदाजे विद्यार्थी संख्या

### याला जबाबदार कोण?

यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्रांत सहा महिन्यांचा खंड पडण्याची शक्यता आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. याला जबाबदार कोण याबाबत तुमच्या प्रतिक्रिया नावासह editor.pune@esakal.com मेलवर किंवा ८४८४९७३६०२ या व्हॉट्सॲप क्रमांकावर कळवा

"परीक्षांना जरी उशीर झाला असला तरी, लवकर निकाल जा केले जातील, यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. कुलगुरू कुलगुरू आणि सर्व अधिष्ठाता परीक्षा विभागाच्या साहाय्या निकालावर लक्ष ठेवून आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण नाही, याची काळजी आम्ही घेत आहोत.

- डॉ. मनोहर चासकर,
अधिष्ठाता, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

"पदवीच्या शेवटच्या वर्षाचे निकाल न लागल्यामुळे पदव्युत्त प्रवेश लांबले आहेत. सर्वांनी ही परिस्थिती समजून घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी प्रयत्न करावे

- डॉ. संजय चाकणे, प्राचार्य, टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, खडकी

Pune, Pune-Today
19/09/2022 Page No. 1

# News Paper Clippings During September 2022

## Section: Education

सकाळ

### वेळापत्रक जाहीर : 'एफसीएफएस' फेरी होणार नसल्याचे स्पष्टीकरण

# अकरावी प्रवेशासाठी शेवटची संधी

**पुणे, ता. १८ :** इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील तिसऱ्या विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या फेरीअंतर्गत विद्यार्थ्यांना सोमवार (ता. १९) आणि मंगळवारी (ता. २०) अर्ज करता येईल. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची निवड यादी शुक्रवारी (ता. २३) जाहीर होणार आहे. दरम्यान, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशाची ही शेवटची फेरी असणार आहे. यंदा 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' (एफसीएफएस) ही फेरी होणार नाही, असे राज्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी स्पष्ट केले.

तिसऱ्या अंतिम विशेष फेरीत यापूर्वी प्रतिबंधित झालेले तसेच सर्व उत्तीर्ण व एटीकेटी लागू असलेले विद्यार्थी सहभागी होऊ शकणार आहेत. विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भाग एक संपादित करणे, अर्ज लॉक करून प्रमाणित करणे, नवीन नोंदणी करून अर्ज भाग एक आणि पसंतीक्रम नोंदविणे यासाठी १९ आणि २० सप्टेंबर अशी दोन दिवसांची मुदत दिली आहे. या कालावधीत प्रवेशित विद्यार्थी (गरज असल्यास) आपला प्रवेश रद्द करून लगेच पसंती अर्ज भाग दोन भरू शकतील आणि या फेरीमध्ये सहभागी होऊ शकणार आहेत. त्यानंतर पसंतीक्रम ठरवून अर्ज लॉक करण्यासाठी बुधवारपर्यंत (ता. २१) मुदत दिली आहे.

या फेरीत प्रवेशासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी २३ सप्टेंबरला जाहीर करण्यात येणार आहे. यादीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना २४ सप्टेंबरपर्यंत प्रवेश घेता येईल. तसेच, प्रवेश प्रक्रियेतील पहिली विशेष फेरी झाल्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीचे वर्ग सुरू करण्याच्या सूचनाही माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने दिल्या आहेत.

## 'पीएचडी'साठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेची घोषणा करण्यात आली आहे. सहा नोव्हेंबरला ऑनलाइन पद्धतीने पीएच.डी. प्रवेश परीक्षा अर्थात पेट पार पडणार असून, अर्जासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत आहे.विद्यापीठासह संलग्न महाविद्यालयीन संशोधन केंद्रांमध्ये पीएच.डी. प्रवेशासाठी ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. पदव्युत्तर पदवीच्या शेवटच्या वर्षाला असलेले किंवा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या परीक्षेसाठी अर्ज करू शकतात. एम.फील, नेट, सेट आणि गेट परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही प्रवेश परीक्षा देण्याची गरज नाही. ते थेट प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र ठरतात. १०० गुणांच्या परीक्षेसाठी दोन तासांचा अवधी आहे.

### महत्त्वाच्या तारखा

- पेट परीक्षा : ६ नोव्हेंबर
- ऑनलाइन अर्जाची मुदत : ३० सप्टेंबर
- निकालाची संभाव्य तारीख : १० नोव्हेंबर

### आकडे बोलतात

- एकूण विषय : ६९
- पीएच.डी.च्या रिक्त जागा : ३१८७

### निवड विषयांची रिक्त पदे

- वातावरण आणि अवकाशशास्त्र : १९३
- वनस्पतिशास्त्र : १५९
- रसायनशास्त्र : २०५
- इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन : २१६
- भूगोल : १५२
- इंग्रजी : १२३
- मार्केटिंग व्यवस्थापन : १००

अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : https://bcud.unipune.ac.in/phd_entrance/applicant/login.aspx

Pune, Main
19/09/2022 Page No. 2

सकाळ

# 'नव्या शैक्षणिक धोरणाने एकांगी शिक्षणाचे तोटे कमी'

**पुणे, ता. १८ :** आजवर एकशाखीय अभ्यासक्रमामुळे अनेक तोटे अनुभवाला आले आहेत. बहुशाखीय अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांपुढे पर्याय उपलब्ध असतील, त्यामुळे त्यांच्या कलाने त्यांना क्षेत्र निवड करता येईल, असा विश्वास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनावणे यांनी व्यक्त केला.

डॉ. भालबा विभुते लिखित आणि मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चिकित्सा' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. याप्रसंगी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. एन. जे. पवार तसेच डॉ. संजय ढोले, अखिल मेहता आदी उपस्थित होते.

'नव्या शैक्षणिक धोरणाची चिकित्सा आवश्यक आहे. नव्या धोरणात पंचसूत्री आहे, ज्यात परवडण्यासारखे शिक्षण आणि जबाबदारी हे नवे मुद्दे आहेत. पण त्याची अंमलबजावणी कशी होणार, याबाबत साशंकता आहे. नव्या धोरणात अभ्यासक्रम मध्यात सोडण्याची तरतूद आहे. ती विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी धोकादायक आहे. त्यामुळे अशा तरतुदींवर चर्चा झाली तर धोरणाची अंमलबजावणी सहज होईल'', असे डॉ. एन. जे. पवार यांनी सांगितले. 'राष्ट्रीय शिक्षण धोरणासाठी दोन लाख सूचना आल्या होत्या. त्यातील किती सूचना स्वीकारल्या गेल्या आहेत, याबाबत स्पष्टता नाही. सध्या शिक्षकांच्या ६० टक्के जागा भरलेल्या नाहीत, अशा परिस्थितीत नवीन धोरणात किमान विद्यार्थी संख्येची मर्यादा घातल्याने पट गळतीचा धोका आहे', असे मत भालबा विभुते यांनी व्यक्त केले.

Pune, Main
19/09/2022 Page No. 4

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# 'नॅक' मूल्यांकन गुणवत्तेनुसार

**अध्यक्ष भूषण पटवर्धन यांची माहिती**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

**"'नॅक'ची मूल्यांकन पद्धती गुणवत्तेच्या आधारावर व्हायला हवी. कोणाकडे उपकरणांची किती संख्या आहे, यावर नाही. यानुसार मूल्यांकन पद्धतीत बदल केले जात असून त्यासाठी देशभरातून सूचना मागवल्या जात आहेत. येत्या काळात नॅक समितीकडून चुकीच्या पद्धतीने पैसे घेऊन मूल्यांकन केल्याचे प्रकार समोर आले, तर त्यावर गंभीर कारवाई केली जाईल.**

**- डॉ. भूषण पटवर्धन,** अध्यक्ष, नॅक

**शिक्षण हे मूल्यांवर आधारित असायला हवे हे आपल्या गुरूशिष्य परंपरेत सांगितले आहे. नव्या शैक्षणिक धोरणात मूलभूत शिक्षणावर भाष्य केले आहे, त्याचा अभ्यास करून शिक्षकांनी आपल्या पातळीवर त्याच्या अंमलबजावणीला सुरुवात करावी.**

**- डॉ. कारभारी काळे,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

देशातील विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये यांचे मूल्यांकन करणाऱ्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेच्या मूल्यमापन प्रक्रियेत (नॅक) आमूलाग्र बदल होणार आहेत. येत्या काळात हे मूल्यांकन संख्येच्या नाही, तर गुणवत्तेच्या आधारे केले जाईल, असे 'नॅक'द्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे आता कोणत्या महाविद्यालयात किती कम्प्युटर, स्रोत, प्रयोगशाळा आहेत, याहीपेक्षा कोणत्या कॉलेजमध्ये गुणवत्तापूर्ण ज्ञान दिले जाते, यावर भर दिला जाणार आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (नॅक) कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली 'राष्ट्रीय मुल्यांकन व मान्यता परिषद - संकल्पना, पद्धती' या विषयावर एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत 'नॅक'ची मूल्यांकन पद्धती बदलली जाणार असल्याची घोषणा डॉ. पटवर्धन यांनी केली. या वेळी 'आयसर'चे माजी प्राध्यापक डॉ. के. पी. मोहनन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी, कर्वे इन्स्टिट्यूटचे मधुकर पाठक, धनंजय कुलकर्णी उपस्थित होते.

'तुमच्या ग्रंथालयात किती पुस्तके आहेत, तुमच्याकडे किती ठिकाणी वायफाय सुविधा आहे, असे प्रश्न आता मूल्यांकन प्रक्रियेत असणार नाहीत. या बदलात सर्वांना सामावून घेतले जाणार आहे. आतापर्यंत नॅकच्या मूल्यांकनाच्या मसुद्यात ४७ वेळा बदल करून हा मसुदा नव्या सूचनांसाठी 'नॅक'च्या वेबसाइटवर प्रसिद्ध केला आहे. शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने हे बदल होत असून यामध्ये शिक्षणाच्या मूळ उद्देशाच्या अनुषंगाने मूल्यांकन करण्याचा प्रयत्न आहे,' असे डॉ. पटवर्धन यांनी नमूद केले. 'वन नेशन वन डेटा'बद्दलही त्यांनी माहिती दिली.

Maharashtra Times 20.9.2022

## News Paper Clippings During September 2022

### Section: Education

# NAAC accreditation to be a 'participatory process'

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** While carrying out the accreditation process for colleges, our entire focus is on numbers, quantity and input; for example, how many library books does the college have? This system needs to be changed and we have already started taking important steps in this direction as the purpose is to evaluate the quality of education.

Next year, the National Assessment and Accreditation Council (NAAC) is completing 30 years so we thought this is the best time to start a new process. Accordingly, we are now introducing the 'participatory process' in the accreditation process of NAAC," said professor Bhushan Patwardhan, chairman, executive committee, NAAC, Bengaluru.

"We are now proposing a binary accreditation system as per the New Education Policy (NEP) where we consider whether an educational institution wants to be accredited or not. It will be completely the choice of the institution whether to go in for grading of any programme or not. Today, there is a lot of competition amongst colleges and educational institutions so within the same university or institution, some programmes or departments will have one NAAC grade while some may not have it. This kind of diversity will be there and students will be empowered to select based on the actual assessment carried out," Patwardhan said.

He was speaking at a programme on 'NAAC evaluation – concepts and methodology' jointly organised by the internal quality assurance cell of Savitribai Phule Pune University (SPPU) and Karve Institute of Social Service. Along with Patwardhan, Dr K P Mohanan from IISER, Pune was the chief guest at the programme. While SPPU vice-chancellor professor Karbhari Kale; pro vice-chancellor professor Sanjeev Sonawane and other dignitaries were also present along with representatives of several colleges affiliated to SPPU.



**Bhushan Patwardhan, chairman, executive committee, NAAC addressed principals at SPPU on Monday.** RAVINDRA JOSHI/HT

Patwardhan further said, "There were 16 manuals when I took charge as director, NAAC and so, we all need to address this issue together as all stakeholders need to work on it together. We are focusing on three major aspects while carrying out the accreditation of colleges, the first of which is 'educatedness' which is the basic quality we look for in any graduate. Across all the streams, it is needed as the basic purpose of carrying out the accreditation assessment is the wellbeing of humanity and nature. Now, students will be assessed using new tools under the new NAAC guidelines given to the assessors. These guidelines include whether the student has educatedness or not. The second part is professional skills that will be assessed as it is necessary for every student to be professional after completing the course."

"The assessments will now be carried out more strictly and we have given strict instructions to our assessors accordingly. My appeal to all the colleges is not to entertain the NAAC committee assessors in any way. Don't do that by any means else action will be taken on the spot. Guidelines for assessors are very strict now, and no envelopes or flowers should be given to assessors. Strict action will be taken against those found guilty and we have already taken action against several assessors in the last six months," Patwardhan said.

Hindustan Times 20.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कार्यगट

पुणे, ता. २० : राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन केला आहे. यात सदस्यपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सहा मंत्र्यांचा समावेश आहे. हा कार्यगट स्थापन केल्यामुळे राज्यात गेल्या दोन वर्षांपासून मागे पडलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी प्रक्रियेला गती मिळण्याची चिन्हे आहेत.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'संदर्भात नेमलेल्या कार्यबल गटाच्या अहवालातील शिफारशींनुसार राज्यात या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कार्यगट स्थापन केला आहे. राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वायतत्ता आणि उत्कृष्टता सक्षम करणे, शाळांपासून कौशल्य विकास तसेच उच्च व तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या सर्व शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी हा कार्यगट स्थापन केला आहे. राज्य स्तरावरील सर्व शिक्षण संस्था आणि विभागांना, पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण संस्थांपर्यंत यशस्वी होण्यासाठी धोरणांमधील दृष्टिकोनानुसार गुंतवणूक आणि संसाधने यांचा मेळ घालण्यासाठी, तसेच धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी या कार्यगटाची स्थापना केली आहे. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अध्यादेश काढला आहे.

या कार्यगटाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असून सदस्यपदी उपमुख्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री, शालेय शिक्षण मंत्री, पशुसंवर्धन व दुग्धविकास व्यवसाय मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि कृषी मंत्री आहेत. तर उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव समितीचे सदस्य सचिव आहेत. धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सक्षम सनियंत्रणासाठी म्हणून हा कार्यगट काम करणार आहे.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना झालेल्या समितीच्या शिफारशींनुसार विविध विषयांवर स्थापन केलेल्या समित्यांच्या कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेणे व धोरणाच्या अनुषंगाने होणाऱ्या नवनवीन बदलांबाबत चर्चा, विषय समित्यांच्या अहवालातील शिफारशींनुसार विभागामार्फत केलेल्या किंवा करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा आढावा घेणे तसेच, नवीन शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणात करावयाचे बदल याविषयी धोरणात्मक चर्चा करणे, अशी या कार्यगटाची कार्यकक्षा असणार आहे.

Pune, Main
21/09/2022 Page No. 2

Sakaal 21.9.2022

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

पुढारी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कार्यगट

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. यामध्ये सदस्यपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सहा मंत्री तसेच प्रधान सचिवांचा समावेश आहे.

**मुख्यमंत्री अध्यक्ष; उपमुख्यमंत्री व सहा मंत्र्यांचा समावेश**

हा कार्यगट राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वायतत्ता आणि उत्कृष्टता सक्षम करणे, शाळांपासून कौशल्य विकास, तसेच उच्च व तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या सर्व शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करेल. राज्यस्तरावरील सर्व शिक्षण संस्था आणि विभागांना, पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण संस्थांपर्यंत यशस्वी होण्यासाठी धोरणांमधील दृष्टिकोनानुसार गुंतवणूक आणि संसाधने यांचा मेळ घालण्यासाठी, तसेच धोरणाच्या यशस्वी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीच्या शिफारशींनुसार, समित्यांच्या कामाचा आढावा घेणे, नवनवीन बदलांबाबत चर्चा, तसेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणात करायचे बदल, याविषयी धोरणात्मक चर्चा करणे, अशी या कार्यगटाची कार्यकक्षा असणार आहे.

### कार्यगटात हे आहेत सदस्य...

कार्यगटाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असून, सदस्यपदी उपमुख्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री, कौशल्यविकास व उद्योजकतामंत्री, शालेय शिक्षणमंत्री, पशुसंवर्धन व दुग्धविकास व्यवसायमंत्री, वैद्यकीय शिक्षणमंत्री आणि कृषिमंत्री आहेत. तर, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव समितीचे सदस्य सचिव आहेत.

Pune Edition
Sep 21, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

सामना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी

### मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट स्थापन केला आहे. कार्यगटाच्या सदस्यपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सहा मंत्र्यांचा समावेश आहे. राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वायत्तता आणि उत्कृष्टता सक्षम करणे, शाळांपासून कौशल्य विकास तसेच उच्च आणि तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या सर्व शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करणाऱ्यांसाठी हा कार्यगट स्थापन केला आहे. राज्य स्तरावरील सर्व शिक्षण संस्था आणि विभागांना, पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण संस्थांपर्यंत यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील दृष्टिकोनानुसार गुंतवणूक आणि संसाधने यांचा मेळ घालण्यासाठी तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी या कार्यगटाची स्थापना करण्यात आली आहे.

Pune Edition
Sep 21, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

सामना

### नॅक मूल्यांकन आता गुणवत्तेच्या आधारावर होणार

#### - डॉ. भूषण पटवर्धन



पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - देशातील विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये यांचे मूल्यांकन करणाऱ्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेच्या मूल्यमापन प्रक्रियेत आमूलाग्र बदल होणार असून, पुढील काळात हे मूल्यांकन संख्येच्या नाही, तर गुणवत्तेच्या आधारावर होणार आहे. ही बदलाची प्रक्रिया नॅकने सुरू केली असून, सर्वांना त्यात सहभागी होण्याचे आवाहनदेखील नॅककडून करण्यात आले आहे, असे राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (नॅक) कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी सांगितले.

'राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषद - संकल्पना, पद्धती' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा अंतर्गत गुणवत्ता कक्ष आणि कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्व्हिस यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या शैक्षणिक परिसंवादात नॅकचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, प्रा. डॉ. के. पी. मोहनन, कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, डॉ. आर. एस. माळी, कर्वे इन्स्टिट्यूटचे मधुकर पाठक, संदीप खर्डेकर, धनंजय कुलकर्णी, एम. शिवकुमार, डॉ. सुप्रिया पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. पटवर्धन म्हणाले, 'तुमच्या ग्रंथालयात किती पुस्तके आहेत, तुमच्याकडे किती ठिकाणी वायफाय सुविधा आहे, असे प्रश्न आता मूल्यांकन प्रक्रियेत असणार नाहीत. या बदलात आम्ही सर्वांना सामावून घेत आहोत. आतापर्यंत ४७ वेळा मसुद्यात बदल करून आम्ही पुन्हा नव्या सूचनांसाठी संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. शैक्षणिक धोरण २०२०च्या अनुषंगाने हे बदल होत असून, यामध्ये शिक्षणाच्या मूळ उद्देशाच्या अनुषंगाने मूल्यांकन करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यावेळी 'वन नेशन, वन डेटा'बद्दलही त्यांनी भाष्य केले.'

डॉ. मोहनन म्हणाले, 'विद्यार्थ्यांना फक्त रोजगारासाठी तयार करणे हे उद्दिष्ट नसून, परिस्थितीनुसार स्वत:ला कायम तयार करू शकेल, बदलती परिस्थिती स्वीकारून स्वत:मध्ये बदल करेल, असा विद्यार्थी आम्हाला या प्रक्रियेतून अपेक्षित आहे.'

डॉ. कारभारी काळे म्हणाले, शिक्षण हे मूल्यांवर आधारित असायला हवे, हे आपल्या गुरू-शिष्य परंपरेत सांगितले आहे. नव्या शैक्षणिक धोरणात मूलभूत शिक्षणावर भाष्य केले आहे, त्याचा अभ्यास करीत शिक्षकांनी आपल्या पातळीवर त्याच्या अंमलबजावणीला सुरुवात करावी.

परिसंवादात पुण्यातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता व्यवस्था समितीचे समन्वयक, प्राध्यापक सहभागी झाले होते.

Pune Edition
Sep 21, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# News Paper Clippings During September 2022

## Section: Education

# शैक्षणिक धोरणासाठी कार्यगट

### एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीसांसह सहा मंत्री करणार काम

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासोबत या संदर्भातील कार्यबल गटाच्या शिफारशीच्या अंमलबजावणीसाठी कार्यगट स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या कार्यगटाचे अध्यक्षपद सोपवण्यात आले असून, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह एकूण सहा मंत्री या कार्यगटात असतील.

राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वायत्तता आणि उत्कृष्टता सक्षम करणे, शाळांपासून कौशल्य विकास, उच्च आणि तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या सर्व शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी हा कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. राज्यस्तरावरील सर्व शिक्षण संस्था आणि विभागांना, पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षण संस्थांपर्यंत यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०मधील दृष्टिकोनानुसार गुंतवणूक आणि संसाधने यांचा मेळ घालण्याकरिता; तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्याच्या उद्देश यामागे आहे.

कार्यगटाचे अध्यक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असून, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य विकास मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, पशुसंवर्धन व दुग्धविकास व्यवसायमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन आणि कृषीमंत्री अब्दुल सत्तार, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव समितीचे सदस्य सचिव आहेत.

### कार्यकक्षा कोणती?



डॉ. माशेलकर समितीच्या शिफारशींनुसार विविध विषयांवर स्थापन करण्यात येणाऱ्या समित्यांच्या कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेणे व धोरणाच्या अनुषंगाने होणाऱ्या नवनवीन बदलांबाबत चर्चा, विषय समित्यांच्या अहवालातील शिफारशींनुसार विभागामार्फत करण्यात आलेल्या किंवा करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा आढावा, नवीन शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणात करायचे बदल याविषयी धोरणात्मक चर्चा करणे, अशी या कार्यगटाची कार्यकक्षा असणार आहे.

Maharashtra Times 21.9.2022

# पीएच.डी. प्रवेश परीक्षा ६ नोव्हेंबर रोजी होणार

**पुणे, दि. २१ (प्रभात वृत्तसेवा)**- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची यंदाच्या शैक्षणिक वर्षाची पीएच.डी प्रवेश परीक्षा ६ नोव्हेंबर रोजी होणार असून या परीक्षेसाठी ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन विद्यापीठाकडून करण्यात आले आहे.

पीएच.डी साठी किती जागा विभागनिहाय उपलब्ध आहेत याची माहिती विद्यापीठाने जाहीर केलेल्या आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर उपलब्ध आहे. यासाठी एकूण ३ हजार १८७ जागा उपलब्ध आहेत.

या जागांसाठी सुरुवातीला उमेदवारांनी अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांची १०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. त्यांनतर मुलाखत होऊन त्यानंतर उमेदवारांची निवड केली जाईल. एम.फिल., नेट, पेट २०२१ परीक्षा उत्तीर्ण उमेवारांना ही परीक्षा न देण्याची सवलत देण्यात आली आहे. दरम्यान याविषयीची सविस्तर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

Prabhat 22.9.2022

# News Paper Clippings During September 2022

## Section: Education

# विद्यार्थ्यांसाठी नवीन शैक्षणिक संधी उपलब्ध

## 'पुणे विद्यापीठा'चे अमेरिकेतील विद्यापीठांशी करार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अमेरिकेतील नामांकित विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांसोबत पाच करार केले आहेत. या कराराच्या माध्यमातून भविष्यात विद्यार्थ्यांना अनेक नवीन शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या शिष्टमंडळाने चार ते १८ सप्टेंबर २०२२ या कालावधीत अमेरिकेला भेट दिली. या शिष्टमंडळात डॉ. कारभारी काळे, 'रुसा'चे समन्वयक; तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे विभागप्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना अनेक नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत नामांकित विद्यापीठांशी संबंध प्रस्थापित करण्याच्या सूचना उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा २.०) विद्यापीठांना देण्यात आल्या आहेत. या भेटीदरम्यान विद्यापीठाच्या शिष्टमंडळाने तेथील १३ विविध विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांना भेटी दिल्या. या वेळी अनेक शिक्षणतज्ज्ञ आणि संशोधकांशी संवादही साधण्यात आला.

### या विद्यापीठांशी झाले करार

**सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क**

- अमेरिकेच्या सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क या विद्यापीठात भारतीय केंद्राची स्थापना करण्याबाबत करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. अशा प्रकारे करार करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ देशातील पाहिले विद्यापीठ ठरले आहे.

**ब्राँनक्स कम्युनिटी कॉलेज**

- ब्राँनक्स कम्युनिटी कॉलेजसोबत 'बरो ऑफ मॅनहॅटन कम्युनिटी कॉलेज', 'सिटी युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क रिमोट सेन्सिग अर्थ सिस्टीम' या संलग्न संस्थांसोबतही करार केले आहेत.

**ड्रेक्सेल युनिव्हर्सिटी**

- ड्रेक्सेल युनिव्हर्सिटीशी झालेल्या कराराच्या माध्यमातून जैव विज्ञानशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रम अधिक सक्षम करण्यात येणार आहे; तसेच यामध्ये संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध होणार आहेत.

**कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी**

- उद्योजकता विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञानाबरोबरच अन्य तत्सम गोष्टींबाबत या विद्यापीठासोबत काम करण्यात येणार आहे. याशिवाय विद्यापीठाच्या शिष्टमंडळाने १३ विविध विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांना भेटी दिल्या असून, लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया विद्यापीठ, लोयोला मेरीमाउंट युनिव्हर्सिटी, कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी, बर्कले, कम्प्युटर हिस्टरी म्युझियम (पालो अल्टो), आयबीएम डेमो लॅबोरेटरी यांच्याशीही करार करण्यात आले आहेत.



"या कराराच्या माध्यमातून भविष्यात अनेक विद्यार्थी, प्राध्यापक आदान-प्रदान, द्विलक्ष्यी अभ्यासक्रम, कार्यशाळा, परिषद, संशोधन प्रकल्प अशा अनेक गोष्टी साध्य होऊ शकतात. अनेक परदेशी विद्यार्थ्यांना भारतीय कला, संगीत, योग आणि आयुर्वेद या गोष्टी शिकण्यात रस आहे; परंतु त्यांना चांगले शिक्षक उपलब्ध नाहीत. या कराराच्या माध्यमातून आपण परदेशी विद्यार्थ्यांसाठी असे अभ्यासक्रम सुरू करू शकणार आहोत.

- डॉ. कारभारी काळे, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times,24.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# मॅक्सम्युलर भवनतर्फे 'इनफिनाइट लायब्ररी'

## आभासी ग्रंथालय अनुभवता येणार



म. टा. प्रतिनिधी, पुणे

ग्रंथालयाच्या पारंपरिक स्वरूपाला छेद देत ज्ञानार्जनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर करीत पुण्यातील 'ग्योएथे इन्स्टिट्यूट'च्या 'मॅक्सम्युलर भवन'तर्फे 'व्हर्च्युअल रिॲलिटी' तंत्रज्ञानावर आधारित 'इनफिनाइट लायब्ररी' ही अनोखी संकल्पना सादर करण्यात आली आहे. कर्वे रस्त्यावर 'एसएनडीटी'समोरील 'द बेस' या ठिकाणी २४ ते ३० सप्टेंबर दरम्यान पुणेकरांना याचा मोफत अनुभव येणार आहे. मात्र, त्यासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असणार आहे.

गुहेच्या आकाराप्रमाणे या ग्रंथालयाची रचना आहे. या अनोख्या ग्रंथालयात क्यू आर गेम, होलोग्राम्स, थ्री डी प्रिंटेड ऑब्जेक्ट्स आणि ऑडिओ-व्हिज्युअल आदी गोष्टी पाहता येणार आहेत. यात नागरिकांना 'व्हर्च्युअल रिॲलिटी'च्या वापराद्वारे भविष्यातील ग्रंथालयाचा एक परिपूर्ण अनुभव घेता येणार आहे. या व्हर्च्युअल विश्वात 'इनफिनाइट लायब्ररी'ने काही छोट्या ग्रंथालयाची निर्मिती केली असून, यामध्ये निसर्गाशी निगडित विविध विषयांचा समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्रत्येक 'व्हर्च्युअल रूम'मध्ये दक्षिण भारतीय बाहुलीनाट्य, 'युरोपियन अल्केमी' आणि जगभरातील 'पोलिनेशन नेव्हिगेशन' यांचा समावेश आहे.

उपक्रमाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच दिनांक २४ सप्टेंबरला कर्नाटकातील प्रसिद्ध बाहुलीनाट्य कलाकार गुंडू राजू हे छाया कठपुतळी प्रदर्शनाच्या माध्यमातून 'समुद्र मंथना'वर आधारित कथा सादर करतील. माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी, निसर्ग, संस्कृती यांच्यातील संबंध उलगडून दाखविण्यासाठी 'व्हर्च्युअल रिॲलिटी' तंत्रज्ञानाचा वापर करण्याची अभिनव संकल्पना त्यांनी मांडली. निःशुल्क नावनोंदणीसाठी https://www.ticketkhidakee.com/infinitelibraries या लिंकचा वापर करावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

Maharashtra Times 24.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# पीएच.डी., एम.फिल.साठी जास्तीचे शुल्क आकारल्यास संशोधन केंद्राची मान्यता रद्द

## विद्यापीठाची संशोधन केंद्रांना तंबी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व संशोधन केंद्रांमध्ये पीएच.डी., एम.फिल. करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाकडून ठरवलेले शुल्कच आकारण्याचे स्पष्ट आदेश संशोधन केंद्र व विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांना देण्यात आले आहेत. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्काची मागणी केल्यास किंवा शुल्क आकारल्यास संबंधित संशोधन केंद्रांची मान्यता रद्द करण्याची तंबी विद्यापीठ प्रशासनाने दिली.



विद्यापीठाचे विभाग, संलग्न महाविद्यालये आणि संशोधन केंद्रांमध्ये पीएच.डी., एम.फील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रक्रियेदरम्यान विद्यापीठाने ठरवलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारले जात असल्याच्या अनेक तक्रारी विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांकडून करण्यात आल्या आहेत. या तक्रारींची दखल घेऊन विद्यापीठ प्रशासनाने घेत परिपत्रक प्रसिद्ध केले. परिपत्रकाद्वारे सर्व संशोधन केंद्रे आणि महाविद्यालयांना सूचना देत कोणत्याही परिस्थितीत पीएच.डी., एम.फिल.साठी जास्तीचे शुल्क आकारले जाऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

काही विद्यार्थी संघटनांनी दिलेल्या माहितीप्रमाणे पीएच.डी. करताना विद्यार्थ्यांकडून किती शुल्क घ्यावे, याबाबत विद्यापीठाकडून शुल्करचना करण्यात आली आहे. त्या रचनेनुसारच शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे; तरीदेखील काही संशोधन केंद्रांमध्ये ठरलेल्या शुल्कापेक्षा काही हजार रुपये अधिकचे आकारले जाणे ही बाब गंभीर असून, असे आढळल्यास संबंधित संशोधन केंद्र बंद करण्याची ताकीद विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे. तसेच ज्या संशोधन केंद्रांमध्ये जादाचे शुल्क आकारले जात असल्याचे आढळून आले आहे, अशा काही केंद्रांना विद्यापीठ प्रशासनाने पत्र पाठवून विचारणा केली आहे. या केंद्रांकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यास त्यांची मान्यता रद्द केली जाणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

लोकसत्ता
Wed, 28 September 2022
https://epaper.loksatta.com/c/70313822

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

पुढारी

# महाविद्यालयांचे शुल्क वेबसाइटवरच जाहीर करा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'कॉलेजांकडून शुल्क नियामक प्राधिकरणाकडे (एफआरए) पाठवले जाणारे शुल्क प्रस्ताव वेबसाइटवर उपलब्ध करून द्यावे,' अशी सूचना अभ्यासक आणि तज्ज्ञांकडून उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना करण्यात आली आहे.

पाटील यांनी एफआरएच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यानंतर ही मागणी पुढे आली आहे.चंद्रकांत पाटील यांनी मॉडर्न महाविद्यालयातील कार्यक्रमात 'एफआरए'कडून शुल्कनिश्चिती करण्यात आलेल्या महाविद्यालयांपैकी १० टक्के महाविद्यालयांना भेट देऊन पाहणी करणार असल्याचे जाहीर केले आहे. या महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी किती खर्च झाला, याची प्रत्यक्ष तपासणी करणार असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.

**अभ्यासक आणि तज्ज्ञांकडून उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना सूचना**

याबाबत अभ्यासक विवेक वेलणकर म्हणाले, 'महाविद्यालयांच्या शुल्काबाबत २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात माहिती आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार तत्कालीन माहिती आयुक्त रत्नाकर गायकवाड यांनी महाविद्यालयांचे शुल्क सर्वसामान्यांच्या माहितीसाठी एफआरएकडे आलेले शुल्क प्रस्ताव महाविद्यालयांच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाने (डीटीई) परिपत्रक प्रसिद्ध करून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना आदेश दिले होते. मात्र, अंमलबजावणी ठप्प आहे. या आदेशाची अंमलबजावणी केल्यास शुल्काबाबतची सर्व माहिती विद्यार्थी-पालकांना होईल.

My Pune Edition
Sep 28, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

पुढारी

# विद्यापीठाला एनसीसी तुकडीची मान्यता

## पहिल्यांदाच १०० विद्यार्थ्यांना विद्यापीठात घेता येणार एनसीसीचे प्रशिक्षण

**गणेश खळदकर**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पदवीच्या विद्यार्थ्यांना तीन वर्षांचे शिक्षण घेत असतानाच राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसीचा तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. यासाठी विद्यापीठाला मान्यता मिळाली असून, १०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. देशाच्या संरक्षणासाठी एनसीसीच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी असतात. त्यामुळे एनसीसी तुकडीची मान्यता विद्यार्थ्यांच्या दृष्टीने फायदेशीर ठरणार आहे.

विद्यापीठाला स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावर संबंधित तुकडीला मान्यता देण्यात आलेली आहे. पुढील तीन वर्षे प्रत्येकी ३५ विद्यार्थ्यांना एनसीसीला प्रवेश घेता येणार आहे. यामध्ये ३३ टक्के मुलींना देखील प्रवेशाची संधी मिळणार आहे. महाराष्ट्र एनसीसीचे संचालनालयांतर्गत सहा गट आहेत. त्यातील पुण्यात एक मुख्यालय



POSITIVE स्टोरी

आहे. या मुख्यालयातील एका युनिटअंतर्गत विद्यापीठातील तुकडीला मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी विद्यापीठाला कोणताही निधी मिळणार नसून एनसीसी तुकडीचा सर्व खर्च विद्यापीठालाच करावा लागणार आहे. विद्यापीठात जवळपास ६०० विद्यार्थी पदवीच्या विविध अभ्यासक्रमांना दरवर्षी प्रवेश घेतात. संबंधित विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी असोसिएट एनसीसी ऑफिसरची नियुक्ती करण्यात येणार आहे. प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांना बी आणि सी सर्टिफिकेट मिळतील. त्याचबरोबर नॅशनल कॅम्पसाठीसुध्दा निवड होणार आहे.

### *विद्यार्थ्यांना १२ विविध विषयांचे मिळणार प्रशिक्षण...*

*एनसीसीमध्ये एनसीसी म्हणजे काय, शस्त्र प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, आपत्ती व्यवस्थापन, जीवनावश्यक कौशल्ये, वेळेचे व्यवस्थापन, नेतृत्वगुण विकास, सामाजिक जागरूकता आणि सामुदायिक विकास, पर्यावरणीय जागरूकता, साहसी कृत्ये आदी १२ विषयांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना तीन वर्षांत देण्यात येणार आहे.*

> *एनसीसीचे प्रशिक्षण आर्मी, नेव्ही, एअरफोर्समध्ये जाण्यासाठी उपयोगी पडतेच. शिवाय, दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रात एनसीसी प्रशिक्षण पूर्ण केलेला विद्यार्थी चमकतोच; कारण एनसीसी प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झालेला असतो. त्यांना स्वयंशिस्त असल्यामुळे जीवनात त्याचे फायदे होतात.*
>
> *- **डॉ. सी.एम. चितळे,** चेअर प्रोफेसर, शंतनुराव किर्लोस्कर चेअर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ*

> *राष्ट्रीय कर्तव्याचा भाग म्हणून विद्यापीठात पहिल्यांदाच अशा प्रकारचे युनिट सुरू होणार आहे. यातून पदवीस्तरावरील विद्यार्थ्यांना एनसीसीचे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे.*
>
> *- **डॉ. प्रफुल्ल पवार,** कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ*

Pune Edition
Sep 28, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During September 2022

### Section: Education

# Edu min to probe fees discrepancies, teachers insist on punitive action

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Higher and technical education minister Chandrakant Patil's decision to visit private colleges to understand the discrepancies in the expenditure information sent by authorities and the fees approved by the Fee Regulation Authority (FRA) has prompted college teachers to say that the exercise must translate into punitive action against errant managements.

At a private function in Pune on Monday, Patil said, "Private colleges justify high fees saying that they need to pay high salaries to teachers. There are some medical colleges where the yearly fees for each student is over Rs 20 lakh. Does that mean they pay Rs 10 lakh as salary to a teacher per month?"

He said fees are approved by dividing the total expenditure by the number of students. "If you are demanding such high fees, does that mean you have high fees or is an inflated figure shown to the FRA or is money changing hands at FRA to get more fees approved? I will visit 10% colleges where the fees for this year was approved by FRA to check what is the expenditure of such colleges and if the fees taken is justified, Patil said.

Sachin Shinde, a college teacher and rights activist, said, "This has been a practice among private managements. On paper, they show that they are paying Rs 90,000 per month to a teacher, but they pay only Rs 45,000. Or they credit the entire amount and then take Rs 45,000 in cash. During Covid-19, many teachers were laid off and many others did not get a single paise as salary for several months. But colleges have not reduced their fees. They are submitting documents of fake teachers to get the fees approved from the FRA. The minister must take action against errant managements."

## Will state pay salaries for private college staffers?

Education minister **Chandrakant Patil** said the state government may see if it is feasible to pay salaries of teachers in private unaided colleges too. "We spend Rs 12,000 crore on teachers' salaries and this move will increase it by another Rs 1,000 crore. But private managements must reduce the fees if the government decides," he said.



Ramdas Zol, founder president of the association of managements of unaided institutes in rural areas, said most government colleges and state-run universities are struggling to survive and have contract teachers. The government has no money to recruit new teachers. It is not possible for the state to pay salaries for teachers in private colleges. If it does, then we are ready to reduce the fees by 50%," he said. TNN

The Times of India 28.9.2022

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Education*

# आता 'आयुका २.0'

## नव्या संशोधनासाठी विद्यापीठात दोन वर्षांत अत्याधुनिक इमारत

मटा विशेष

Harsh.Dudhe
@timesgroup.com
Tweet : @Harshdudhe_MT

**पुणे** : देशात संशोधनात अग्रेसर असणाऱ्या आंतरविद्यापीठीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी केंद्रामध्ये (आयुका) कामकाजाचा भार वाढत असून, संशोधनाच्या दृष्टीने जागेची कमतरता भासत आहे. यावर उपाय म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयुकाच्या इमारतीजवळच 'ॲकॅडेमिक अँड रिसर्च बिल्डिंग-आयुका २'ची निर्मिती करण्यात येणार आहे. नव्या 'आयुका'मध्ये 'लायगो'; तसेच ॲस्ट्रोसॅटवर संशोधनासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा, पीएचडी विद्यार्थ्यांसाठी क्लासरुम, अभ्यागतांसाठी जागा, सभागृह, कॉन्फरन्स रूम अशा सर्वसुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'आयुका २'च्या निर्मितीला मान्यता दिली असून, सार्वजनिक बांधकाम विभागानेही इमारतीचे बांधकाम करण्याची परवानगी दिली आहे. त्यानुसार 'आयुका' प्रशासनाने नव्या इमारतीच्या बांधकामासाठी तयारी सुरू केली आहे. पुणे विद्यापीठातील 'आयुका'च्या चंद्रशेखर ऑडिटोरियमच्या शेजारी उपलब्ध जागेत 'आयुका २'ची निर्मिती होणार आहे. यासाठी सुमारे २० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, येत्या दोन वर्षांत हे बांधकाम पूर्ण होणार आहे. प्रसिद्ध आर्किटेक्ट चार्ल्स कोरिया यांनी सध्याच्या इमारतीचा आराखडा तयार केला आहे. त्यामुळे नव्या 'आयुका २'चा आकर्षक आराखडाही त्यांच्याकडूनच तयार करण्यात आला आहे.

'आयुका २'चे बांधकाम ७० हजार चौरस फुटांचे राहणार आहे. या नव्या आयुकामध्ये शास्त्रज्ञांसाठी विशेष कक्षांची निर्मिती आणि रूम तयार करण्यात येणार आहे. त्यासोबतच पीएचडीच्या विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाच्या सोयीसुविधांसह क्लासरूम राहणार आहेत. आयुकांतर्गत काही इन हाउस उपक्रम किंवा संशोधनाच्या बाबतील चर्चासत्राचे आयोजन करायचे झाल्यास, २०० व्यक्तींच्या क्षमतेचे सभागृहाची निर्मिती करण्यात येणार आहे. संचालकांसाठी प्रशस्त केबिन आणि कॉन्फरन्स रूम राहणार आहे. या नव्या इमारतीत अत्याधुनिक स्वरूपाचे ग्रंथालय उभारण्यात येणार आहे. 'आयुका'ला भेट देणाऱ्या संशोधक, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापकांना विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली जाणार आहे.



> **"आयुकावर संशोधनाचा भार वाढत असून, नवे संशोधकही येत आहेत. या सर्वांसाठी सध्याच्या आयुकातील सुविधा कमी पडत आहेत. 'आयुका २'च्या निर्मितीमुळे पुढील २५ ते ३० वर्षे संशोधनाला लागणाऱ्या सोयी-सुविधांची पूर्तता होणार आहे. साधारणतः २४ महिन्यांत या नव्या अत्याधुनिक इमारतीचे काम पूर्ण करण्याचा मानस आहे.**
>
> – नितीन ओहोळ, इस्टेट मॅनेजर, आयुका

### लायगो, ॲस्ट्रोसॅटसाठी प्रयोगशाळा

'आयुका'मार्फत लायगो प्रकल्पावर महत्त्वपूर्ण संशोधन सुरू आहे. त्यामुळे त्याच्यासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा उभी राहणार आहे. संशोधनात कोणताही व्यत्यय (झिरो व्हायब्रेशन) येऊ नये, यासाठी लॅब अंडरग्राउंड राहणार आहे. त्यासोबतच ऑप्टिक लॅब; तसेच क्लीन रूम राहणार आहे. ॲस्ट्रोसॅट उपग्रहाचा डेटा 'आयुका'त येतो. या डेटाचा अभ्यास करुन, त्यावर संशोधन करण्यासाठी सर्व नव्या सोयी-सुविधांनीयुक्त अत्याधुनिक लॅबची निर्मिती करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

Maharashtra Times 29.9.2022

# बारावी परीक्षेचे अर्ज भरण्यास उद्यापासून प्रारंभ

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये बारावीची परीक्षा होणार आहे. ही परीक्षा देणाऱ्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत १ ते २१ ऑक्टोबर या कालावधीत भरायचे आहेत. सरल संकेतस्थळावरील विद्यार्थ्यांच्या माहितीच्या आधारे ते भरले जाणार आहेत. राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

बारावीच्या नियमित विद्यार्थ्यांसह व्यवसाय अभ्यासक्रमाचे विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेतील विद्यार्थी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थी आदींचे अर्ज कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत २२ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत भरता येतील. प्रवेश अर्ज आणि शुल्काची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयांना त्यांच्या 'लॉगइन'मध्ये प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले जाईल. प्रवेशपत्राची प्रत घेऊन त्यावरील माहितीची पडताळणी करणे आवश्यक आहे. माहिती अचूक असल्याची खात्री केल्यानंतर त्यावर विद्यार्थ्याची स्वाक्षरी घेऊन ते विद्यार्थ्याला द्यायचे आहे. कनिष्ठ महाविद्यालयांनी अर्जाचे शुल्क भरल्यानंतर, पावती आणि विद्यार्थ्यांच्या याद्या राज्य मंडळाच्या संबंधित विभागीय मंडळात जमा करायच्या आहेत. त्यासाठीची तारीख स्वतंत्रपणे कळवण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अधिक माहिती राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

लोकसत्ता Fri, https

## News Paper Clippings During September 2022

### Section: Education

# कुणी विद्यार्थी देता का विद्यार्थी?

## विद्यापीठातील काही अभ्यासक्रमांना एक आकडी प्रवेश

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील आणि देशातील आघाडीच्या विद्यापीठांपैकी एक असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अनेक विभागांमध्ये प्रवेश घटले आहेत. काही अभ्यासक्रमांसाठी तीस, साठ अशी प्रवेश क्षमता असताना केवळ एक आकडीच प्रवेश झाल्याचे समोर आले आहे. करोनाच्या प्रादुर्भावानंतर यंदा विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेत अर्जसंख्या घटल्याचे निदर्शनास आले होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जवळपास साडेपाच हजार अर्ज कमी झाले. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने राबवलेल्या प्रवेश प्रक्रियेत काही अभ्यासक्रमांना अक्षरशः एक आकडी प्रवेश झाल्याचे दिसून येत आहे. गेल्या वर्षी विद्यापीठाने कमी प्रवेश होणाऱ्या अभ्यासक्रमांचा आढावा घेऊन प्रतिसाद नसलेले अभ्यासक्रम बंद करण्याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले होते. विद्यापीठातील काही अभ्यासक्रमांना शासनाकडून निधी मिळत नसल्याने त्यांना विद्यापीठ निधीतून निधी दिला जातो. विद्यापीठ निधीतून चालवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांना अत्यल्प प्रतिसाद असल्यास प्राध्यापकांचे वेतन, पायाभूत सुविधांवरील खर्च कायम राहत असल्याने त्याचा आर्थिक फटका विद्यापीठालाच सहन करावा लागतो. त्यामुळे आता यंदाच्या प्रवेश प्रक्रियेनंतर अत्यल्प प्रतिसाद मिळालेले अभ्यासक्रम बंद केले जाणार का, असा प्रश्न निर्माण होत आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे म्हणाले, की प्रवेश कमी झाले म्हणून अभ्यासक्रम बंद करणे हा पर्याय योग्य नाही. प्रवेश कमी का होतात याची कारणे शोधून उपाययोजना करणे गरजेचे असून ते विद्यापीठाकडून केले जाईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदींनुसार अनेक अभ्यासक्रमांची पुनर्रचना केली जाणार आहे. त्यात हे अभ्यासक्रम श्रेयांकांद्वारे विद्यार्थ्यांना उपलब्ध करता येऊ शकतील, काही अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीनेही शिकता येऊ शकतील.

### क्रमवारीवर परिणाम

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमध्ये अभ्यासक्रमांचे वैविध्य आहे. प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवीचे विविध अभ्यासक्रम राबवले जातात. मात्र या अभ्यासक्रमांना क्षमतेइतके प्रवेश होत नसल्यास त्याचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रमवारीवरही परिणाम होतो. गेल्या काही वर्षांत विद्यापीठाचे क्रमवारीतील स्थान घसरत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अभ्यासक्रमांचे प्रवेश वाढवण्याकडे विद्यापीठाने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

**विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम निवडीचा कल बदलत असतो. त्यामुळे काही अभ्यासक्रमांना पुरेसे प्रवेश न होणे शक्य आहे. प्रवेश झाले नाही म्हणून अभ्यासक्रम बंद करणे सोपे आहे, पण अभ्यासक्रम सुरू करण्याची मान्यता मिळवणे कठीण आहे. - डॉ. पंडित विद्यासागर,** माजी कुलगुरू

### अभ्यासक्रम आणि विद्यार्थी

● मॅन्युस्क्रिप्टॉलॉजी (३), पदव्युत्तर पदवी संगीत (७), नृत्य (७), नाट्यशास्त्र (४), शहरी पाणी व्यवस्थापन एकात्मिक पदव्युत्तर पदविका (५) पदव्युत्तर पदवी भूतंत्रज्ञान (२), उर्दू भाषा पदविका (१), नवसंकल्पना पदव्युत्तर पदविका (१), अमराठी विद्यार्थ्यांसाठी मराठी (२), संहिता लेखन (६), पाली प्रगत पदविका (७), बुद्धिस्ट स्टडीज पदव्युत्तर पदवी (९), पदव्युत्तर पदविका आंबेडकर आणि बुद्धिझम (८) प्राकृत पदव्युत्तर पदवी (३) इत्यादी

● विज्ञान आणि तंत्रज्ञान सायंटिफिक कम्प्युटिंग पदव्युत्तर पदवी (२७), प्रॉडक्शन ग्राफिक डिझाइन (२०), व्यावसायिक थ्रीडी ॲनिमेशन आणि व्हीएफएक्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम (१६), व्यावसायिक व्हिज्युअल इफेक्ट्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम (२), एम.टेक. पीएच.डी. स्थापत्य आणि पर्यावरण (६), एम.टेक. पीएचडी. संगणक आणि माहिती तंत्रज्ञान (१७)

लोकसत्ता Fri, 30 September 2022
https://epaper.loksatta.com/c/70338173

# अकरावीचे ३५०० विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत

## संधी मिळूनही विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष प्रवेशाकडे पाठ

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत अद्याप तीन ते साडेतीन हजार विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. दैनंदिन गुणवत्ता फेरीमध्ये महाविद्यालयात निवड होऊनही विद्यार्थी प्रत्यक्ष प्रवेशासाठी जात नसल्याने जागा अडवल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

केंद्रीय अकरावी ऑनलाइन प्रवेश समितीमार्फत प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत ९६ हजार १५० जागा उपलब्ध आहेत. आतापर्यंत झालेल्या तीन नियमित फेऱ्या, तीन विशेष फेऱ्यांतून ६७ हजार १४५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. तर नामांकित महाविद्यालयांसह एकूण १४० महाविद्यालयांतील प्रवेश क्षमता पूर्ण झाली आहे. मात्र अद्याप बऱ्याच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला नसल्याने २७ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर दरम्यान दैनंदिन गुणवत्ता फेरी राबवण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला. त्यानुसार ३० सप्टेंबरपर्यंत ही फेरी राबवली जाईल.

शिक्षण विभागाने संकेतस्थळावर दिलेल्या माहितीनुसार या दैनंदिन गुणवत्ता फेरीत पसंती नोंदवलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळूनही काही विद्यार्थी प्रवेशासाठी जात नाहीत. त्यामुळे त्या जागा भरण्याऐवजी अडवल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर प्रत्येक विद्यार्थ्याला कोणत्याही एका कनिष्ठ महाविद्यालयात निवडीची एकच संधी मिळेल. कोणत्याही महाविद्यालयात एकदा निवड झाल्यानंतर त्या दिवशी संबंधित विद्यार्थ्याने प्रवेश न घेतल्यास त्याला दुसऱ्या दिवशी त्या महाविद्यालयासाठी अर्ज करता येणार नाही.

लोकसत्ता Fri, 30 September 2022
https://epaper.loksatta.com/c/70346787

# News Paper Clippings During September 2022

## Section: Education

पुढारी

# कुलगुरू निवडीसाठी समित्यांची स्थापना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठांच्या कुलगुरू निवडीसाठी तीन स्वतंत्र निवड समित्या स्थापन केल्या आहेत. त्यामुळे संबंधित विद्यापीठांच्या कुलगुरू निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई विद्यापीठाच्या नव्या कुलगुरू निवडीसाठी छत्तीसगड उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती यतींद्र सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. आयआयटी (बनारस हिंदू विद्यापीठ) वाराणसीचे संचालक प्रा. प्रमोद कुमार जैन व राज्याच्या गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आनंद लिमये हे या निवड समितीचे सदस्य असतील.



- **राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा निर्णय**
- **अध्यक्षपदी सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती यतींद्र सिंह**
- **प्रा. प्रमोद कुमार जैन, आनंद लिमये सदस्यपदी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नव्या कुलगुरू निवडीसाठी राज्यपालांनी कर्नाटक उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती शुभ्र कमल मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. आयआयटी कानपूरचे संचालक डॉ. अभय करंदीकर व शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर हे या समितीचे सदस्य असतील.

कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या नव्या कुलगुरू निवडीसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ प्रदीप कुमार जोशी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करण्यात आली आहे. वेरावळ गुजरात येथील सोमनाथ संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू गोपबंधू मिश्र व राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी हे या समितीचे अन्य सदस्य असतील.

Pune Edition
Sep 30, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी...बरंच काही

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी. या अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांना 'इंडस्ट्री रेडी' बनविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या डिग्री प्लस उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून करण्यात आले आहे.

मागील वर्षी प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमात आता ३०० ते ३५० जागतिक पातळीवरील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना मूळ शुल्कापेक्षा कमी दरात उपलब्ध करून दिले आहेत.

**विद्यापीठाच्या 'डिग्री प्लस' साठी नावनोंदणीचे आवाहन**

नोव्हेंबर २०२१ मध्ये तत्कालीन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाची सुरुवात झाली होती. जागतिक दर्जाच्या शैक्षणिक व सामाजिक संस्थांसोबत करार करत हे अभ्यासक्रम विद्यापीठात उपलब्ध करून दिले आहेत. यामध्ये हार्वर्ड बिझनेस ऑनलाइन, एडब्लूएस, सिंपली लर्न, सेलिब्रिटीस्कूलतरईडीएक्सशीझालेल्या कराराच्या माध्यमातून आयबीएम, स्टॅनफॉर्ड युनिव्हर्सिटीसारख्या अनेक नामांकित कंपन्यांच्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. हे सर्व अभ्यासक्रम ऑनलाइन असून यातील काही अभ्यासक्रम नि:शुल्क आहेत. २०२२-२३ वर्षाचे अभ्यासक्रमांचे वेळापत्रकही संकेतस्थळावर आहे. या उपक्रमात २६ हजार विद्यार्थ्यांनी नावनोंदणी तर पाच हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.

### अभ्यासक्रम कोणासाठी...

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील पदवी करत असलेले सर्व विद्यार्थ्यांसाठी हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. हे अभ्यासक्रम वर्षभर सुरू असतात. याचे वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर केले आहे. http://degreeplus.in या संकेतस्थळावर अर्ज करावा.

"'डिग्री प्लस' च्या माध्यमातून विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, अर्थशास्त्र, संस्कृत आदी विषयातील अद्ययावत ज्ञान घेणे शक्य होणार आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा.

**- डॉ. कारभारी काळे,**
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

"डिग्री प्लसच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम उपलब्ध करून देणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे राज्यातले बहुदा एकमेव सार्वजनिक विद्यापीठ आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा तसेच महाविद्यालयांनी देखील विद्यार्थ्यांना सांगावे.

**- डॉ. संजीव सोनवणे,**
प्र- कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

My Pune Edition
Sep 30, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Education*

पुढारी

# प्रवेशाचा आज शेवटचा दिवस

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**
**दैनंदिन गुणवत्ता फेरी अर्थात सतत विशेष फेरीच्या माध्यमातून अकरावी प्रवेशासाठी शुक्रवारी (दि. ३०) शेवटची मुदत आहे. आतापर्यंत ७७ हजार ३० विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयांत प्रवेश निश्चित केले असून प्रवेशासाठी अद्यापही ३४ हजार ७२० जागा उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रवेशापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

- **७७ हजार विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित**
- **३४ हजारांवर जागा अद्यापही रिक्त**




**प्रवेश प्रक्रिया दृष्टिक्षेपात**

| | |
|---|---|
| महाविद्यालये | : ३१८ |
| प्रवेशक्षमता | : १११७५० |
| नोंदणी | : १०७६९८ |
| कोटा प्रवेश क्षमता | : १५६०८ |
| कोटांतर्गत प्रवेश | : ९८८० |
| कॅप प्रवेश क्षमता | : ९६१४२ |
| कॅपअंतर्गत अर्ज | : ७६०४९ |
| एकूण प्रवेश | : ७७०३० |
| रिक्त जागा | : ३४७२० |

राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने होत आहेत. या अंतर्गत तीन नियमित व तीन विशेष प्रवेश फेऱ्यांचे आयोजन केले आहे. तरी देखील अजूनही काही विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी दैनंदिन गुणवत्ता फेरी अर्थात सतत विशेष फेरीचे आयोजन केले आहे.

काही विद्यार्थी निवड होऊनही संबंधित विद्यालयांत प्रवेशासाठी जात नाहीत, त्यामुळे या विद्यालयांतील जागा भरण्याऐवजी अडवल्या जात असल्याचे प्रवेशादरम्यान निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यास कोणत्याही एका कॉलेजमध्ये निवड होण्यासाठी एकच संधी मिळेल. यामुळे कोणत्याही विद्यालयात एकदा निवड झाल्यानंतर जर त्या दिवशी त्या विद्यार्थ्याने प्रवेश घेतला नाही, तर अशा विद्यार्थ्याला दुसऱ्या दिवसासाठी त्या कॉलेजसाठी अर्ज करता येणार नाही. त्या कॉलेजसाठी संबंधित विद्यार्थ्याला प्रतिबंधित करण्यात येणार असून संबंधित विद्यार्थ्यांना इतर कॉलेजसाठी अर्ज करता येईल.

विद्यार्थ्यांनी निवड झाल्यानंतर प्रवेशासाठी त्याचदिवशी जावे; अन्यथा त्या विद्यालयात पुन्हा अर्ज करता येणार नसल्याचे उपसंचालक कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

My Pune Edition
Sep 30, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During September 2022

## Section: Education

# कमी शुल्कात शिका जागतिक अभ्यासक्रम

## 'डिग्री प्लस'साठी नावनोंदणीचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

औद्योगिक क्षेत्र, खासगी आयटी कंपन्या आणि सेवा क्षेत्रातील कंपन्यांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाची निर्मिती होण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'डिग्री प्लस' उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन पुणे विद्यापीठाकडून करण्यात आले असून, या उपक्रमात आता जागतिक पातळीवरील ३०० ते ३५० अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना मूळ शुल्कापेक्षा कमी दरात उपलब्ध करून दिले आहेत. या अभ्यासक्रमांच्या शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना 'इंडस्ट्री रेडी' होता येणार आहे.

नोव्हेंबर २०२१मध्ये तत्कालीन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या नेतृत्वाखाली या 'डिग्री प्लस' उपक्रमाची सुरुवात करण्यात आली होती. जागतिक दर्जाच्या अनेकविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांसोबत करार करून हे अभ्यासक्रम विद्यापीठात उपलब्ध करून दिले आहेत. यात हॉवर्ड बिझनेस ऑनलाइन, एडब्ल्यूएस, सिम्पली लर्न, सेलिब्रिटी स्कूल, तर 'ईडीएक्स'शी झालेल्या कराराच्या माध्यमातून आयबीएम, स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीसारख्या अनेक नामांकित कंपन्यांच्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. हे सर्व अभ्यासक्रम ऑनलाइन असून, यातील काही अभ्यासक्रम निःशुल्क आहेत. २०२२-२३ या वर्षाचे अभ्यासक्रमांचे वेळापत्रकही वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आले आहे. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रदेखील देण्यात येणार आहेत. गेल्या शैक्षणिक वर्षात प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेल्या या उपक्रमात जवळपास २६ हजार विद्यार्थ्यांनी यासाठी नावनोंदणी केली होती, तर पाच हजार विद्यार्थ्यांनी यासाठी प्रवेश घेतला होता.



### वेबसाइटवरून करा अर्ज

या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना http://degreeplus.in या वेबसाइटवरून अर्ज करायचे आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील पदवीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतील. हे अभ्यासक्रम वर्षभर सुरू असतात. याचे वेळापत्रक वेबसाइटवर जाहीर केले आहे, असे विद्यापीठ प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

> 'डिग्री प्लस'च्या माध्यमातून विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, अर्थशास्त्र, संस्कृती आदी विषयांतील अद्ययावत ज्ञान घेणे शक्य होणार आहे. पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा.
>
> \- डॉ. कारभारी काळे, प्रभारी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> 'डिग्री प्लस'च्या माध्यमातून जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम उपलब्ध करून देणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातले बहुदा एकमेव सार्वजनिक विद्यापीठ आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा; तसेच महाविद्यालयांनीही याबाबत विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.
>
> \- डॉ. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 30.9.2022

# *News Paper Clippings During September 2022*

## *Section: Career*

**लोकमत**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर अर्थशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनेक नवनवीन संधींची दालने खुली होत आहेत. अर्थशास्त्र हा विषय घेऊन पदवी किंवा पदव्युत्तर पातळीवरील शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत अनेक संधी उपलब्ध आहेत. यामध्ये प्रामाणिक आणि सखोल अभ्यास अत्यंत गरजेचा आहे. केवळ पदवी मिळविण्यासाठी केलेला अभ्यास आणि परीक्षेतील टक्के याला फारसे महत्त्व नाही.



# अर्थशास्त्र शिकणाऱ्यांना होताहेत संधींची नवनवीन दालने खुली

अर्थशास्त्र हा एक व्यापक आणि मूलभूत विषय आहे. तसेच तो व्यावहारिक आणि उपयोजितदेखील आहे. भारतातील विविध संस्था आणि विद्यापीठांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर वर्गांसाठी अर्थशास्त्र हा विषय सैद्धांतिक आणि उपयोजित (Applied) अशा दोन पातळ्यांवर शिकविला जातो. तसेच कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखेअंतर्गत अर्थशास्त्र हा विषय शिकविण्यात येतो.

मुळात अर्थशास्त्र हा विषय अतिशय व्यापक आहे. एक सैद्धांतिक आणि क्लिष्ट विषय म्हणून अर्थशास्त्राकडे बघण्याच्या पारंपरिक दृष्टिकोनामध्ये बदल झालेला आहे. अर्थशास्त्र एक आव्हानात्मक; परंतु रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देणारा विषय आहे.



**प्रा. नामदेव डोके**
अर्थशास्त्राचे अभ्यासक.

अलीकडच्या काळात अर्थशास्त्रात भरमसाट रोजगार उपलब्ध झाले आहेत. याकरिता अर्थशास्त्र हा विषय घेऊन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्थशास्त्राच्या सैद्धांतिक अभ्यासाबरोबरच गणितीय अर्थशास्त्र (Mathematical Economics), संख्याशास्त्र (Statistics) आणि अर्थमिती (Econometrics) या अर्थशास्त्रातील उपविषयांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये माहितीचे विश्लेषण व त्याचे अर्थान्वयन करण्याचे कौशल्य विकसित होते. खासगी क्षेत्रातील लहान-मोठ्या अनेक व्यावसायिक आणि उद्योजकांना माहिती विश्लेषणाच्या माध्यमातून व्यावसायिक संधी शोधण्यासाठी आर्थिक विश्लेषक व सल्लागार यांची आवश्यकता असते.

अर्थशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या सैद्धांतिक आकलनाच्या जोडीने रोजगाराभिमुख कौशल्य धारण करणे गरजेचे आहे. यासाठी सध्या ऑनलाइन पद्धतीने मोफत व तसेच अतिशय माफक दरात अनेक कोर्सेस उपलब्ध आहे. अर्थव्यवस्थेची बदलती संरचना व निर्माण होणारी नवनवीन क्षेत्रे लक्षात घेऊन विविध कौशल्य शिकावी लागणार आहेत. वाणिज्य, व्यवस्थापन, बँकिंग, सनदी लेखापाल, कंपनी सेक्रेटरी असो किंवा स्पर्धा परीक्षा यापैकी कोणत्याही क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र हा विषय शिकावा लागतो.

## स्पर्धा परीक्षा आणि अर्थशास्त्र

राज्य स्पर्धा परीक्षा असो वा केंद्रीय स्पर्धा परीक्षा त्यात अर्थशास्त्र हा विषय असतोच. इतर विविध विभागनिहाय परीक्षांमध्येही अर्थशास्त्र विषयाचा काही भाग अभ्यासावाच लागतो. भारतीय अर्थशास्त्र सेवा, भारतीय वित्तीय सेवा, राज्य सांख्यिकीय आणि अर्थशास्त्र सेवा या खास अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठीच असतात. तसेच बँकिंग व बँकेत्तर वित्तीय संस्थामध्ये अर्थशास्त्रज्ञ, आर्थिक सल्लागार व विश्लेषक पदासाठी खास अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थीच अर्ज करु शकतात.

## माध्यमांमधील संधी

मुद्रित वा इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये विविध चॅनेल्स, वेब माध्यमे इत्यादीमध्ये आर्थिक व वित्तीय क्षेत्रातील बातम्या देण्यासाठी आणि स्वतंत्र लेखन करण्यासाठी अलीकडच्या काळात स्वतंत्र विभाग निर्माण केले आहेत. रोखे बाजार व संबंधित बातम्या तर प्रत्येक माध्यमांमध्ये दिल्या जातात. त्यामुळे नियमित लेखन व आर्थिक पत्रकारिता करण्यासाठी अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना संधी आहेत.

## करिअरची विविध क्षेत्रे

खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि वित्तीय संस्था, भारतीय अर्थशास्त्र सेवा, भारतीय वित्तीय सेवा, विमा क्षेत्र, गुंतवणूक, रोखे बाजार, मुद्रा बाजार, आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत व्यापार, व्यवसाय, वाणिज्य, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, सल्लागार संस्था, स्पर्धा परीक्षा, मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे इत्यादी.

Hello Pune
Page No. 7 Sep 01, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Career*

लोकमत

खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्वीकारानंतर दक्षिण अमेरिकन देश, जपान, फ्रान्स, जर्मनी आदी देशांतील मोठ्या कंपन्यांनी भारतात आपले व्यवसाय उभारले आहेत. हे जाळे भविष्यातही वाढत जाईल, असे चित्र सध्या दिसत आहे. त्यामुळे दोन कंपन्यांमधील व्यावसायिक संवाद सुरळीपणे चालावा म्हणून भारतीय भाषेसह परकीय भाषातज्ज्ञांना 'फॉरेन लँग्वेज' क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. तसेच अनुवादक, प्रकाशन व्यवसाय, पर्यटन, कंटेंट आदी क्षेत्रांमध्येही परकीय भाषातज्ज्ञांना संधी आहेत.




# परकीय भाषा क्षेत्रातही उज्ज्वल भविष्य!

## या आहेत संधी

- **बहुराष्ट्रीय कंपन्या :** सध्या बहुराष्ट्रीय कंपन्या आणि भारतीय कंपन्यांमध्ये अनेक प्रकारचे प्रकल्प निर्माण होत आहेत. अशा कंपन्यांमध्ये त्या-त्या देशातील व्यावसायिक, लोकांसोबत संवाद साधण्यासाठी परकीय भाषातज्ज्ञांना वाव आहे.

- **कंटेंट रायटर :** सध्याच्या डिजिटल युगात कंटेंट रायटर, टेक्निकल रायटर म्हणूनही अनेक वेबसाईट्सच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करता येऊ शकते. परकीय भाषा शिकून त्या-त्या भाषेतील कंटेंटच्या क्षेत्रात उत्तम प्रकारे रोजगारनिर्मिती करता येऊ शकते.

- **पर्यटन :** या क्षेत्रातही परकीय भाषातज्ज्ञांना वाव आहे. बाहेरील देशातील पर्यटक भारतात येतात, तेव्हा त्यांना त्या ठिकाणाविषयीची माहिती देण्यासाठी परकीय भाषा अवगत असलेला गाईड उपलब्ध असणे आवश्यक असते.

- **सरकारी नोकऱ्या :** परदेशी भाषेच्या जाणकारांना सरकारी क्षेत्रातही अनेक नोकऱ्या उपलब्ध आहेत. गुप्तसेवा विभागांसारख्या विभागांचा यात समावेश आहे. त्यास Intelligence Service असे म्हणतात. बऱ्याचदा या सरकारी भाषातज्ज्ञांची परदेशातल्या भारतीय दूतावासातदेखील नियुक्ती होत असते.

- **अनुवादक :** परकीय भाषेत अनुवादाच्या क्षेत्रातही करिअर करता येऊ शकते. Linkedin सारख्या माध्यमावर रोज अनेक प्रकारच्या नोकऱ्यांसंदर्भात माहिती अपडेट होत असते. प्रकाशन व्यवसायातही संधी आहेत.



**प्रा. तुषार पाटील**
भाषेचे अभ्यासक

### सध्या चालना असलेल्या परकीय भाषा :

- फ्रेंच
- जर्मन
- जपानी
- स्पॅनिश
- चिनी

### काही महत्त्वाच्या परकीय भाषा शिक्षण संस्था :

- इंग्लिश अँड फॉरेन लँग्वेज युनिव्हर्सिटी, हैदराबाद
- जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी, दिल्ली
- जमिया मिलिया इस्लामिया युनिव्हर्सिटी, दिल्ली
- बनारस हिंदू युनिव्हर्सिटी, वाराणसी
- अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी
- सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी
- मुंबई युनिव्हर्सिटी
- सिंबायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन अ‍ॅण्ड इंडियन लँग्वेज, पुणे

Hello Pune
Page No. 7 Sep 01, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Career*

नवभारत

# कॉमर्स में भी है करियर के कई सारे अवसर

**वाणिज्य में विभिन्न डिग्री, स्नातकोत्तर पाठ्यक्रमों और उसके बाद आने वाले कैरियर के अवसरों का पता लगाना महत्वपूर्ण है। दुनिया में हर जगह बड़े पैमाने पर आर्थिक घटनाएं हो रही हैं, वास्तव में अधिकांश घटनाओं का केंद्र अर्थव्यवस्था ही है। इसलिए इस क्षेत्र में करियर बनाने के लिए वाणिज्य क्षेत्र का चुनाव उपयोगी हो सकता है।यह पहले ही साबित हो चुका है कि अच्छा वाणिज्य देश के आर्थिक विकास में महत्वपूर्ण भूमिका निभाता है। 10वीं कक्षा में कॉमर्स लेने के बाद करियर के कुछ अच्छे अवसर हैं जैसे; चार्टर्ड अकाउंटेंसी, कंपनी सेक्रेटरी, बिजनेस मैनेजमेंट, कॉस्ट अकाउंटेंसी आदि। इन्हें भविष्य की ओर बढ़ने के लिए भी सावधानी से विचार किया जा सकता है।**



**पाठ्यक्रमों की है भरमार**

वाणिज्य शाखा में प्रवेश लेने वाले अभ्यर्थियों को व्यापार, व्यवसाय, बाजार के उतार-चढ़ाव, अर्थशास्त्र के मूल सिद्धांतों, सरकार की राजकोषीय नीतियों, औद्योगिक नीति, शेयर बाजार आदि के बारे में ज्ञान प्राप्त होता है. 12वीं के बाद छात्र बी.कॉम, फिर एम.कॉम कर सकता है. इस दौरान संबंधित छात्र वित्त, व्यवसाय, प्रशासन, लेखा, ई-कॉमर्स, बिक्री, विपणन, वितरण आदि विषयों का अध्ययन करते हैं. 12वीं के बाद वित्त, बीमा, बैंकिंग, चार्टर्ड एकाउंटेंसी, विदेशी व्यापार, स्टॉक ब्रोकिंग और निवेश जैसे पाठ्यक्रम चुने जा सकते हैं.

हाल के वर्षों में, कुछ संस्थानों ने बैचलर इन अकाउंटेंसी एंड फाइनेंस, बैचलर इन बैंकिंग एंड इंश्योरेंस, बैचलर ऑफ फाइनेंशियल मार्केट्स जैसे विशेष पाठ्यक्रम शुरू किए हैं. व्यवसाय अर्थशास्त्र, वित्त और नियंत्रण में मास्टर डिग्री भी प्राप्त की जा सकती है. जिन उम्मीदवारों के पास वाणिज्य में मास्टर डिग्री है, उन्हें शिक्षण, सिविल सेवा, उच्च शिक्षा, बैंकिंग क्षेत्र, ब्रोकिंग, अनुसंधान, बीमा क्षेत्र, वित्तीय संस्थानों, लागत लेखाकार में नियोजित किया जा सकता है. कंपनी सचिव, चार्टर्ड एकाउंटेंट ऐसे कई अवसर भी मिल सकते हैं. बी.कॉम. और जिन छात्रों ने MBA जैसी डिग्री हासिल की है उन्हें सरकारी और निजी क्षेत्र की कंपनियों, कॉरपोरेट्स में अच्छे अवसर मिल सकते हैं.

**चुनौतिपूर्ण क्षेत्र में काम करने का अवसर**

एक छात्र जो अंकशास्त्र में महारत हासिल कर सकता है, उसे वित्तीय इंजीनियरिंग के उच्च वर्ग और चुनौतीपूर्ण क्षेत्र में काम करने का अवसर भी मिल सकता है. भारतीय अर्थव्यवस्था को चलाने वाले कारकों में बैंक जमा, म्यूचुअल फंड, स्टॉक मार्केट, वेंचर कैपिटल, बीमा, पोर्टफोलियो प्रबंधन शामिल हैं. नई चीजें हो रहे हैं. वाणिज्य में प्रशिक्षित उम्मीदवार भी इसका लाभ उठा सकते हैं.वैश्वीकरण के बाद, दुनिया भर में बैंकों और बीमा कंपनियों ने अपना नेटवर्क हर जगह फैलाना शुरू कर दिया है, इसलिए कंपनियों को विशेषज्ञ जनशक्ति की जरूरत है. इसलिए कॉमर्स बैकग्राउंड वाले उम्मीदवारों के लिए करियर के नए विकल्प उपलब्ध हैं. जिन उम्मीदवारों ने MBA (फाइनेंस) कोर्स किया है, उन्हें बेहतर अवसर मिल सकते हैं. वाणिज्य के छात्र ई-कॉमर्स क्षेत्र में अच्छा प्रदर्शन कर सकते हैं यदि उन्होंने व्यवसाय और व्यापार कारोबार का अच्छा ज्ञान प्राप्त कर लिया है.

**करियर के लिए कई क्षेत्र उपलब्ध**

जिन छात्रों ने 12वीं तक या कॉमर्स में स्नातक की पढ़ाई की है, वे ऐसा करियर चुन सकते हैं जो उनकी रचनात्मकता को कुछ हद तक गुंजाइश दे. वर्तमान में विभिन्न विकल्प उपलब्ध हैं जैसे - फैशन डिजाइनिंग, टेक्सटाइल डिजाइनिंग, इंटीरियर डिजाइनिंग, एनिमेशन और मल्टीमीडिया, ग्राफिक डिजाइन, वेब डिजाइन, एनिमेशन डिजाइन, कानून और मानविकी, कानून, अर्थशास्त्र, मनोविज्ञान, समाजशास्त्र, आतिथ्य और विमानन, होटल प्रबंधन, घटना मैनेजमेंट, ट्रैवल एंड टूरिज्म, मीडिया, जर्नलिज्म, मास कम्युनिकेशन, मीडिया मैनेजमेंट, फोटोग्राफी, एक्टिंग ट्रेनिंग, मॉडलिंग, एयर होस्टेस, फाइन आर्ट, लिटरेचर, पॉलिटिकल साइंस, फॉरेन लैंग्वेज, टीचर ट्रेनिंग, लॉ कोर्स, रिटेल और फैशन मर्चेंडाइज आदि. विशेष रूप से इस कोर्स के सफल समापन के बाद तत्काल पेशेवर अवसर भी उपलब्ध होते हैं. सही करियर विकल्प आज एक वास्तविक जरूरत है. करियर के दृष्टिकोण से रुचि और पसंद बहुत निकट से संबंधित हैं. हालांकि, सिर्फ जुनून के कारण करियर चुनने से जरूरी नहीं कि मदद मिले. अक्सर ऐसा करियर चुनें जिसे आप पसंद करते हैं, लेकिन क्या यह केवल आपकी बुनियादी जरूरतों को पूरा करने के लिए उपयोगी है? यह देखना भी जरूरी है. करियर चुनते समय खुशी, संतुष्टि और स्थिरता महत्वपूर्ण है.

**- विद्यावाचस्पती विद्यानंद**

मार्गदर्शक, सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट, पुणे.

## सही करियर का चुनाव जरुरी

वर्तमान में करियर को ही चुनना चाहिए कि कौन सी शिक्षा आपके लिए जल्दी कमाई के रास्ते खोलेगी, तो विदेश जाने में भी दिक्कत क्या है? यह हमारे विकास की नींव हो सकती है। इसके लिए हमें बड़ी सफलता की दिशा में प्रयास करने चाहिए. हमे इसे नहीं भूलना चाहिए. विभिन्न देशों और विदेशों से कई सफलता की कहानियां और वहां की शिक्षा के बारे में विस्तृत जानकारी कई तरह से उपलब्ध है। लेकिन वास्तव में क्या करें, कौन सा करियर चुनें? इससे भ्रम की स्थिति पैदा होती है। बहुत से लोग इनोवेटिव करियर की ओर आकर्षित होते हैं, लेकिन अक्सर सामूहिक रूप से इसके बारे में पर्याप्त जानकारी नहीं होती है। केवल सही करियर ही आपको पर्याप्त पैसा कमा सकता है।एक लंबा और स्वस्थ जीवन जीने के लिए सही करियर चुनना हमारे लिए अनिवार्य हो गया है।




Pune Edition
12-september-2022 Page No. 6
epaper.enavabharat.com

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Career*

लोकमत

# फॅशन टेक्नॉलॉजीत करा करिअर

फॅशन टेक्नॉलॉजीमधील दर्जेदार करिअरच्या दृष्टीने 'एनआयएफटी'ची प्रवेश परीक्षा खूप महत्त्वाची मानली जाते. ही परीक्षा एनआयएफटीद्वारे राष्ट्रीय स्तरावर वर्षातून एकदा घेतली जाते. एकूण १७ ठिकाणी बॅचलर ऑफ डिझाईन, बॅचलर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ डिझाईन, मास्टर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ फॅशन मॅनेजमेंट आदी कोर्सेस चालविले जातात. एकूण ३२ शहरांमध्ये ही प्रवेश परीक्षा घेतली जाते. एनआयएफटी २०२३ चे अर्ज डिसेंबर २०२२ मध्ये येतील. अर्ज करण्याची पद्धत ऑनलाईन स्वरूपाची आहे.



## B. Des साठीची परीक्षा पद्धती

### अ) GAT चे स्वरूप

**पेन्सिल पेपर पद्धतीची परीक्षा आहे. GAT ही बहुपर्यायी MCQ प्रकारची परीक्षा आहे. माध्यम इंग्रजी किंवा हिंदी असते.**

दोन तासांची परीक्षा आहे. यामध्ये ५ सेक्शन्स आहेत. कम्युनिकेशन ॲबिलिटी आणि इंग्लिश कॉम्प्रेहेन्शनसाठी प्रत्येकी २५ प्रश्न असतात.

**क्वांटिटेटिव्ह ॲबिलिटीमध्ये २० प्रश्न असतात. तर अॅनॉलिटिकल ॲबिलिटी आणि (चालू घडामोडींसह) सामान्य ज्ञान या सेक्शन्समध्ये प्रत्येकी १५ प्रश्न असतात.**

एकूण १०० प्रश्नांची ही परीक्षा असते. प्रत्येक प्रश्नाला १ गुण असून, एकूण १०० गुणांची ही परीक्षा आहे.

### ब) CAT परीक्षेचे स्वरूप

पेन्सिल पेपर स्वरूपाची परीक्षा आहे. परीक्षेचा कालावधी ३ तास असतो. CAT परीक्षेत ३ प्रश्न असतात. उत्तरे आकृती स्वरूपात (Drawing) काढावी लागतात. या पेपरसाठी १०० गुण असतात. या परीक्षेत पुढील कौशल्ये महत्त्वाची ठरतात- Design Ability, तर्कबुद्धी, निरीक्षण शक्ती, निर्मितीरचनेमधील नावीन्य, रंगांचा प्रभावी वापर, क्रिएटिव्हिटी, सर्जनशीलता इ.

### क) Situation Test

जे विद्यार्थी लेखी परीक्षा उत्तीर्ण होतात, त्यांना प्रवेश प्रक्रियेच्या दृष्टीने Situation Test ला सामोरे जावे लागते. या परीक्षेमध्ये नावीन्यपूर्णता आणि वस्तूंची हाताळणी या कौशल्यांचा विचार होतो. ही परीक्षा मात्र इंग्लिशमध्येच द्यावी लागते. यामध्ये त्यांना Model Evaluation करायचे असते. Space Visualization, Creativity, Uniqueness, Finishing, Element Composition, Construction, Color Scheme, Overall Presentation या बाबींच्या निकषांवर गुण दिले जातात. आयत्या वेळेस वस्तू समोर ठेवून वरील मुद्द्यांवर आधारित लेखन करायचे असते. त्याचप्रसंगी या पेपरचे मूल्यमापन तपासनिसांकडून लगेच केले जाते.

## B.F.Tech साठीची परीक्षा पद्धती

### अ) GAT

- B.F.Tech साठी GAT हा एकमेव पेपर असतो. परीक्षेचा कालावधी ३ तास असतो. परीक्षेचे माध्यम इंग्लिश किंवा हिंदी आहे.
- परीक्षेत एकूण ५ सेक्शन्स आहेत. क्वांटिटेटिव्ह ॲबिलिटीसाठी ३० प्रश्न असतात. कम्युनिकेशन ॲबिलिटी आणि इंग्लिश कॉम्प्रेहेन्शनसाठी ४५ प्रश्न असतात. अन्य तीनही सेक्शन्ससाठी प्रत्येकी २५ प्रश्न असतात.



- हे सेक्शन्स म्हणजे अॅनॉलिटिकल अँड लॉजिकल ॲबिलिटी, (चालू घडामोडींसह) सामान्य ज्ञान आणि केस स्टडी. अशाप्रकारे एकूण १५० प्रश्न असतात. प्रत्येक प्रश्नास १ गुण असून, एकूण १५० गुणांची ही परीक्षा असते.
- एका चुकीच्या उत्तराला - १/४ अशी निगेटिव्ह मार्किंगची पद्धत GAT साठी लागू आहे. B.F.Tech च्या मेरिट प्रक्रियेसाठी GAT च्या गुणांना १०० टक्के वेटेज असते.



प्रा. विजय नवले
करिअर मार्गदर्शक

● संपादन : उद्धव धुमाळे ● मांडणी व सजावट : संदीप वाघमारे ● यशस्वी करिअरसाठीच्या आपल्या टिप्स आणि अनुभव पाठवा. : jmedit@gmail.com (9762417184)

Hello Pimpri Chinchwad
Page No. 7 Sep 22, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During September 2022*

### *Section: Miscellaneous*

लोकमत

# डेक्कन महाविद्यालयात जपलाय मराठा साम्राज्यातील दुर्मिळ ठेवा

पुण्यातील डेक्कन महाविद्यालय म्हणजे मराठा साम्राज्यातील दुर्मिळ ठेवा जपणारी संस्था. या महाविद्यालयाच्या आवारात मराठा इतिहास संग्रहालय आहे. तेथे मराठा साम्राज्यातील अनेक दुर्मिळ वस्तू, साहित्य, तलवारी, बंदुका ठेवल्या आहेत. तो ऐवज पाहणे म्हणजे ऐतिहासिक वारशाची सफर करण्यासारखे आहे.




छत्रपती शिवाजी महाराजांचे साम्राज्य किती होते, त्याविषयीचे पत्र येथे उपलब्ध आहे. या संग्रहालयाचे क्युरेटर इतिहास संशोधक गिरीश मांडके असून, ते या संग्रहालयाविषयी भरभरून सांगतात.

### विशेष काय?

- सुमारे दोन लाख महत्त्वाची कागदपत्रे, जी अतिशय चांगल्या अवस्थेत आहेत.
- लढाईमध्ये वापरलेली शस्त्रं, चिलखतं, जिरेटोप, ढाल आदी वस्तूही पाहायला मिळतात.
- हस्तीदंताच्या आकर्षक वस्तू आहेत.





### ऐतिहासिक नोंदी

- डेक्कन कॉलेजच्या मराठा इतिहास संग्रहालय-कम-अर्काइव्हजमध्ये अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या महत्त्वाच्या ऐतिहासिक नोंदी आहेत.
- सातारा येथील दिवंगत रावबहादूर पारसनीस यांचा हा वारसा आहे. मराठ्यांच्या इतिहासात आस्था असल्याने त्यांनी महाराष्ट्राच्या विविध भागांतून, भारतातील इतर प्रांतांतून आणि काही परदेशांतून विविध ऐतिहासिक साहित्य संग्रहित केले.
- सातारा येथील त्यांचे वैयक्तिक संग्रहालय हे मराठा इतिहासाच्या मूळ ऐतिहासिक स्रोतांचे संकलन आणि पद्धतशीर मांडणी करण्याच्या सुरुवातीच्या प्रयत्नांपैकी एक होते.
- हे संग्रहालय १९२५मध्ये सातारा येथे उघडण्यात आले. नंतर ते मुंबई सरकारने विकत घेतले आणि त्याला 'सातारा ऐतिहासिक संग्रहालय' असे नाव दिले.
- ऑगस्ट १९३९मध्ये डेक्कन कॉलेजचे पोस्ट ग्रॅज्युएट आणि रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये रूपांतर केले. मराठा इतिहासातील मूळ संशोधन सुलभ करण्याच्या उद्देशाने, सातारा ऐतिहासिक संग्रहालयातील सर्व जुने ऐतिहासिक दस्तऐवज आणि पुरातन वास्तू कॉलेजकडे हस्तांतरित केल्या. डेक्कन कॉलेजच्या मराठा इतिहास संग्रहालयाचा हा पाया होता.





श्रीकिशन काळे
पत्रकार, लोकमत

● संपादन : **उद्धव धुमाळे** ● मांडणी व सजावट : **अमोल व्यवहारे** ● यशस्वी करिअरसाठीच्या आपल्या टिप्स आणि अनुभव पाठवा. : jmedit@gmail.com (9762417184)

Hello Pune
Page No. 7 Sep 29, 2022
Powered by: erelego.com

# *Upcoming Events*

## October 2022

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 |
| 2<br>Mahatma Gandhi Jayanti & Lal Bahadur Shastri Jayanti<br>  | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9<br>Maharshi Walmimki Jayanti<br> | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15<br>Dr. A.P.J.Abdul Kalam Jayanti<br> |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |
| 30<br>Indira Gandhi Punyatithi & Sardar Vallabhnbhai Patel Jayanti<br>  | 31 | | | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*